# अ प रा जि ता

सौ.अरुंधती बापट



## ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# अपराजिता

## लेखिका : अरुंधती बापट

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# अपराजिता

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अपराजिता

## लेखिका : अरुंधती अरविंद बापट

१० सावली अपार्टमेंट्स,

प्रभात फिल्म कंपनी मार्ग,

लॉ कॉलेज रस्ता, एरंडवन,

पुणें ४११००४

ph 020 25464804

Mo 9423003528

e-mail - arundhati@bapat.net

मुखपृष्ठ: सानिका बापट, सौ अश्विनी पुरंदरे

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २६ जानेवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेचा परिचय



मी सौ अरुंधती अरविंद बापट. पूर्वाश्रमीची विजया बाळकृष्ण ओगले. मानसशास्त्र हा माझ्या विषयात masters degree (MA) घेतली. माझे BA पर्यंतचे शिक्षण नागपूर येथे झाले. मराठी माध्यमातून शिकलेली मी, MA ला इंग्लिश माध्यम घेतल्याने, खूप प्रयत्न करावे लागले. पण अथक प्रयत्नांमुळे मी मेरिट घेऊन पास झाले.

त्याआधीच मी लेखनाला सुरवात केली होती. लिहिण्याची प्रेरणा मला माझी आई – सौ शकुंतला बाळकृष्ण ओगले, हिच्याकडून मिळाली. हे पुस्तक लिहून मी मातृऋणाचा सन्मान करते आहे, असं मला वाटतं. कारण मातृऋण कधी फेडता येईल असं मला वाटत नाही.

पहिला लेख मी बालगुन्हेगारीवर लिहिला होता. त्या लेखाला कॉलेजमध्ये पहिले बक्षीस मिळाले होते. त्यानंतर नागपूरच्या लहानमोठ्या वर्तमानपत्रात मी छोटेमोठे लेख लिहीत असे. नागपूर

आकाशवाणीवरही बालविहारमध्ये माझे अनेक कार्यक्रम होत असत.

लग्नानंतर मात्र माझ्या लिखाणात खंड पडला. साधारणपणे १९७३ ते १९७५ याकाळात मी पुन्हा लेखनाला सुरवात केली अनेक मासिकांमधून माझ्या गोष्टी व कविता छापून येत असत. या काळात मी मा. शांताबाई किर्लोस्करांबरोबर महाराष्ट्र पालक शिक्षक संघाचे त्रैमासिक, " पालक - शिक्षक या मासिकाच्या संपादनाचे काम करीत असे. त्यातून मला प्रेरणा मिळाली. मग मी नापास मुलांच्याकरता एक विशेष वर्ग सुरु केला. मला असं वाटायचं की मुलं अभ्यासात मागे पडतात ती केवळ ती बुद्धीने कमी असतात किंवा अभ्यास करत नाही असं नव्हे. तर त्याच्या मागे इतरही काही कारणं असू शकतात. घरचं वातावरण, खूप लाड, पालकांचं दुर्लक्ष, वर चढवल्यामुळे मागचा अभ्यास कच्चा असणे. मी प्रत्येक मुलाचा अभ्यास करून त्याच्या मागे पाडण्याचे संभाव्य कारण शोधून, त्याच्या पालकांशी चर्चा करीत असे. अशा अनेक मुलांना मी अभ्यासात वर आणले आहे. त्यातून मुलांची वाढ व विकास या बद्दल एक सोपेसे पुस्तक लिहिण्याचा विचार मनात आला. तो विचार मी प्रत्यक्षातही आणला. त्याबद्दल पुन्हा केव्हांतरी.

यानंतर मी लेखन करीत असे, पण ते प्रसिद्ध करण्याकडे माझा कल नव्हता. आज माझ्या या कथा वाचकांपर्यंत पोहोचवतांना मला मनोमन आनंद होतो आहे. पहिल्यांदाच माझ्या कथा वाचकांपर्यंत पोहोचत आहेत, त्या वाचकांच्या पसंतीला उतरतील अशी आशा करते. मी मानसशास्त्र शिकले आहे. या गोष्टींमध्ये माझ्याकडून मानवी मनाच्या निरनिराळया भावनांचं प्रकटीकरण झालेलं आहे.

e-sahity च्या निमित्ताने माझे हे पुस्तक प्रकाशित होत आहे. या कथा यापूर्वी कुठेही प्रसिद्ध झालेल्या नाहीत. यातल्या गोष्टी या नुसत्या कथा नाहीत. तर व्यक्तींच्या भावभावनांचा वेध घेण्याचा प्रयत्न मी केलेला आहे.या कथा वाचकांच्या मनाला भिडाव्यात, त्यांना आवडाव्यात अशी माझी अपेक्षा आहे.

या e – पुस्तकाचं सुंदर मुखपृष्ठ सौ अश्विनी पुरंदरे व सानिका बापट यांनी तयार केलेलं आहे. त्यांचे मनापासून आभार.

e-sahity कडून मला खुप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यामुळेच मी या कथा प्रसिद्ध करायला उद्युक्त झाले. e-sahity आभार मानून चालणार नाही. मी त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.

अरुंधती अरविंद बापट

# अर्पणपत्रिका

अपराजिता हे माझे पहिले पुस्तक
मी माझी आई कै सौ. शकुंतला बाळकृष्ण ओगले
हिला विनम्रभावानी अर्पण करते आहे.

# अपराजिता

# कथानुक्रम


अपराजिता

परित्यक्ता

माया

विश्वास प्रेमाचा

षोडशी

आवर्त

# अपराजिता

“ सुख पाहता जवा पाडे, दुःख पर्वताएवढे “ या उक्तीच्या अगदी विरुद्ध परिस्थिती होती निर्मलाबाईंची. दुःख हा शब्द त्यांच्या शब्दकोशातच नव्हता. जणू काय त्यांना तो माहितीच नव्हता. दुःख पाहता जवा पाडे, सुख पर्वताएवढे; असं वर्णन करावं अशीच त्यांची परिस्थिती होती. माहेरी सुखवस्तू म्हणावं, अशा घरातच त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. रूप हजारात उठून दिसावं असं. रूपाबरोबर हुशारीही होती. निर्मला अगदी चुणचुणीत होती. शाळेत सगळ्यांची लाडकी. भावंडांमध्ये मोठी ताई म्हणून, सगळ्यांची आवडती. आई-वडिलांच्या गळ्यातला अगदी ताईतच समजानात. मोठ्या भाग्याने ही मुलगी आपल्या पोटी जन्माला आलीय अशी धन्यता आई-वडिलांना वाटायची.

अशी ही निर्मला, पदवीधर झाली. तिला खरंतर नोकरी करायची होती, हौस म्हणून. पण गणपुल्यांच्या घरून, निर्मलाकरता मागणीचा प्रस्ताव आला आणि निर्मलाच्या जगात चांगल्या अर्थांनी उलथापालथ झाली. सुरुवातीला ती लग्नाकरता तयार होईना. पण गणपुल्यांचा सदानंद तिला पाहून गेल्यावर, तिच्या नकाराला फारशी धार उरली नाही. नकाराचं होकारात रूपांतर कधी

झालं हे तिचं तिलाही कळलं नाही. सदानंदला पाहून निर्मला हरखूनच गेली. “माझी मी नच उरले”, अशी तिची अवस्था झाली होती. बघता बघता लग्न ठरलं? सुद्धा. देण्या-घेण्याचा प्रश्नच निघाला नाही. “ नुसती मुलगी आणि नारळ दिलात म्हणजे पुरे.” या वाक्यांनी देण्याघेण्याच्या बोलण्याची सुरुवात आणि शेवटही झाला. त्यामुळे तर मुलीला कुठे ठेवू आणि कुठे नको, अशी आई-वडिलांच्या मनाची स्थिती झाली. गणपुले काहीही म्हणाले, तरी विश्वासरावांनी अगदी रीतसर, सालंकृत कन्यादान करून, थाटामाटात लग्न करून दिलं.

विश्वासराव मराठे, टाटानगरला टाटांच्या कारखान्यात इंजिनीयर म्हणून काम करीत असत. त्यांच्या पत्नी राधिकाबाई, सुविद्य होत्या. निर्मला ही त्यांची पहिली मुलगी. ‘ पहिली बेटी धनाची पेटी ‘ असं म्हणतात, ते निर्मलाच्या बाबतीत अगदी खरं ठरलं होतं. तिच्या जन्मानंतर, विश्वासरावांना बढती मिळून बरीच वरची पोस्ट मिळाली. पगारातही एकदम वाढ झाली. त्यानंतर त्यांनी कधी मागे वळून पाहिलंच नाही. दिवसेंदिवस त्यांची प्रगती होत राहिली. निर्मलाच्या पाठीवर त्यांना श्यामला आणि विदुला अशा दोन मुली झाल्या. तीन बहिणींच्या पाठीवर झालेला भास्कर सगळ्यांचा आवडता होता. निर्मला पदवीधर झाली, तिने आणखी शिकावं अशी विश्वासराव यांची इच्छा होती. पण तिला नोकरी

करायची होती. यापलीकडे घडलं ते अगदी वेगळंच. पुढे शिक्षण नाही आणि नोकरीही नाही. निर्मला एकदम ‘ सौ. निर्मला सदानंद गणपुले ’ झाली.

गजान्त वैभव आणि समाजात मानाचं स्थान असलेले गणपुले, प्रगतिशील शेतकरी होते. वाडवडिलांकडून चालत आलेली शंभर एकर शेती, ते समर्थपणे सांभाळत होते. चार भावांचं एकत्र कुटुंब, हे ही गणपुल्यांचं एक प्रकारचं वैभवच होतं. अशा या घरात निर्मला आली आणि तिच्या रूपा गुणांमुळे सगळ्यांची आवडती ही झाली. सगळ्या कामाला नोकरचाकर, अधून मधून शेतावरची माणसं यायची, घरातलीच पाच पंचवीस माणसं, या सगळ्या धबडग्यात ती रमून गेली. तशात तिला लगेच दिवसही राहिले. मग तर काय? कौतुकच कौतुक तिच्या वाट्याला आलं. आपल्याला नोकरी करायची होती, ही गोष्ट तिच्या आठवणीत सुद्धा राहिली नाही. सासर माहेरच्या लाडा कौतुकात ती आकंठ बुडून गेली.

माधवराव गणपुले एक प्रगतिशील शेतकरी होते. पारंपरिक शेती बरोबर ते शेतीत निरनिराळे प्रयोगही करत असत. सदानंदलाही शेतीत रस होता. पण व्यवसायाने तो गावातल्या एका कॉलेजमध्ये इंग्रजीचा प्राध्यापक होता. सुट्टीच्या दिवशी तोही

वडिलांबरोबर शेतावर जात असे. पुढे जेंव्हा वडिलांच्याने होईनासं झालं, तेंव्हा ती व सदानंद शेतावरच राहायला गेले. शेत जवळच होते. तिथूनच सदानंद कॉलेजला ये - जा करत असे. सदानंदाला दोन धाकटे भाऊ होते, जय आणि विजय. ते शिकत होते. त्यांना वहिनी शिवाय अगदी चैन पडत नसे. ते दोघे व निर्मला यांची अगदी गट्टी जमली होती. त्या तिघांची सारखी थट्टा मस्करी चालू असे. त्यामुळे निर्मलाला भावाची उणीव जाणवत नसे. पण जय - विजय शेतीत रमले नाहीत. शिक्षण पूर्ण करून ते शहरात नोकरीसाठी निघून गेले. सणावाराला, काही विशेष कार्यक्रम वगैरे असला, तर ते आपल्या या शेतातल्या घराकडे परतत असत.त्यांच्या बायकाही नोकरी करणाऱ्या. अशा रितीनी अपरिहार्य म्हणून हे तीन भावांचं एकत्र कुटुंब वेगळं झालं. तरीही शेतीच्या वाटण्या झाल्या नाहीत. सदानंदाचा सर्व शेती करत असे. त्या बाबतीतले सर्व निर्णय घेण्याचे अधिकार त्याला बहाल केलेले होते. सदानंद अगदी समर्थपणे शेती सांभाळत होता.

सध्यातरी निर्मलाच्या सासर माहेरचा केंद्रबिंदू ती स्वतःच होती. पण या सगळ्या वैभवाची राज्ञी म्हणून वावरताना, ती उतली मातली नाही. ती होती तशीच राहिली. सुस्वभावी. सर्वांचा विचार करून वागणारी. सगळ्यांना धरून राहणारी. मोठ्यांचा मान ठेवून वागणारी. नाही म्हणायला, घरातल्या श्रीमंतीनी तिच्या जुन्या

सवयी मात्र बदलायला लागल्या होत्या. पण त्याला पर्याय तरी काय होता? गजान्त लक्ष्मी घरात पाणी भरत होती. त्याचा काही ना काही परिणाम निर्मलावर होणं अपरिहार्य होतं. सध्या तर काय निर्मला दोन जीवांची. मग या भरल्या घरात, तिच्या कौतुकाला काय तोटा! चोर चोळी, डोहाळंजेवणं, नुसता भडिमार चालू होता कौतुकाचा.

आता ती माहेरी होती, तरीही सदानंद स्वतः, आणि त्याचे आई वडील सुद्धा तिच्या माहेरी डेरेदाखल झाले होते. गणपुले यांच्या घराचा पहिला वहिला वारस जन्म घेणार होता ना! त्या सगळ्यांची उस्तवार ठेवता ठेवता, निर्मलेच्या आईच्या, सरस्वतीबाईंच्या नाकी दम येत होता. नोकरचाकर हाताशी होते, तरी काय झालं? त्यांच्याकडून आपल्या मनासारखी कामं करून घ्यायची, हे जिकिरीचं काम होतं. त्यादिवशी रात्री, निजतानाच निर्मलाला काहीतरी वेगळं वाटत होतं. कसली तरी हुरहुर लागून राहिली होती. पहाटे पहाटे तिच्या पोटात दुखायला लागलं; आणि उजाडतानाच दवाखान्यात जायची वेळ आली. घरात एकच धांदल उडाली. खरंतर तिच्या सासुबाई आणि आई यांच्याबरोबर, तिनं गाडीनं दवाखान्यात जायचं. एवढेच काय ते करायचं होतं. पण आख्खं घर जागं झालं. जो तो आपापल्या परीनं सूचना देत होता.

सगळ्यांची एकच तारांबळ उडली होती. भांबावल्यासारखं झालं होतं सगळ्यांना.

नव्या पाहुण्यांनं आपल्या आगमनाची सूचनाच दिली होती. पण ------ बाळंतपणाच्या वेळी प्रत्येक स्त्री समोर उभा ठाकणारा हा ' पण ' प्रत्येकाला अंतर्मुख करत होता. त्यामुळे अस्वस्थ झालेले सगळे आप्तजन काळजीने सूचना देत होते. सगळं वातावरणच भावनेनी भारल्या गेलं होतं. गणपुलेच्या घरच्या रीतीप्रमाणे निर्मलेच्या आईने निर्मलेला औक्षण केलं. तिची ओटी भरली. तिचं तोंड गोड केलं. निर्मला, तिची आई नि तिच्या सासूबाई, अशा तिघीजणी दवाखान्यात जायला निघाल्या. पोर्चमध्ये गंगाराम ड्रायव्हरनी गाडी सज्ज करून ठेवली होती. भान ठेवून, गंगाराम ड्रायव्हरनी तिला अलगदपणाने धक्का सुद्धा लागू न देता, दवाखान्यापर्यंत पोहोचवलं.

आधीच फोन केल्यामुळे डॉक्टरीणबाई सुद्धा तयारीतच होत्या. त्या लगेचच निर्मलेला आत घेऊन गेल्या. त्यांनी तिला तपासलं आणि सर्वकाही आलबेल असल्याचा संदेश निर्मलेच्या आईपर्यंत पोहोचवला. निर्मलेने

साथ दिल्यास, तीन चार तासात तिची सुटका होईल, असं त्यांनी सांगितलं. आता सगळ्यांनी करायची होती ती - ती फक्त

प्रतिक्षा. निर्मलेचं भाग्यंच, ‘ मी आलो आहे, मी आलो आहे, ‘ असं म्हणत तिच्या उंबरठ्याशी ओठंगून बसलं होतं. निर्मलाने पण जिंकला. आणि त्याच दिवशी दुपारी बाराच्या सुमाराला, एका पुत्ररत्नाला जन्म दिला. ही बातमी ऐकून तिच्या सासरच्या व माहेरच्या माणसांमध्येएकदम आनंदाची कारंजी फुलली. नातवाच्या जन्माची बातमी ऐकून, तिचे सासरे लगेच म्हणाले की, ही तर राम जन्माची वेळ. रामानीच आमच्या घरात जन्म घेतला आहे. झालं, लगेच रामाच्या नावांची यादी तयार व्हायला लागली. निर्मलाच्या आईला आणि सासूबाईंना तर निर्मलेला कुठे ठेऊ आणि कुठे नको असं वाटत होतं. मुलगा चांगला ३. ५ किलो वजनाचा, गोरापान, आणि भरपूर जावळ असलेला होता. त्याचं राजबिंडं रूप पाहून सगळेच मोहून गेले. निर्मलाचे सासरे तर पहिल्या दिवसापासूनच त्याचा श्रीराम म्हणूनच उल्लेख करीत होते.

दोन्ही घराण्यांकडून पैशांची लयलूट झाली. श्रीरामाच्या बारशाचा थाट अगदी डोळे दिपवणारा होता. आजोबांची इच्छा म्हणून पाळण्यात त्याच नाव श्रीरामच ठेवण्यात आलं. दोन तीन महिने माहेरपण उपभोगून निर्मला सासरी आली. खरंतर निर्मलकरता सासर / माहेर असा काही फरकच नव्हता. दोन्हीकडे कौतुकच कौतुक तिच्या वाट्याला येत होत. तिच्या अंगभूत

लाघवी आणि सध्या स्वभावाने तिनी सर्वांना आपलंसं करून घेतलं होतं. श्रीराम नंतर जन्माला आला तो श्रीकृष्ण. शेंडेफळ म्हणून आणि घराची शोभा म्हणूनच जणू श्रेयाचा जन्म झाला.

दिवस मोठे आनंदात नि भराभरा जात होते. मुलं मोठी होताना पाहणं फारच आनंदाचं होतं. निर्मलाच्या मुलांचं सारंच न्यारं होतं. त्यांना सगळया गोष्टी अगदी भरभरून मिळत होत्या. आता तिच्या दिरांचीही लग्न होऊन त्यांनाही एक एक मुलगा होता. कौतुक सर्वच मुलांचं होत होतं. दीरांचं वाहिनीवरचं प्रेम अजिबात कमी झालेलं नव्हतं. गाढ विश्वास होता त्यांच्या मनात निर्मलेबद्दल. जय - विजय चांगलं शिकले. पण शेतीमध्ये गुंतले नाहीत. नोकरीसाठी घराबाहेर पडले. त्यांच्या बायकाही नोकरी करणाऱ्या. चांगलं चाललं होतं त्यांचं. सगळयांचे एकमेकांशी चांगले संबंध होते. एकमेकांना एकमेकांची ओढ होती.

पण तो दुर्दैवी दिवस उगवला; आणि सगळं होत्याचं नव्हतं झालं. त्या दिवशी सकाळी सदानंद शेतात गेला तो दुपारी बारा वाजता तापाने फणफणूनच घरी आला. डॉक्टरांना लगेचच बोलावणे गेले. तेही तत्परतेने आले. त्यांनी ताप बघितला. सदानंदाला तपासले. ते म्हणाले ताप खूपच वाढला आहे, त्यांच्या कपाळावर गरम पाण्याच्या पट्ट्या ठेवा. उन्हाचाच ताप आहे. मी

लिहून देतो ती औषधं आणून घ्या. लिहून दिलं आहे त्याप्रमाणे द्या. मी संध्याकाळी पुन्हा एकदा पाहायला येतो. पण एवढी काही वेळच आली नाही. डॉक्टरांनी दिलेल्या औषधांचा काही म्हणावा तास परिणाम झाला नाही. ताप वाढतच गेला. करकरीत तिन्हीसांजेला सदानंदाची प्राणज्योत मालवली. एकच आकांत झाला.

अचानक झालेल्या भीषण आघातानी निर्मला उन्मळून पडली. तिची शुद्धच गेली. सदानंदाचे आई - वडील स्वतःला सावरत आजारी पडले नाहीत इतकंच. कोणी कोणाला सांभाळायचं अशी वेळ गणपुले कुटुंबियांवर आली. घरात म्हातारे सासूसासरे, निर्मला व तिची मुलं , एवढीच माणसं होती. शेतातला एक गडी सदानंदाला घरी घेऊन आला होता, तो तेवढा होता. डॉक्टरही वेळेवर आले होते. पण त्यांच्या उपचारांना बगल देऊन सदानंद देवाघरी गेलाच.

निर्मलेचे आई - वडील लगेचच आले. दुसऱ्या दिवशी सकाळी जय - विजय सुद्धा आले. निर्मला कोणाशी काही बोलण्याच्या, काही करण्याच्या अवस्थेत नव्हतीच. सदानंदाचे दिवस पार पडले. पण आता पुढे काय हा यक्ष प्रश्न पुढे उभा ठाकला होता. या प्रश्नाचं उत्तर कोणालाच ठाऊक नव्हतं. जय - विजयचा मत असं पडलं की निर्मलानी शेतावरच राहावं. शेतावरचे मजूर

वर्षानुवर्ष आपापली काम करत आहे. त्यांच्याकडे फार लक्ष देण्याची गरज नाही. निर्मला आधीपासूनच तिथे राहत असल्यामुळे, ती तिथेच राहिली, तर कशातच फारसा फरक पडणार नाही. शेतीकडे लक्षही राहील. निर्मलाचं बस्तान नीट बसेपर्यंत जय - विजय आळीपाळीनं दर महिन्याला तिथे येतील.

निर्मलला मात्र ही कल्पना मुळीच आवडली नाही. एक तर सदानंदाचा मृत्यू त्या घरात झाल्यामुळे तिला त्या घरात राहावंसं वाटत नव्हतं. शिवाय मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आला असता. तिथेही शाळा कॉलेजेस होतीच. पण त्यांच्या दर्जा तेव्हढा चांगला नव्हता. शिवाय निर्मला शेतावर राहत असली तरी तिला शेतीबद्दल काहीच माहिती नव्हती. ती म्हणाली, “ मला एक तर शेतीची काहीच माहिती नाही. मी काय कामं करून घेणार लोकांकडून? एव्हढी १०० एकर शेती सांभाळणं मला जमणारच नाही. पुन्हा मी इथे खेड्यात राहिले तर माझ्या मुलांच्या शिक्षणाचं काय? जय - विजय यांच्या बायका तर नोकरी करणाऱ्या. त्या काय निर्मलाच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणार? त्यांना वेळ तरी कुठे होता. एका मुलाचं करून घर सांभाळून नोकरी करतांना, आत्ताच त्यांची दमछाक होत होती.

तिने शेतावर राहावयाचे नाकारल्याने, शेतीकडे पाहायला कोणीच उरले नाही. शेतीतून पैसे मिळत होता खरा!

पण त्यासाठी घाम गाळावा लागत होता. आता तर शेतीला कोणी वालीच उरला नाही. सध्यातरी कोणालातरी व्यवस्थापक म्हणून ठेऊन घेऊन, त्याच्या मदतीने शेती करावयाची असं ठरलं. पुढेमागे शेती विकून टाकावी लागणार हे आता सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट दिसत होतं. पण हे काम घाईघाईनं करण्याजोगं नव्हतं. त्याकरता भरपूर वेळ द्यावा लागणार होता. पण मग, मुलांना घेऊन निर्मला शहरात राहिली, तर तिच्या खर्चाची व्यवस्था काय? हा सुद्धा एक प्रश्नच होता. कोण करू शकेल तो खर्च? असाही एक प्रश्न पुढे आला. कारण गावात शेतीवर लक्ष ठेवणारं कोणीच नसलं, तर शेतीतून पुरेसा पैसा मिळणार नाही, हे सांगायला कोणा ज्योतिष्याची गरज नव्हती.

सदानंद स्वतःच शेतीत सर्व जबाबदारी पेलत होता म्हणून मुबलक उत्पन्न मिळत होतं. त्या शिल्लक पैशातून ती फारतर एक वर्षं शहरात राहू शकली असती. पण पुढे काय? हा प्रश्नच होता. तरीही निर्मला बधली नाही. मी नोकरी करेन, पण माझ्या मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होऊ देणार नाही. ही घरेलु, पुरेसं शिक्षण नसलेली बाई हिला कुठली नोकरी मिळणार? ही काय नोकरी

करणार? असं प्रत्येकाच्या मनात आलं. पण ते बोलायचं धाडस कोणाला झालं नाही. निर्मलाकरता पण हे बोलणं सोपं होतं, पण ते प्रत्यक्षात उतरणं किती कठीण आहे, याची तिला चांगलीच कल्पना होती. पुढे येणारे अडचणींचे डोंगर तिला दिसत होते. पण तिचा निश्चय पक्का होता. निश्चयाचे बळं, तुका म्हणे तेचि फळं! ही उक्ती तिला पाठ होती. ह्या उक्तीचा आधार तिला वाटत होता. आपण वाटेल ते, वाटेल तितके, प्रयत्न करु पण आपल्या मुलांना त्यांना आवडेल ते उच्चं शिक्षण देऊ, असं तिला वाटत होतं. आणि ही गोष्टं आपल्याला जमेलच, याबाबत आतातरी तिच्या मनात काही शंका नव्हती. त्यामुळे निर्मला मुलांना घेऊन शहरात राहणार यावर शिक्कामोर्तब झाल्यासारखंच होतं.

प्रत्यक्षात मात्र निर्मलाला परिस्थितीशी फारच जास्ती झगडा करावा लागला. पहिल्यांदा आड आलं ते तिचं नुसतं बी ए पर्यंतचं शिक्षण. साधं टायपिंग तिला येत नव्हतं, तर कॉम्पुटरची बातच सोडून द्या. वयाची चाळीशी जवळ आलेली, त्यामुळे सरकारी नोकरीचा विचार सुद्धा करणं शक्यं नव्हतं. काहीतरी ठोस qualification मिळवल्याशिवाय तिला शाळेत किंवा इतर कुठेही नोकरी मिळणं अशक्य होतं. तरीही तिने एक वर्षं शहरात राहून बघावं, असं ठरलं. त्याप्रमाणे बेताचं भाडं असलेला एक तीन खोल्यांचा फ्लॅट तिने भाड्याने घेतला. निर्मला गाव सोडून शहरात

राहायला आली. मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालता आलं नाही. कारण ती आतापर्यंत गावातल्या मराठी माध्यमाच्या शाळेत शिकली होती. मुलांना शाळेत प्रवेश मिळाला. त्यांच्या शाळा सुरु झाल्या. आता निर्मलानी आई-वडिलांच्या मदतीने बी एड करायचं ठरवलं. जरा ओळखीनं आणि तिची परिस्थिती लक्षात घेऊन तिला बी एड ला प्रवेश मिळाला. संसारात पूर्णपणे झोकून दिलेल्या व्यक्तींकरिता हा मार्ग अवघड व अनवट होता. पण निर्मला मागे हटली नाही. मुलांना उत्तम शिक्षण देण्याच्या विचारांनी ती भरली होती. त्यामुळे समोर येणाऱ्या अडचणीवर तिनी निग्रहानी मात केली.

आता निर्मलाची खरी परीक्षा सुरु झाली. शेतावर तिला स्वतः कष्टाची कामं करण्याची सवय नव्हती. फक्त लक्ष ठेवावं लागायचं. आता इथे शहरात सगळं काम स्वतःलाच करावं लागणार होतं. एक बरं होतं की मुलं समजूतदारपणानी वागत होती. आईला जमेल तशी मदत करत होती. पाहिलं वर्षं तर अत्यंत कष्टाचं गेलं..कारण या जीवनाची कोणालाच सवय नव्हती. मुलांना अभ्यासात लागेल ती मदत करून स्वतःचा अभ्यास करणं जिकिरीचं होतं; पण निर्मला पहिल्या प्रयत्नातच चांगल्या ऱीतीनी बी एड झाली लगेच तिला शाळेत नोकरीही मिळाली. आता तिचं धावपळीचं आयुष्यं सुरु झालं. पुढची कित्येक वर्षं आता हेच आयुष्य तिला जगायचं होत.

एखाद्या वर्षातच तिचा जम बसला. शेतावरच्या आयुष्याचे दिवस आता आठवणीतच राहिले होते. घरातलं करून वेळेवर शाळेत पोहोचणं ही तारेवरची कसरत आता तिला वर्षानुवर्षे करायची होती.

निर्मलाची ही झेप कौतुकास्पदच होती. घडलेल्या दुःखद घटनेचं दुःख करत बसायला तिला वेळच मिळाला नाही.हे एकपरीनं चांगलंच झालं, असं तिच्या आईवडिलांना वाटलं. निर्मला शहरी आयुष्याला सरावली. या काळात अगदी अडलं नडलं तर जय - विजय, किंवा आईवडिलांकडून आर्थिक मदत तिने घेतली होती. शेतीतलं उत्पन्न पहिल्या वर्षातच निम्म्याहून खाली आलं होतं. शिवाय त्याच्या तीन वाटण्या होत होत्या. अर्थात निर्मला त्यावर अवलंबून नव्हतीच. शाळेत शिकवायला लागल्यावर, निर्मलाचा आत्मविश्वास खूपच वाढला. आता ती मुलांकरता भव्य दिव्य स्वप्नं पाहायला लागली. त्याला सुमधुर फळं येण्याचे वेध आता लागायला लागले होते. त्याकरता मुलंही खूप मनापासून प्रयत्न करत होती.

निर्मलाच्या मोठा मुलगा इंजिनीअर झाला. त्याला लगेच नोकरीही मिळाली. दुसरा मुलगा फिजिओथेरॅपिस्ट झाला. एक चांगला कुशल फिजिओथेरॅपिस्ट म्हणून त्याचं समाजात चांगलं

नाव होतं. दोघांचीही लग्नं त्यांना आवडलेल्या मुलींबरोबर झाली होती. पण तीन खोल्यांच्या घरात एकत्र राहणे व्यवहारात: शक्यं नव्हतं म्हणून गावातच त्यांनी आपापली वेगळी घरं मांडली होती. आता प्रश्न होता तो फक्त श्रेयाचा. तिला शिक्षणाची फार आवड नव्हती. ती आपल्या आईसारखीच सुंदर होती. नटणं - मुरडणं, नाटक, सिनेमा पाहणं, मैत्रिणी या बाहेरचं जगंच तिला माहित नव्हतं. तरीही दोन्ही भावांची व आईचीही ती फार लाडकी होती. ती पदवीधर तर झाली, पण तिला पुढे शिकायचं नव्हतं. त्यामुळे निर्मलाही तिच्या लग्नाचा विचार करायला लागली होती.

पण श्रेयाला मात्र टॉपची हिरॉइन होण्याची स्वप्नं पडत होती. आपल्या सौन्दर्यामुळे आपल्याला टॉप हिरॉईनची कामं मिळतील याची तिला खात्री वाटत होती. त्याच स्वप्नात ती मग्न असायची. त्याकरता सदैव लोकांच्या नजरेत आपण भरलं पाहिजे असं तिला वाटायचं. तशीच तिची राहणी होती. आईला घरकामात मदत करणं, अभ्यास करणं, या गोष्टी तिच्या खिजगणतीतही नसायच्या. निर्मलेला तिचं हे वागणं फारसं आवडत नसे. पण जाऊ दे, लहान आहे ती अजून, असा विचार करून, निर्मलेनी कधी तिला विरोध केला नव्हता. निर्मला जेंव्हा तिच्याशी लग्नाबद्दल बोलायला गेली. तेंव्हा तिनी तो विषय उडवूनच लावला. आपल्याला सिनेमात काम

करण्याची इच्छा आहे, व पुढे तेच करिअर करण्याचा आपला विचार तिने आईला सांगितला.

तिचं हे बोलणं ऐकून निर्मलला धक्काच बसला. तिच्या मनात हे असले विचार असतील असं कधी निर्मलेला वाटलंच नव्हतं. तेंव्हा तरी तिने तो विषय वाढवला नाही. या मुलीची समजूत कशी काढावी, याचा विचार ती करत होती. तिने श्रेयाचं बोलणं ऐकून घेतलं. त्यावर स्वतःची फारशी काही प्रतिक्रिया न देता ती आपल्या कामाला निघून गेली. आई काहीच न बोलल्यामुळे, या गोष्टीला आईची संमती आहे, आता समज श्रेयानी करुन घेतला. आई काय म्हणेल, याची तिला भीती वाटत होती. पण तसं काहीच घडलं नाही. म्हणून तिला आनंद झाला. आता आपला सिनेमात काम करण्याचा विचार सफल झाला, असं तिला वाटलं. या उलट आता तर लवकरात लवकर श्रेयाचं लग्न करून द्यायला पाहिजे, असं निर्मलानी ठरवलं. आजवर निर्मलानी श्रेयाला कधी धाकात ठेवलं नव्हतं. पण आता पश्चाताप करण्याची पाळी आपल्यावर येते की काय? अशा विचारांनी निर्मला धाकावली होती. पण आता रागावून चालणार नव्हतं. युक्तीनीच यातून मार्ग काढावा लागणार होता.

एक दिवस, मनाशी निर्धार करून, निर्मलानी श्रीयाशी बोलायचं ठरवलं. आईनी लग्नाचा विषय काढला बरोबर श्रिया रागावली. तिला वाटलं होतं, की आई आपल्याला साथ देईल. पण आई तर वेगळंच काहीतरी बोलत होती. त्या दिवशी दोघींमध्ये खूप वादावादी झाली. पण निष्कर्ष काही निघाला नाही. शेवटी शाळेची वेळ झाली, म्हणून निर्मलाला उठून जावं लागलं. पण या वादावादीमुळे श्रेया बिथरली. ती निर्मलाच्या थाऱ्याला सुद्धा उभी राहिना. मायलेकीमध्ये चांगलीच दरी निर्माण झाली. आता ही कोंडी कशी फुटायची? अशा प्रश्न निर्मलासमोर उभा ठाकला. श्रीराम आणि श्रीकृष्ण या तिच्या भावांना, या गोष्टी समजल्यावर, आता लवकरात लवकर तिचं लग्न करून टाक, अशा धोशा त्यांनी आईच्यामागे लावला होता.

आता काय आणि कसं करायचं या प्रश्नाचं उत्तर आपोआपच समोर आलं. मोठ्या सुनेच्या माहेरच्यांनी, त्यांच्या ओळखीतलं एक स्थळ सुचवलं. चंद्रहास फडके - हा मुलगा इंजिनीयर होता. एका मोठ्या आयटी कंपनीत, चांगल्या हुद्यावर नोकरी करत होता. घरची श्रीमंती खूप नव्हती तरीही ही चंद्रहास दर महिन्याला पाच आकडी पगार घरी आणत होता. चंद्राहासला आई-वडील होते. त्यांचा एक छोटेखानी बंगला सुद्धा होता. आता आणखी काय हवं होतं श्रेयासाठी? या मुलाला भेटायचा कार्यक्रम ठरवला. श्रेयाला

इतक्यात लग्नच करायचं नव्हतं. पण सर्वांसमोर तिचं काही चाललं नाही. दाखवण्याचा कार्यक्रम झालाच. श्रीयाचं सौंदर्य, आणि गणपुल्यांचं घराणं, यामुळे लग्न ठरण्यात काहीही प्रत्यवाय आला नाही.

लग्न ठरलं. श्रेया आणि चंद्रहास एक दोनदा बाहेर फिरायला जाऊन आले. श्रेयाला सुद्धा चंद्रहास मनापासून आवडला होता. पण अजूनही सिनेमाचं भूत तिच्या डोक्यातून गेलं नव्हतं. चंद्राहास बरोबर लग्न झालं तर, आपण रांधा वाढा उष्टी काढा, या भोवऱ्यात अडकू, याउलट सिनेमात गेलो तर आपल्याला खूप प्रसिद्धी मिळेल. पैसाही मिळेल. आपल्याला हवं तसं आपण वागू शकू. या विचारांनी ती भारली गेली होती. त्यामुळे तिचं मन लग्न करायला तयारच होत नव्हतं. पण आई आणि भावांसमोर तिचं काही चाललं नाही. त्यांनी ठरवलेल्या सर्व गोष्टी तिला मान्य कराव्या लागल्या.

मनापासून नव्हे, पण वर वर तरी श्रेयाला नीट बोलावंच लागलं होतं. चंद्रहासला श्रेया मनापासून आवडली होती. चंद्रहासही दिसायला चांगलाच होता. त्याचं सगळंच छान होतं. बोट ठेवायला कुठे जागाच नव्हती. श्रेयानी दाखवलेल्या नाराजीमुळे तिला फारसं न विचारताच, लग्न ठरलं देखील. पण लग्न ठरलं तरी श्रीया फारशी खुशीत नव्हती. पण तिच्या

नाराजीकडे कोणी फारसं लक्ष दिलं नाही. निर्मलाला अगदी कृतकृत्यं

वाटत होतं. इतक्या सहज सगळं काही जमून येईल येईल, याची कल्पनाच तिला नव्हती. आपण श्रीयाला

पदवीपर्यंतचं शिक्षण दिलं; आणि आता चांगला कर्तबगार नवरा तिला लाभला आहे. हे फडक्यांचं घराणंही चांगलं आहे, सुनेच्या ओळखीतलं आहे. चंद्रहास एकुलता एक आहे; भावंडांचा लबेदा त्याच्या मागे नाही, ही एक जमेची बाजू, निर्मलाला वाटत होती. आपण एका मोठ्या जबाबदारीतून चांगल्या रीतीने मुक्त होत आहोत ही भावना तिच्या मनाला सुखावत होती. पण तिच्या समाधानाला तडा गेला; तो श्रीयानी घरातून पळून जाण्याचा प्रयत्न केला तेव्हा

तीन खोल्यांचं घर ते. निर्मला आणि श्रीया बेडरूममध्ये झोपायच्या. एक दिवस श्रीया आपल्या शेजारी झोपलेली नाही, असं निर्मलाला जाणवलं. गेली असेल बाथरूम मध्ये, असं म्हणून ती तिची वाट पाहू लागली. पण दहा-बारा मिनिटे झाल्यावर सुद्धा, जेव्हा श्रीया झोपायला आली नाही, तेव्हा निर्मला खडबडून जागी झाली . ताडकन उठून बसली. बाथरूमचं दार सताड उघडं होतं. हे बघून निर्मला मनातल्या मनात चरकालीच. पण असेल इकडे

तिकडे, असं मनाचं समाधान करून तिनी आणखी दोन तीन मिनिटं वाट पहिली. तरीही श्रेया आली नाही. तेंव्हा तिला अशुभाची चाहूल लागली. तिच्या पायातली ताकदच गेली. तिला उठता येईना. पण न उठून कसं चालणार? ती प्रयत्नपूर्वक उठली. पहिल्यांदा ती पुढच्या दाराशी गेली. दार नुसताच लोटलेलं होतं. श्रेया घरातून निघून गेली आहे, ही गोष्टं तिच्या लक्षात आली.

ती मटकन खालीच बसली. श्रीया असलं काही करेल असं तिच्या मनात आलंच नव्हतं. तिच्या मनात आलं, की पोरीचं मन आपल्याला कळलं नाही हेच खरं. आता काय करायचं? पोलिसात जावं तर या गोष्टीचा गवगवा होईल. न जावं, तर श्रेयाला आता शोधायचं तरी कुठे? ही गोष्टं कळल्यावर श्रीकृष्ण आणि श्रीराम काय म्हणतील? याची तर त्यांना सर्वात जास्ती भीती वाटत होती. कसंबसं उठून निर्मलानी तिनी कुठे चिठ्ठीबिठ्ठी लिहून ठेवली आहे का ते शोधलं. तर श्रीयानी खरंच जाण्याआधी एक चिठ्ठी लिहून ठेवलेली तिला सापडली. तिनं लिहिलं होतं की, मी सिनेमात काम करण्यासाठी अमुक अमुक दिग्दर्शकांकडे जाते आहे. माझा शोध घेऊ नका. हे वाचून निर्मलेचा तर जीवच उडून गेला. शेवटी मनाचा निश्चय करून ती उठली. तिनी श्रीकृष्णाला फोन केला. काय घडलं आहे हे त्याला सांगितलं.

श्रीकृष्ण लगेच निघाला. त्याने श्रीरामलाही फोन करून, तू ही आईकडे ये, असं सांगितलं. थोड्याच वेळात दोघेही घरी पोहोचले. आल्याआल्या त्यांनी त्या किती वाजता झोपल्या वगैरे चौकशी केली.त्यांनीही आईला पोलिसात न जाण्याचा सल्ला दिला. त्यांनी श्रेयाला फोन लावला. पण तिने तो मघासारखाच कट करून टाकला. त्यांनी इंटरनेट वरून त्या दिग्दर्शकाचा फोन नंबर शोधून काढला; आणि त्याला फोन लावला. त्याला या गोष्टीची अजिबात कल्पना नव्हती. सिनेमाच्या क्षेत्रात असून सुद्धा तो अगदी साधा असावा.

तो एकदम गडबडून गेला. म्हणायला लागला, “ आप उसे रोको I मुझे कुछ मालूम नही I उसको यहॉं नही आना चाहिये I मैं उसको काम नही दे सकता I “ श्रीकृष्ण म्हणाला, ” वो अभी कहॉं है, इसका पता तो हमे मालूम नही I वो अभी टॅक्सी में होगी I इसलिये हम उसे रोक नही सकते I लेकिन अगर वो आपके यहॉं आती है, तो आप उसे वही रोक लेना I मैं उसका भाई बात कर रहा हूं I मैं भी यहॉं से अभी आपके यहॉं आनेके लिये, निकल रहा हूं I मैं तीन घंटेमें वहॉं पहुंच जाऊंगा I बस! आप उसको रोक लेना I मैं आपका उपकार कभी नही भुलुंगा I आपका पता मुझे इस नंबर पर व्हाट्सअप करना I

एव्हढं बोलून श्रीकृष्णाने फोन खाली ठेवला; आणि दोघे भाऊ आणि आई तिघेही घराला कुलूप लावून, बाहेर पडले. टॅक्सी करून, ते लगेचच मुंबईला निघाले. तोवर त्या दिग्दर्शकाने त्याचा पत्ता व्हाट्सअप वर पाठवला होता. त्या दिग्दर्शकाचं नाव गजानन होतं. त्याच्या चांगुलपणावरच आता श्रेयाचं भवितव्य अवलंबून होतं. श्रेया तिथे पोहोचल्यानंतर, आपण तिथे पोहोचेपर्यंत काही वेडंवाकडं तर घडणार नाही ना? या विचाराने तिघंही गाडीत गप्पच होती. दोन तासांनंतर गजाननचा फोन आला. तो म्हणाला, " आपकी बहन अभी मेरे यहॉं पहुंची है I आप जल्दी से आना I " हां, हम देड घंटे में पहुंच जायेंगे I " श्रीकृष्ण म्हणाला.

पहाटेच्या सुमाराला ते गजाननकडे पोहोचले. श्रेया त्यांना अगदी सुखरूप दिसली. त्यांचा जीव भांड्यात पडला. हा खरोखरच चांगला माणूस दिसतो, असं त्यांच्या मनात आलं. त्यांना पाहून श्रेया मात्र नाराज झाली. आता आपली काही धडगत नाही ही, असं तिला वाटलं. आई किंवा भाऊ कोणीच तिला काही बोललं नाही. पण गजानन मात्र लगेच बोलला. हे नसतं लचांड आपल्यामागे लागू नये, हाच त्याचा हेतू होता. तो म्हणाला, " मेरे पास अभी कोई काम नही है, मैं इनको कोई काम नही दे सकता I " हे ऐकून निर्मला अवाक झाली. कशाच्या भरवशावर श्रेयाने हे पाऊल उचललं हे तिला समजेना. निर्मलाला वाटलं आपल्याला

आता चक्कर येणार. पण आत्ताच्या क्षणी चक्कर येऊन, बेसावध राहून, चालणार नव्हतं. श्रेया विनाशाच्या कड्यावर उभी होती. तिला सावरायला हवं होतं.

निर्मलाने मन शांत केलं. ती गजाननाला म्हणाली, " भाई ,“ तिच्या तोंडून “ भाई “ असं ऐकल्यावर गजानन चमकला. ती पुढे म्हणाली, “ आप तो सचमुच मेरे भाई हो I मेरी बच्ची को अपने सुरक्षित रखा I उसकी शादी तय हुई है I अगर कुछ ऐसा वैसा हो जाता, तो उसकी पुरी जिंदगी बरबाद हो जाती I आपके उपकार मैं कभी नही भूलूंगी I

आपल्या सौंदर्याच्या जोरावर आपल्याला लगेच काम मिळेल, असं श्रेयाला वाटत होतं. पण गजाननाकडून स्पष्ट नकार ऐकल्यावर श्रेयाचा चेहरा आणखीनच पडला. आता आई आणि भावांबरोबर परत जाण्यावाचून आपल्याला काहीही गत्यंतर नाही हे तिला कळून चुकलं. गजाननाने त्यांना चहा विचारला; पण नम्रपणाने नको म्हणून ते चौघेही तिथून बाहेर पडले. टॅक्सी करून ते घरी परतले. टॅक्सीत मात्र दोन्ही भावांना रहावलं नाही. ते आईलाच दोषी ठरवत होते. ऐकून घेण्यावाचून दुसरा काही पर्याय निर्मला जवळ नव्हता. तिने काहीच विरोध केला नाही, त्यामुळे बोलणं वाढलं नाही.

थोड्याच वेळात सगळ्यांचाच जरा डोळा लागला. तोवर पुणं आलंही. Working day असल्यामुळे, श्रीकृष्ण व श्रीराम यांना घरीच जावं लागलं. त्यामुळे निर्मलला जरा बरंच वाटलं. या विषयावरचं बोलणं तिला टाळायचंच होतं. आता घरात फक्त निर्मला आणि श्रेया, दोघीच होत्या. दोन्ही भाऊ आपापल्या घरी गेल्यामुळे श्रेयाही मोकळी झाली. न बोलताच दोघी आपापलं काम करत होत्या. शेवटी श्रेयाला राहवेना. आई काहीच न बोलल्यामुळे तिला जास्तच अपराधी वाटत होतं. भावांशी बोलण्यापेक्षा आईशी बोलणं तिला सुसह्य वाटलं. ती आईजवळ गेली. आईला मिठी मारत ती म्हणाली, “ आई रागावलीस माझ्यावर? “

निर्मला म्हणाली, ” रागावले नाही, पण मला वाईट मात्रं वाटलं. मला विश्वासात न घेता तू आपल्या मनानी निर्णय घेतलास. तशी वागलीस सुद्धा. किती धोका पत्करला होतास तू ; कल्पना आहे का तुला? गजानन सभ्य आणि बरा निघाला म्हणून बरं आहे . नाहीतर काय झालं असतं तुझं? मला तर कल्पनेनीही कापरं भरतं आहे. “ श्रेयाची मान आपोआपच खाली गेली. मला सांगायचंस न तुला काय करावंसं वाटतं आहे ते. आई मी तुला सांगितलं होतं, पण तू तर माझं लग्नच ठरवून टाकलंस. माझ्या इच्छेबाबत काही सुद्धा बोलली नाहीस माझ्याशी.“ निर्मला म्हणाली, अगं माणसाला

काही विचार करावा लागतो की नाही? एवढ्या कठीण प्रश्नाचं उत्तर लगेच कसं देता येईल!. “

“ मग लग्नं का ठरवून टाकलंस? “ श्रेया तिला म्हणाली. या प्रश्नाला उत्तर देत निर्मला म्हणाली, “ तुझ्या सारख्या तरुण मुलीला असं काही करावंसं वाटणं ठीकच आहे गं! पण त्या गोष्टीचा सर्व बाजूंनी विचार केल्यावर मला वाटलं की तू निवडलेल्या मार्गावर फारच धोके आहेत. मी एकटी बाई त्याला पुरी पडणार नाही. तेव्हाच चंद्रहासच्या स्थळाबद्दल कळलं. त्याची सगळी माहिती आपल्या अपेक्षा पूर्ण करणारी होती. एकदा स्थळ पाहायचं ठरवल्यावर, सगळं लगेच लगेच घडत गेलं. मला वाटलं की चंद्रहासच्या सहवासात तू तुझा हा वेडा हट्ट विसरशील. म्हणून काही बोलायचा प्रश्नच उद्भवला नाही. तुझी चिट्ठी वाचल्यावर मी अतिशय disturb झाले. काही सुचेनासं झालं होतं मला. देवाची कृपा म्हणूनच आपण यातून सहीसलामत सुटलो.

“ आई, मला एकदा तरी काम करायचं आहे गं सिनेमात. असं म्हणून श्रेया आईच्या गळ्यातच पडली. आईचं हृदय ते! कळवळलं मुलीसाठी. पण त्याचवेळी तिला अगदी हतबल वाटलं. वाटलं, आज सदानंद असता आपल्या साथीला तर कदाचित आपण मुलीची एव्हढी इच्छा पूर्ण करू शकलो असतो. दुर्दैव

आपलं. तरी देवांनी पुष्कळच संथ दिली आहे आपल्याला. कष्ट पडले पण आतापर्यंत तरी अपयश आपल्या सावलीला उभं राहिलेलं नाही. देवा, अशीच तुझी कृपा राहू दे माझ्या एकखांबी संसारावर. असं मनाशी म्हणत तिनी देवाला हात जोडले.

आता अजून बसून चाललंच नसतं. आज काही शाळेला सुटी नव्हती. ती श्रेयाला म्हणाली, “ बाई गं, मी आता शाळेत जाणार घरात तू एकटी, आता पुन्हा काही असलं वेडं धाडस करू नकोस हं! श्रेया काहीच बोलली नाही. तिनी फक्त आसू भरल्या नजरेनी आईकडे पाहिलं. काय नव्हतं त्या नजरेत? प्रेम होतं, आईबद्दलचा विश्वास होता, विनवणी होती आणि क्षमायाचना सुद्धा होती. तिनी श्रेयाच्या पाठीवर थोपटल्यासारखं केलं आणि ती आपल्या कामाकडे वळली. “ आई, जा तू शाळेला, आज मी स्वयंपाक करून ठेवीन तू येईपर्यंत.” श्रेया म्हणाली. निर्मलानी समाधानाने आपल्या मुलीकडे पाहिलं, शाळेत जायचं अगदी जिवावर आलं होतं तिच्या. तिला वाटत होतं की आज श्रेयाला सोबतीची गरज आहे. पण तिचा नाईलाज होता. परीक्षा जवळ आल्या होत्या, सुटी मिळणं अगदी अशक्य होतं. विचारांच्या आवर्तात सगळं आटोपून ती शाळेला निघाली सुद्धा.

शाळेत जात जात पुन्हा तिचं विचारसत्र सुरु झालं. आता ही गोष्टं फडक्यांना सांगायची की नाही? तिच्या समोर विचारांचं द्वंद्व उभं राहिलं. एक मन म्हणत होतं की सांगायला पाहिजे, तर दुसऱ्या बाजूनी भीती वाटत होती की त्यांनी हे लग्न मोडलं तर? एवढ्यात शाळा आली आणि तिचं विचारचक्र थांबलं. वर्गात गेल्यावर तिला काल घडलेल्या गोष्टीचा विसरच पडला. खरोखरंच लहान मुलांचा सहवास, मग ती कुठल्याही वयाची असू देत, आनंददायी आणि सगळं विसरायला लावणारच असतो. शाळेतून घरी जातांना मात्रं तिचा पक्का निश्चय झालेला होता, की ती आता तरी कालची घटना फडक्यांकडे सांगणार नाहीय. उगाच विषाची परीक्षा नको. निर्मलच्या घराच्या बाहेर कालचं प्रकरण गेलंच नव्हतं. देवंच पाठीशी होता म्हणून बरं. गजाननही चांगला माणूस निघाला.

आता निर्मलाला फडक्यांकडे जायलाच हवं होतं. साखरपुड्याची तारीख नक्की करायची होती. दुसऱ्या दिवशी निर्मला फडक्यांकडे गेली. दोन्ही घरांच्या सोयींनी साखरपुड्याची तारीख ठरवली. आणखी पंधरा दिवसांनी साखरपुडा होणार होता. तारीख ठरल्यावर निर्मलाच्या फारसं जाणिवेत न येता, निर्मलानी त्यांना घडलेली गोष्टं सांगून टाकली. आणि मग मात्र ती मनातून चरकली. अरेच्च्या आपण तर ही गोष्टं सांगायची नाही असा ठरवलं होत. आपण तर बोलून गेलो. आता काय घडेल? ती मनातून

धास्तावलीच. पण घडलं उलटंच. चंद्रहासचे बाबा म्हणाले, " निर्मलाबाई तुम्ही प्रांजळपणे ही गोष्टं आम्हाला सांगून आमच्यावर विश्वास दाखवला आहेत. अहो चुकतात मुलं कधी कधी. आपणच त्यांना समजून घेतलं पाहिजे. हे शब्द ऐकून निर्मला भारावूनच गेली. आपण श्रेयांकरता अगदी योग्य स्थळ पाहिलं आहे, याबाबत आता त्यांच्या मनाची खात्रीच पटली. भरीस भर म्हणून की काय चंद्रहास म्हणाला, " मला आवडेल श्रेयाने एखाद्या सिनेमात काम केलं तर." त्याच्या आईनी त्याच्याकडे डोळे मोठे करून पाहिलं, तेंव्हा तो म्हणाला, " आई अगं, आता हे सिने - विश्व सुद्धा आव्हानात्मक झालेलं आहे. आता सिनेमात काम करणं या गोष्टीला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. पूर्वी नाडलेल्या, गरजू बायकाच या क्षेत्रात यायच्या आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. मला खरंच आवडेल श्रेयाने सिनेमात काम करणं. " आता तर अगदी कमालच झाली! काय म्हणतो आहे चंद्रहास? आपल्याला तर वाटलंच नव्हतं अशी काही प्रतिक्रिया फडक्यांकडून येईल, अशी आपली अपेक्षाही नव्हती. बर झालं आपण सांगून टाकलं ते. मागाहून काहीतरी कळण्यापेक्षा झालं ते बरंच झालं. पण या गोष्टीला चंद्रहासच्या आईचा विरोध आहे, हे निर्मलाच्या लक्षात आलं. तिचा स्वतःचंही या गोष्टीला विरोधच होता.

खुशीतच निर्मला घरी आली. आल्या आल्या, तिनी श्रीकृष्णाला फोन लावला. त्याला घडलेली सगळी हकीकत सांगितली. हे सगळे ऐकायला श्रेया घरातच होती. तिला जेव्हा कळलं की तिने एखाद्या सिनेमात काम करायला चंद्रहासची परवानगी आहे; तेव्हा ती खुशच झाली. आता तर ती आपल्या मनासारखं करून घेण्याकरता चंद्रहासचाच वशिला लावणार होती. त्यांची जेंव्हा पुन्हा भेट झाली, तेंव्हा कधी चंद्रहास कडून हा विषय कधी निघतोय याची ती वाट बघत होती. संधी मिळाल्याबरोबर तिने आपली इच्छा त्याच्याजवळ व्यक्त केली; आणि त्यानेच हा विषय आईजवळ काढावा असं सुचवलं. पण ते करायला चंद्रहास तयार झाला नाही. तो म्हणाला की ते बरं दिसणार नाही. त्यापेक्षा आईशी तूच बोल. फार तर तेंव्हा काहीतरी कारण काढून मला बोलाव. माझ्यासमोर हा विषय निघाला तर तेंव्हा मी आईशी बोलेन. पण मी आपणहून विषय काढून त्यांच्याशी बोलणं बरं दिसणार नाही. श्रेय चांगलीच तयार होती. ती म्हणाली, उद्या दुपारी तू मला फोन कर. संध्याकाळी आपण फिरायला जाऊ या. तुझा फोन आला की मी आईला विचारेन. मग संध्याकाळी तू आलास की मी आईजवळ हा विषय काढीन.

अश्यातह्रेनी श्रेयानी आधीच setting लावून ठेवली होती. त्याबरहुकूम सगळ्या गोष्टी घडल्या. चंद्रहासनी पुन्हा एकदा

आपल्याला श्रेयानी सिनेमात काम करणं आवडेल हे सांगितलं. चंद्रहास पुन्हा एकदा सांगेल असं त्यांना वाटलं नव्हतं. त्यानी असं सांगितल्यावर आता काय करायचं या पेचात निर्मला अडकली होती. पण तात्पुरता तरी तो विषय मनातून काढून टाकला. आता तिला साखरपुड्याच्या कार्यक्रमाचं नियोजन करायचं होतं. पण निर्मलानी जरी तो विषय मागे टाकला, तरी श्रेया आता तो विषय मागे पडू देणार नव्हती. तिने आईचे पाठ धरली. शेवटी नाईलाज म्हणून, निर्मलानी गजाननला फोन केला. त्यानी भावाच्या नात्यानी आपल्याला मदत करावी अशी त्याची विनवणी केली.

शेवटी त्याला म्हणावं लागलं, की बघतो काय जमेल ते. यानंतर निर्मला त्यातून मोकळी झाली. तिला करता येण्याजोगं होतं ते तिनी केलं. आता यापुढचं तिच्या हातात काहीच नव्हतं. साखरपुड्याचे दिवस जवळ येत होते, ती साखरपुड्याच्या तयारीत बुडून गेली. साखरपुडा अगदी थाटामाटात नव्हे, पण थोड्या लोकांच्या उपस्थितीत, हौसेनी साजरा झाला. श्रेया आणि चंद्रहास तर हवेतच तरंगत होते. आता लग्नाची तारीख ठरवायची होती. त्याच्या आधीच गजाननाचा फोन आला की एका मिडिया हाऊसतर्फे एक सिनेमा करायचा ठरवला आहे. त्यांना मी श्रेयाबद्दल सांगितलं आहे. ते श्रेयाला स्क्रीनटेस्टसाठी बोलावणार आहेत. तुमच्या फोन नंबर मी त्यांना दिला आहे. तुमच्या स्क्रीनटेस्टच्या

दिवशी, मी तुम्हाला भेटेनच. सिनेमाचं नाव “ करार “ असं आहे. एका एकट्या स्त्रीच्या लढ्याची ही कहाणी आहे. गजानन निर्मलानी दिलेल्या “ भैया “ या हाकेला जागला होता. या फोनमुळे निर्मलाच्या मनाचा गोंधळ अधिकच वाढला. तिला पुन्हा फडक्यांकडे जावं लागलं.

तिला जी गोष्टं अवघड वाटत होती, ती चंद्रहासला अगदी सोपी वाटली. त्याच्या आई-वडिलांच्या नाराजीकडे निर्मलाचं लक्ष लागून राहिलं होतं. तिला काळजी वाटत होती. पण चंद्रहास शांत होता. त्याने अतिशय चांगल्या शब्दात ही किती मोठी संधी आहे, ही गोष्टं आई-वडिलांना पटवून दिली. मग तो निर्मलाला म्हणाला, “ आई, तुम्ही अजिबात काळजी करू नका. त्या लोकांशी बोलण्याचं सगळं काम मी स्वतः करेन. तुम्हाला हवं असल्यास, माझ्या कामाची ॲडजस्टमेंट करून, मी तुमच्याबरोबर शूटिंगला सुद्धा येईन. तुम्ही फक्त हो म्हणा. “ आता पहिल्यांदा चंद्रहासची आई बोलली. हंसत हंसत त्या म्हणाल्या, “ आमच्या मुलानीच ही जबाबदारी घेतल्यावर आम्ही काय विरोध करणार! सगळं सुरळीत होऊ दे म्हणजे झालं! चला, आता मी छानशी कॉफी करते आपल्यासाठी.” सगळं गंभीर वातावरण विरघळून गेलं.

खरंतर आता निर्मलाला काळजी करण्याचं काही कारण नव्हतं. पण आईचं मन ते! सगळी कामं करता करता मनाच्या अगदी कोपऱ्यात कुठेतरी या सगळ्या गोष्टी नीट घडतील की नाही याची चिंता तिला लग्नं पार पडेपर्यंत वाटंतच राहिली. जेव्हा तिने या सगळ्या गोष्टी श्रीकृष्ण आणि श्रीरामला सांगितल्या, तेव्हा त्यांना यातलं काहीच आवडलं नाही. त्यांनी निर्मलालाच दोष दिला. तू तिथे नसते हट्ट पुरवते आहेस, याची काही गरज नाही वगैरे अनेक गोष्टी त्यांनी निर्मलाला ऐकवल्या. गप्प राहून सगळे ऐकून घेण्यावाचून दुसरा काही पर्याय, निर्मला जवळ नव्हता. खाणं-पिणं झाल्यावर, जरा नाराजीतच दोघेही आपापल्या घरी परतले. नशीब श्रेया घरी नव्हती. नाहीतर नक्की वादावादी झाली असती.

यथावकाश श्रेयाला स्क्रीनटेस्ट करता बोलावलं गेलं. त्यादिवशी सुद्धा वेळ काढून चंद्रहास त्यांच्याबरोबर आला होता. त्यामुळे निर्मलेला कसलीही तसदी पडली नाही. मीडिया हाउसनी लगेचच सगळं OK असल्याचं सांगितलं. आणखी आठ दिवसांनी शूटिंगला सुरुवात होणार होती. पुढल्या तीस / चाळीस दिवसात शूटिंग संपणार होतं. म्हणून लग्नासाठी साधारणपणे दोन महिन्यानंतरचा मुहूर्त काढण्यात आला. चंद्रहासनी केलेल्या मदतीमुळे, निर्मलाला सगळं खूप सोपं गेलं. श्रेयानाही तिला मिळालेल्या संधीचं सोनं केलं. श्रेया सिनेमात काम करणार ही गोष्टं

लपून राहिली नाही. प्रत्येकाने त्यावर आपापलं मत व्यक्त केलं. कोणी काहीही बोललं, तरी निर्मलानी कधीच कोणाशी वाद घातला नाही. श्रेयाच्या सासरची मंडळी साथ देत आहेत, म्हणून कोणाच्या बोलण्याचा विचारच आपण करायचा नाही, अशा निर्णय निर्मलानी मनोमन घेऊन टाकला होता. सगळं सुरळीत चाललं होतं, त्यामुळे श्रीराम/श्रीकृष्ण यांच्या विरोधालाही फारशी धार उरली नाही.

शूटिंग संपता संपता, मिडिया हाऊसनं श्रेयाला न्यूज रीडर म्हणून नोकरी ऑफर केली. चंद्रहासच्या सल्ल्यानी श्रेयाने ती नोकरी स्वीकारली. निर्मलाबाई तर स्तिमित होऊन, पाहातच राहिल्या. आपण किती घाबरत होतो, असं आता त्यांना वाटत होतं. श्रेयाच्या सासू-सासऱ्यांना आता श्रेयाच्या हुशारीचं कौतुकच वाटत होतं. या सगळ्या काळात श्रेया आणि चंद्रहास, एकमेकांच्या खूपच जवळ आले होते. सगळ्या गोष्टींमध्ये ते, एकमेकांशी चर्चा करून निर्णय घेत होते. निर्मलेला तर, आपल्या जावयाला कुठे ठेवू आणि कुठे नको, असं झालं होतं. निर्मलाच्या अंगी आता दहा हत्तीचं बळ आलं होतं. लग्नाची तयारी जोरात सुरु होती. एकटी असली, तरी निर्मला, सालंकृत कन्यादान करणार होती. श्रीराम आणि श्रीकृष्ण आपल्या बायकांसहित आईला हवी ती मदत करत होते.

लग्नाचा दिवस येऊन ठेपला. लग्नमंडपात जो तो श्रेयाचं, सिनेमा, नोकरी आणि आता लग्नं, या सगळ्या चढत्या भाजणीचं कौतुक करत होता. सगळेच तिचं आणि निर्मलेचं अभिनंदन करत होते. लग्न लागलं, निर्मलाचा जीव भांड्यात पडला. ती विचार करत होती, 'आपण आपली सगळी कर्तव्य चांगल्या रीतीने पार पाडू शकलो; खरोखरच देवच आपल्या पाठीशी होता म्हणायचा.' एवढ्यात तिला शाळेचा चपराशी आलेला दिसला. मुख्याध्यापकांनी त्याला आपल्याकडे का पाठवलं असावं! त्यांना तर माहीत आहे की आज आपल्या मुलीचं लग्नं आहे. ते यायचे आहेत की जेवायला. मग काय कारण असावं बरं? चपराशी जवळ आला. त्याने एक लिफाफा तिच्या हातात दिला. लिफाफा उघडलेला दिसत होता. हा काय प्रकार आहे, हे तिला कळेना.

तिने लिफाफ्यातला कागद बाहेर काढला. ती वाचायला लागली. वाचता वाचता तिच्या डोळ्यातून पाणी वाहायला लागलं. तिला पुढची अक्षरे दिसेनात. निर्मला पत्रं वाचून रडते आहे ही बातमी क्षणार्धात कानोकानी पसरली. तशीच ती श्रीरामच्याही कानावर गेली. तो हातातलं काम टाकून आईकडे धावला. त्याने तिच्या हातातून पत्रं घेतलं. वाचलं; आणि हंसत हंसत आईला मिठी मारली. तो म्हणाला, "आई, अगं रडतेस काय अशी वेड्यासारखी, सगळे लोक कावरे बावरे झालेत तुला अशी रडतांना

पाहून.” एवढं तो बोलेस्तोवर, रडवेली झालेली श्रेया नि तिच्या पाठोपाठ चंद्रहासही आले. श्रेया आईला मिठी मारून रडायला लागली. तिचा जीव आईकरता कासावीस झाला होता. श्रीराम तिला म्हणाला, “ ए वेडाबाई, रडू नकोस . आधी हे पत्रं वाच. श्रेयाने पत्रं हातात घेतलं; आणि समोर असलेल्या श्रीरामलाच मिठी मारली. काय आहे त्या पत्रात हे अजूनही इतर लोकांना कळलंच नव्हतं.

श्रीरामनी श्रेयाला जवळ घेतलं तिच्या पाठीवर थोपटत तो म्हणाला. “आज माझी आई जिंकली आहे. तिला उत्तम शिक्षिका म्हणून राष्ट्रपतींच्या हस्ते पारितोषक मिळालं आहे. हे पत्रं त्याबाबतंच आलं आहे.” हे ऐकून सगळयांनाच आनंद झाला. निर्मलाच्या आईनी निर्मलाला जवळ घेतलं आणि ती म्हणाली आहेच माझी निर्मला हुशार. निर्मला नव्हे ही तर माझी अपराजिता!

# परित्यक्ता

मी – परित्यक्ता. संसारात असलेली, माझ्या मुलांची आई, कोणाची मामी, कोणाची वहिनी, कोणाची काकू, आणि नाही म्हणायला मी नवऱ्याची बायको सुद्धा आहे; पण मी संसारी असून सुद्धा, माझ्या नवऱ्याने टाकून दिलेली बाई आहे; याची मला पूर्ण कल्पना आहे. तुम्हाला वाटेल की मी इथे का राहते? तर प्रश्न असा आहे, की मी जाऊ कुठे? या अफाट जगात या घराशिवाय बाहेर कुठेही ही माझ्यासाठी एखादा कोपरा सुद्धा नाही. चुकून एखादा कोपरा सापडलाच, तर मला सोबत करील, निदान आपलं म्हणेल, अशी एक सुद्धा व्यक्ती नाही. नाही म्हणायला, माझी मुले आहेत; फार प्रेम करतात हो माझ्यावर; पण त्यांना दुखवून हे घर सोडून जायचं धाडसही माझ्यात नाही, हेच खरं!

थांबा मी तुम्हाला कहाणी सांगते माझ्या संसाराची. एक आटपाट नगर होतं. तिथे एक सामान्य कुटुंब राहत होतं. डोळ्यात भरेल, काहीतरी विशेष असेल, असं काही त्या घरातल्या कोणा जवळच नव्हतं. तरी आपल्या परीने ते कुटुंब सुखाने राहत होतं. आई वडील, एक मुलगा आणि एक मुलगी. एवढेच कुटुंब. त्यांना

भारी नातेवाईकही नव्हते. मुलगा – अनंत नाव त्याचं. तो बी ए झाला. एका खाजगी कंपनीत नोकरीला लागला. खूप शिकायचं, भरपूर पैसे देणारी नोकरी मिळवायची, श्रीमंतीत लोळता आलं पाहिजे, इतके खूप पैसे मिळवायचे असली काही स्वप्न, या घरातल्या माणसांजवळ नव्हतीच. त्यामुळे त्याच्या त्या सामान्य नोकरीवर घरातलीच बाकीची तिघेजण खुश होते. मी मुलगी, अलका नाव माझं. सामान्य रूपाची, सामान्य बुद्धिमत्तेची. फारशी महत्त्वकांक्षा नसलेली, असेल त्यात समाधान म्हणणारी, आमच्या घराला साजेशीच होते मी.

एक दिवस अघटीत घडलं. अचानक वडिलांचे स्नेही एका मुलाला घेऊन आले. स्वानंद शंकर देशपांडे नाव त्याचं. मुलगा स्मार्ट होता. शिकलेला होता. त्याला पुढे शिकायचं होतं. लग्न करायचं नव्हतं. पण आईच्या आग्रहाखातर लग्नाला तयार झाला. मुली पाहणं , निवड करणं, या कशात त्याला रस नव्हता. आई म्हणते म्हणून लग्न करायचं. म्हणून तो आमच्यासारख्या सामान्य कुटुंबातल्या मुलीला पहायला आला. त्याने पसंतही करून टाकलं मला. घरातले सगळे आनंदले. अकस्मात उजळलेलं माझ नशीब, काय चाललंय, ते खरं आहे की खोटं आहे, काही काही मला समजत नव्हतं. माझा होकार-नकार विचारण्याचा तर काही प्रश्नच नव्हता. सगळ्यांनीच माझा होकार गृहित धरला होता.

आमचं लग्न ही अगदी सामान्य पद्धतीने झालं. तरीही या लग्नानी मी मी थोडीशी मोहरले होतेच. माझा बधिरपणा हळूहळू कमी होत गेला. मला काय मिळालं आहे, याची मला थोडी थोडी जाणीव व्हायला लागली. मी भाग्यवान आहे, असंही आता मला वाटायला लागलं. माझा नवरा, तोही हळूहळू बदलतो आहे की काय असं वाटावं, इतकं चांगलं वागायला लागला. छान म्हणजे, त्याला संसारात रस वाटायला लागला होता बहुधा. स्वयंपाक चांगला झाला की सांगायचा, कधीतरी फिरायला चल म्हणायचा, एखाद्या दिवशी आम्ही हॉटेलमध्ये सुद्धा जायचो. माझे सासू-सासरे, अगदी साधे होते स्वभावानी. त्यांनी मला कधीच त्रास दिला नाही. कधी कमी लेखलं नाही. मीही माझ्या परीने त्यांचा मान राखत असे. त्यांना घरात वेळच्या वेळी सगळं मिळेल, याची मी काळजी घेत असे. त्यांना काय आवडतं काय नाही, हे मी हळूहळू जाणून घेतलं आणि घरात त्या गोष्टी मी आवर्जून करत असे. माझ्या नवऱ्याला सुद्धा, माझं हे वागणे आवडायचं. तसं त्याने बोलुन सुद्धा दाखवलं होतं.

छान चालला होता संसार आमचा. माझ्या माहेरची मंडळी तर, जावयावर अफलातून खुश होती. कल्पना नसताना, अपेक्षा नसतांना त्यांच्या मुलीला, ‘ भाग्यवती मी ‘ असं म्हणण्याजोगं स्थळ मिळालं होतं. आमच्या संसारवेलीवर दोन फुलं सुद्धा

उमलली. एक मुलगा आणि एक मुलगी. आमचं षटकोणी कुटुंब होतं. सगळे एकमेकांना हवेहवेसे होतो. माझ्या दोन्ही मुलांची नावे आजीनी ठेवली. मुलगी मोठी. तिचं नाव – मैत्रेयी, आणि मुलगा दोन वर्षांनी लहान, त्याचं नाव श्रीकृष्ण. दोन्ही मुलांच्या बाललीला बघत, आम्ही सगळे अगदी सुखात होतो. माझ्या नवऱ्याचा संसाराकडे बघण्याच्या दृष्टिकोण खूपच बदलला होता. सगळ्या गोष्टींमध्ये तो अगदी आनंदानी सहभागी होत होता. आमची आर्थिक स्थितीही चांगली होती. हुशारच होता ना तो.

मुलगी शाळेत जायला लागली. तिच्या वडिलांसारखीच ती हुशार होती. मलाही त्याचा अभिमान होता. मुलाची हुशारी तर आत्तापासूनच दिसत होती. मी मुलीला शिकवता शिकवता, तोही आपल्या आपणच शिकत होता. खूप आनंदात होते मी. दुधात साखर पडावी, तसं एक नवीनच दालन उघडलं आमच्यासाठी. माझ्या नवऱ्याला, स्वानंदला एक वर्षासाठी इंग्लंडला जायचं होतं. बायको – मुलांनाही बरोबर नेता येणार होतं. तिकडे एक छोटेखानी घर आमच्यासाठी उपलब्ध करण्यात आलं होतं. जाण्यायेण्याचा खर्च सुद्धा परस्परच होणार होता. मी खूप आनंदले. असल्या गोष्टीची मी कधी कल्पनाच केली नव्हती. एक वर्षभरा करता जायचं, म्हणजे खूपच तयारी करायला हवी होती. एका महिन्यात एव्हढी तयारी करणं जरा दगदगीचंच होतं. पण मी धावपळ करीत,

सगळ्या गोष्टी केल्या. आजी आजोबांसाठी सुद्धा घरात जेवढ्या म्हणून गोष्टी आणून ठेवता येतील, तेवढ्या आणून नीट लावून ठेवल्या. त्यांना त्रास होऊ नये ह्याची मला काळजी होती. अखेर माझीच माणसं होती ना ती. मुलं तर नुसती नटाटली होती. आम्ही आता इंग्लंडला जाणार, अशी बढाई मित्रांजवळ सांगत होती. माझ्या आई-वडिलांनी, आमच्या आजी-आजोबांची काळजी घेऊ, असं आपणाहूनच सांगितलं होतं. सगळ्या बाजूंनी मला भरभरून सुख मिळत होतं; आणि तेव्हा कळलं नाही, पण एकीकडे बहुधा माझे दैव माझ्याकडे बघून खदाखदा हसत होतं.

होता होता जायचा दिवस आला, सासू – सासऱ्यांना सोडून जायचं मला खरंच जिवावर आलं होतं, पण एकीकडे इंग्लंड खुणावत होतं. पहिलाच विमानाचा प्रवास, त्याचं अप्रूप काय सांगू! भुर्रकन उडालो आम्ही, असंच मला वाटलं. विमान निघाल्यावर हळूहळू छोटी-छोटी होत जाणारी घरं, निळा समुद्र,खिडकीतून दिसणारं आकाश, सारं काही मला सुंदर वाटत होतं. विमान उडताना, मुलं अजिबात घाबरली नाहीत. कशाला घाबरतील? त्यांचे आई-वडील होते ना काळजी घ्यायला. ह्याचा मुद्दाम उल्लेख करण्याचे कारण म्हणजे, भविष्यात काही वेगळंच लिहून ठेवलं होतं! विमानातली एअर होस्टेस, तिचं अदबीनं बोलणं, वागणं, सगळंच आम्हाला मोहन टाकत होतं; आणि हे सगळं आपल्याला,

आपल्या नवऱ्यामुळे, - स्वानंदमुळे अनुभवायला मिळतं आहे, या जाणिवेनी स्वानंदचा मला फार अभिमान वाटत होता. माझ्या मर्यादा तर मला माहित होत्याच.

इंग्लंडचे आमचे दिवस, सगळ्या संसाराच्या काळातले, ' सर्वात सोनेरी दिवस' ' म्हणावे लागतील. मुलांना तिथल्या शाळेत प्रवेश मिळाला होता. थोड्याच दिवसात मुलं तिथल्या इंग्रजी भाषेला सरावली. फारशी सरावले नाही ती मीच. कारण इथे घरातली सगळी कामं, स्वतःलाच करायची होती. त्यामुळे मी स्वतंत्र अशी बाहेर कधी गेलेच नाही. गेले ती त्यांच्याबरोबरच. मग मला काहीच बघावं लागायचं नाही. अर्थात यात काही तरी वावगं घडत आहे, असं काही मला वाटलंच नाही. माझेच नव्हते का स्वानंद. आमचं छोटेखानी घर फार टुमदार आणि छान होतं. सगळ्या सोई होत्या तिथे. त्यामुळे सगळी कामं करावी लागली, तरी कष्ट फारसे होत नसत. शिवाय पाहुण्या – रावळ्यांचा पसारा नव्हता. अगदी स्वर्ग सुख उपभोगत होते मी. वर्ष कसं सरलं, कळलंच नाही. आम्ही परत आलो. कित्येक दिवस मला व मुलांना बोलायला दुसरा विषय नव्हता. मुलांना तर तिथली शाळा फारच आवडली होती. त्यांना वाटत होतं, नेहमीकरताच आपण तिथे राहायला हवं होतं.

माझ्या माहेरी काय आणि आजूबाजूला काय, माझा भाव चांगलाच वाढला होता. काहीच न करता, इंग्लंड रिटर्न अशी उपाधी मिळाली होती ना मला. असे सहा महिने जातात न जातात तोच स्वानंदना पुन्हा इंग्लंडला जायची वेळ आली. यावेळी मात्र मुलांच्या शाळा चालू असल्यामुळे, आम्हाला त्यांच्याबरोबर जायचं नाव सुद्धा काढता आलं नाही. त्यात काही विशेष वाटलंही नाही. मुलांच्या शाळेचंही महत्वं होतं नं! स्वानंद चार महिन्यांनी परत आले. किती आनंदाचा आणि उत्साहाचा दिवस होता तो. पुन्हा एकदा आम्ही इंग्लंडला राहिलो होतो, त्या सगळ्याची उजळणी झाली. मुलांनी तर नाना प्रश्न विचारून स्वानंदना भंडावून सोडलं होतं. मी जरा गप्प गप्पच होते, कारण इतर सगळेजण बोलत होते. रात्र होतीच की मला बोलायला!

त्या रात्री आम्ही खूप बोललो. यांना आता वारंवार परदेशी जावं लागणार होतं. एकाच देशात नाही तर निरनिराळ्या देशांमध्ये. मला खूप अभिमान वाटला. किती हुशार आहेत स्वानंद! त्या खुशीतच बोलता-बोलता कधी झोप लागली, ते मला कळलंच नाही. सासू-सासऱ्यांना वाटायचं, माझ्या पायगुणामुळेच स्वानंदची उत्तरोत्तर प्रगती होते आहे. पण मला खरं माहिति होतं. त्यांची हुशारी त्यांना पुढे नेत होती. आजी आजोबंचं वय वाढत होतं, मुलांच्या इयत्ता पुढे पुढे जात होत्या. स्वानंदांच्या परदेश वाऱ्या, व

त्यांचे दिवस वाढत होते. या सगळ्या व्यापात, मी मात्र घरात अगदी अडकून पडले होते. अर्थात त्यात काही चुकीचं घडतंय असं मला मुळीच वाटत नव्हतं. मला वाटत होतं, बाहेरची बाजू ते सांभाळतात आणि घरातली मी. ही विभागणी योग्यच होती. माझ्यावर काहीतरी अन्याय होतोय असं मला मुळीसुद्धा वाटत नव्हतं. मी माझ्या संसारात रमून गेले होते. पण इथेच पहिली ठिणगी पडली होती.

स्वानंद देशोदेशी हिंडत होते, नवंनवं जग पाहात होते. नवी नवी माणसं त्यांना भेटत होती. वागण्याच्या, विचार करण्याच्या, वेगवेगळ्या पद्धती त्यांना पाहायला मिळत होत्या. ते बदलत होते; आणि मी जिथल्या तिथेच होते. एकदा इंग्लंडला जाऊन आल्यामुळे माझ्यात काहीच फरक पडला नव्हता. थोडीशी टापटीप शिकले, यापलीकडे काही नाही. आपण काहीतरी शिकावं, पुढे जावं, आपलं म्हणून काहीतरी करावं , असलं काही मला कधी वाटलंच नाही. मला पहिला धक्का बसला, तो एका पार्टीला जायचं असताना, स्वानंद मला तू नको येऊस असं म्हणाले तेव्हा. घरातलं आटपून मी पार्टीला जाण्याची तयारी करत होते. स्वानंद मला म्हणाले, “ तू येणार आहेस पार्टीला?” मी म्हटलं, “ असं का विचारताय? नेहमी आपण बरोबरच जातो की. ”

“ ते ठीक आहे ग. पण येऊन तू करणार काय? बोलणार कोणाशी? “ आजवर असा प्रश्न आम्हाला पडलाच नव्हता. अनेकदा पार्टीला जायची वेळ यायची, त्यामुळे बऱ्याच जणांशी माझी ओळख होती, आणि पार्टी योग्य बोलण्याचं कसंबही माझ्याकडे होतं. पार्टी मॅनर्स तर होतेच होते. तरीही यांनी मला असं विचारावं, याचं मला वैषम्य वाटलं. पार्टीला तर मी गेले, पण जाण्यातला उत्साह केव्हाच गळून पडला होता. आम्ही दोघे जाता-येताना गप्प गप्पच होतो.

पुढच्या वेळेला पार्टीला जाण्याचा प्रसंग आल्यावर, मी आपण होऊनच माघार घेतली. “मी आज खूप दमले आहे, आज नाही आले पार्टीला तरी चालेल ना? “ असं मी विचारलं, स्वानंदनी पण धड ना होकार, धड ना नकार, अशा हुंकारात उत्तर दिलं. मीही पडत्या फळाची आज्ञा घेतली; आणि आवरून लवकरच निजून गेले.

त्यानंतर मी पार्टीला जाण्याचा विषय कधी निघालाच नाही. स्वानंदच्या पहिल्या वेढ्यातून मी बाहेर पडले होते. ही एवढी घटना सोडली, तर त्यांच्या वागण्यात बाकी कुठलाही फरक नव्हता. सगळं नेहमीसारखंच चालू होतं. पण ही घटना माझ्या मनाचा, पिच्छा सोडायला तयार नव्हती. दिवस पुढे पुढे चालले होते. माझ्या

मागचे व्यापही वाढत होते. नंतर एकदा दुसरी घटना घडली. स्वानंद आणि मुलं काहीतरी बोलत होती, मी मधेच विचारलं, या रविवारी आपण सर्वांनी सिनेमाला जायचं का? मुले तर बोलायची थांबली, पण स्वानंद म्हणाले, “ थांब ग, उगाच बोलू नकोस. आम्ही काहीतरी महत्त्वाचं बोलतोय, मध्ये मध्ये का करतेस? समजत तर काही नाही.

खरोखरच माझा विषय नव्हता. पण मी त्या विषयात काही बोललेही नव्हते. मला थांबावायचं होतं, तर नीट शब्दात सांगायचं होतं, थोड्यावेळाने बोलू म्हणून. मध्ये मध्ये का करतेस? असं म्हणून त्यांनी मुलांसमोर त्यांनी माझ्या अपमानच केला होता. मला वाईट वाटलं. पण मला माहिती नव्हतं, की यापुढे वारंवार मला असे अपमान सहन करतच जगायचं आहे. मी म्हटल्याप्रमाणे, रविवारी आम्ही सिनेमाला गेलो, पण मला त्या जाण्यात उत्साह नव्हता. असंच पुन्हा पुन्हा घडत राहीलं. हे सगळं असं का घडतंय? माझं काय चुकतंय, हेच मला उमजेना. मी एकदा त्यांना हे विचारण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी थातूरमातूर उत्तर देऊन विषयच टाळला. एकदा मुलांशी सुद्धा या विषयावर बोलायचा मी प्रयत्न केला, पण त्यांनी अगदी विचित्र नजरेने माझ्याकडे पाहिलं. कारण असं काही घडतं आहे, याची त्यांना कल्पनाही नव्हती. माझी घुसमट होत होती. पण असं का? या माझ्या प्रश्नाचे उत्तर मात्र मिळत नव्हतं.

माझी नुसती घुसमट होत होती. घरातल्या कामात लक्ष लागत नव्हतं. तिकडूनही ओरडा सुरु झाला. बाकी तर काही करता येत नाही, पण आता घरातलंही काही करत नाहीस नीट.

माझा आणखीनच गोंधळ होत राहिला. माझ्या आत्मविश्वासाला तडा गेला होता. स्वानंद माझ्यापासून दुरावत चालले आहेत, हे मला कळत होतं. पण त्याचं कारण माझ्या लक्षात येत नव्हतं. दुसऱ्या एखाद्या बाईच्या जाळ्यात ते अडकले आहेत, असं म्हणावं, तर तसं काही दिसत तरी नव्हतं. घरात राबायला नि रात्री शेजेला, मी होते; तेवढं त्यांना पुरेसं होतं. एक मात्र झालं होत; त्यांच्याभोवती हुशार हुशार, लोकांचा गराडा असायचा. त्यात बऱ्याच वेळेला बायकाच जास्ती असायच्या. पण तरीही ते कुठल्या बाईत अडकले आहेत, असं मला जाणवत नव्हतं. बाईला याबाबतीत चटकन वास लागतो; तसं काहीही मला दिसत नव्हतं. संशयाला जागाच नव्हती. माझ्या मनाची बेचैनी बोलून दाखवायला कोणीच नव्हतं. कारण माझ्या संसारात काही उणं कोणालाच दिसत नव्हतं.

माझ्या माहेरी सुद्धा मी असा विसंगत सूर लावला असता तर, माझे आई-वडील, भाऊ भावजय, यांनी मलाच वेड्यात काढलं असतं; आणि बाकी काही उणं नाही, पण माझं सुखच दुखतं आहे,

असा निष्कर्ष काढला असता. तात्पर्य असं की, मला मन मोकळं करायला, जागाच नव्हती. स्वानंद माझ्यापासून दूर चालले आहेत, आमचं नातं तुटण्याच्या बेतात आहे, असं मला मात्र जाणवत होतं. त्यात एक गोष्ट घडली. स्वानंदना एका महत्वाच्या- प्रोजेक्टसाठी बऱ्याच दिवसांकरता ऑस्ट्रेलियाला जावं लागणार होतं. ते गेले सुद्धा. आपण इतके दिवस बाहेर राहिल्यास त्याचा आपल्या बायकोवर काय परिणाम होईल, असा विचार सुद्धा त्यांच्या मनात आला नाही. एकापरीने स्वतःच्या हुशारीच्या, लोकांकडुन मिळणाऱ्या कौतुकाच्या आणि हुशारीमुळे, त्यांच्या अभ्यासामुळे मिळणाऱ्या महत्त्वाच्या प्रोजेक्टसच्या धुंदीतच बहुधा ते रंगले होते. त्यांचं कशाला माझ्याकडे लक्ष जातंय? अन् ते कशाला माझा विचार करतायत!

ते ऑस्ट्रेलियाला निघून गेले. मागे परतून पाहायचं त्यांना काही कारणच नव्हतं. त्यांना त्यांच्या आईवडिलांची सुद्धा चिंता नव्हती; कारण मी होते ना त्यांची काळजी घ्यायला. इतकी वर्ष मी तेच तर करत होते. आता त्यात वेगळं ते काय? शिवाय ते आम्हाला भरपूर पैसा पुरवत होते. त्यामुळे कशालाच काही कमी नव्हतं. सगळ्या कामांना, नोकर चाकर होते, मला कष्ट अजिबात पडत नसत. पण त्यामुळे अधिकच समस्या निर्माण होत होत्या. सगळ्याच रिकामा वेळ! तो जाता जात नसे. पैसा माणसाची जागा

भरून काढू शकत नाही, हे सत्यं मला उमजलं होतं; पण ते बोलून दाखवण्याची सोय नव्हती. माझ्यावरच तक्रारखोरपणाचा शिक्का बसला असता. स्वानंदांच्या हुशारीला, कर्तुत्वाला दाद मिळत होती, याचं मला दुःख नव्हतं, ते दूर राहत होते, याचंही दुःख मला नव्हतं: मला वाईट वाटत होतं ते, आम्ही मनाने दुरावत चाललो होतो, या गोष्टीचं.

कालांतराने माझे सासु – सासरे देवाघरी गेले. आता मी आणखीनच मोकळी झाले. मुलं म्हटली तर माझ्याजवळ होती, पण माझ्यात गुंतलेली नव्हती. ती गुंतली होती त्यांच्या अभ्यासात. त्यांना नवनवीन क्षितिजं खुणावत होती; तिकडेच त्यांची नजर लागलेली. योग्यच होतं न ते. घरात सगळ्या नवनवीन, महागाईच्या वस्तू, होत्या; पण त्यांचा उपभोग मी घेऊ कुणाबरोबर! आपापल्या व्यापामुळे कोणीच माझ्या थाऱ्याला उभा राहत नसे. मग मी, आळशासारखी टी व्ही पाहात बसायची. पण एकटं बसून, त्याचाही कंटाळा यायला लागला. मग मी शिवणाचा भरतकामाचा क्लास सुरू केला. त्यात माझं मन बऱ्यापैकी रमलं. सुंदर भरत काम करता यायला लागलं मला. पण त्याचं कौतुक कोणाला? इथे पडले सगळे बुद्धिवादी. ही असली कामं म्हणजे निर्बुद्धांची. असं कोणी बोलून दाखवलं नाही, तरी त्यांच्या वागण्यातून ते मला कळत असे.

नाही म्हणायला, मला एक विसाव्याचं ठिकाण होतं. माझी एक चुलत बहीण होती. मंगला. लहानपणापासूनच तिचं आणि माझं छान जमायचं. तिच्याजवळ मी माझी वेदना बोलून दाखवत असे. तिला कळायचं माझं अवघड दुःखं. ती आली की माझा वेळ कसा जायचा समजायचं सुद्धा नाही. गावातच होती ती. अधून मधून यायची. तेव्हढाच मला विरंगुळा. हळूहळू मुलं सुद्धा वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून, शिकण्याकरता परदेशी गेली. मी एकटीच उरले भारतात. पण स्वानंद मला चल आता माझ्याबरोबर असं कधी म्हणाले नाहीत. मी पण जायला उत्सुक नव्हतेच. मुलं आणि स्वानंद, त्यांच्या त्यांच्या वेळा प्रमाणे, घरी यायची. भोज्ज्याला शिवायला. तेवढे दिवस माझा दिनक्रम बदलत असे. मी त्यांना आनंदात ठेवण्याचा पुरेपूर प्रयत्न करायची. आलेली व्यक्ती परत गेली, की माझा दिनक्रम पुन्हा सुरु.

आता मी स्वतःला, आणखी एक छंद लावून घेतला होता. तो म्हणजे प्रवासाचा. माझ्या हातात पैसा भरपूर होता. प्रवासाला नेणाऱ्या प्रवासी कंपन्यांबरोबर मी पर्यटनाला जात असे. मला हो नाही म्हणायला, माझ्या बरोबर कोणी नसायचंच. अनेक देश पाहिले मी. अनेक मित्र-मैत्रिणी जोडल्या प्रवासात. आता मला एकटेपणा जाणवेनासा झाला. सवयही झाली एकटेपणाची. अधून मधून मुलं मात्र मला म्हणायची, “ आई, तू कशाला इथे एकटी

राहतेस? चल आमच्या बरोबर. आलटून पालटून आमच्याकडे राहात जा. म्हणजे तुला कंटाळा यायचा नाही. मी त्यांना म्हणायची, नाही रे बाबा, आता हे घर सोडून, मी नाही येणार कुणाबरोबर. तुम्ही तुमच्या कामांमध्ये दंग. मी काय करू तिथे येऊन? इथे हे घरच मला सोबत करतं.

“ बरं! आमच्याबरोबर येऊ नकोस, पण बाबांना आता सोबत हवी ग. त्यांच्याकडे जाऊन राहा. एकटी कशाला राहते इथे?

भरत -कामातल्या सौंदर्याने आणि प्रवासाने माझ्यातला कडवटपणा धूवून गेला होता. मी हसले आणि हसत हसतच म्हणाले, “ अरे, त्यांना जर गरज वाटली असती, तर त्यांनी नसतं का म्हटलं मला काही? खूप लोक आहेत त्यांची काळजी घ्यायला. आणि कधीही त्यांना वाटलं तर घरी आहेच की मी त्यांची वाट बघणारी! खरं तर माझं भरत काम, माझे प्रवास, माझ्या मित्र – मैत्रिणी, यांच्यामुळे माझी एकटेपणाची भावना नाहीशी झाली होती. अगदी आनंदात मी जगत होते. यांच्याबद्दल कुठल्याही प्रकारचा राग माझ्या मनात शिल्लक राहिला नव्हता. पण तेवढी ओढही राहिली नव्हती. मी एक तटस्थ राष्ट्र बनले होते. ना कोणाची स्तुती, ना कोणावर टीका. माझं जगच आता वेगळं झालं होतं.

आता मी प्रवास करत होते, निरनिराळे अनुभव घेत होते. विचार करत होते. हळूहळू एक लेखिका माझ्यात जन्म घेत होती. आता माझी लिहिण्याची उर्मी मी थांबवू शकत नव्हते. मी लिहायला लागले, माझ्या अनुभवांची शिदोरी पुरेशी मोठी होती. माझ्या लिखाणाला प्रसिद्धी मिळायला लागली. माझा उत्साह वाढला. लेखनाचा वेगही वाढला. किती लिहू आणि किती नको असं मला व्हायचं. लेखनानी मी अनेक लोकांशी, एकाच वेळी संवाद साधते आहे, असं मला वाटायचं. अधून मधून मुलं यायची, मी आनंदात आहे, हे पाहून त्यांनाही बरं वाटायचं. वर्षाकाठी एकदा स्वानंद सुद्धा येत असत. पण कधीही त्यांनी मला, ‘ चल माझ्याबरोबर, इथे एकटी कशाला राहतेस?’ असं म्हटलं नाही. आता मला त्याबद्दल विषाद नव्हता. त्यामुळे ते आल्यावर सुद्धा, आमचे दिवस बऱ्यापैकी आनंदाने जायचे. ते आले, की नातेवाईकांची उठबस वाढायची, त्यांच्या रीसर्चबद्दल बोलायला देखील अनेक लोक यायचे, पण नोकरचाकरांच्या मदतीने त्यांचं करायला मला फार जड जायचं नाही.

कदाचित मी इथे एकटीच का राहाते, याबद्दल लोक चर्चासुद्धा करत असतील, पण त्याबाबत मला कधी कोणी काही म्हटलं नाही, विचारलं नाही. माझ्या चतुरस्त्र लेखनानी, मला प्रसिद्धी मिळत होती, स्वानंदांची बायको, या पेक्षा मी एक लेखिका

म्हणून प्रसिद्धीला येत होते. एकदा तर गंमतच झाली. यांच्या एका सहकाऱ्यांनी बोलता-बोलता त्यांना विचारलं, की त्या प्रसिद्ध लेखिका सौ स्वाती देशपांडे, यांच्याशी तुमचं काही नातं आहे का? यांना सांगावंच लागलं आमचं नवऱ्या बायकोचं नातं. मी मात्र ही गोष्ट खूप एन्जॉय केली. यांच्याही लक्षात आलं असलं पाहिजे, की माझी सौ स्वाती देशपांडे, म्हणून स्वतंत्र ओळख होती. मी इथे बुजगावणं म्हणून जगत नव्हते. मी लाचार नव्हते. यांना वाटायचं, तशी घरघुशी बुद्दुही नव्हते. मी कधी एकटं राहावं लागतं , याची तक्रार केली नव्हती. माझ्यातला ताठपणा आता यांच्या लक्षात आला. ते जरा वरमले. यावेळी परततांना मी त्यांच्याबरोबर जावं, अशी सूचनाही त्यांनी आडून आडून केली.

पण आता मला परत पूर्वीच्या सुगृहिणीच्या भूमिकेत जायचं नव्हतं. तर जगायचं होतं, एकटीने सौ स्वाती देशपांडे म्हणून. मी यांच्याबरोबर जायला नकार दिला. ते माझ्याकडे बघतच राहिले. हा नकार त्यांना अपेक्षित नव्हता. पण मी ठाम राहिले. मला माझी ओळख पटली होती.

# माया

देवकीला पहिला मुलगा झाला आणि कूस मात्रं उजवली तिच्या सासूबाईंची. आपलं बाळ थोडं अधु आहे, त्याला फिट्स येतात, त्याची लाळ सतत गळत असते, हे लक्षात आल्याबरोबर देवकी आकसून गेली. तिनी त्या मुलाकडे पाठ फिरवली ती कायमचीच. देवकी स्वत: सर्वांग सुंदर होती; नीटस होती. कामाला वाघ होती. हसरी बोलकी होती. पण स्वत:च्या या मुलाला पाहिल्यावर हा आपलाच, आपण जन्म दिलेला मुलगा आहे हे स्वीकारणं तिला झेपलंच नाही. तिला ते नाकारताही आलं नाही. पण ते स्वीकारता स्वीकारता देवकी विमनस्क होऊन गेली. तिचं कशात लक्षं लागेना. काम करता करता ती तशीच बसून राहायची. कुठंतरी एकटक नजर लावून बसायची. तिची अशी तंद्री लागणं तिच्या बालविधवा सासूबाईंना सहन होत नसे.

“देवकी, गो देवकी ऊठ. अशी बघत काय बसलीस? अजून बघ कामाचा काय रामरगाडा पडला आहे तो. ” असं तिला

हाकारीत त्या स्वत: चपळाईनं एक एक काम हातावेगळं करीत असायच्या. देवकीचा सारा संसारच जणू त्यांचा झाला होता. देवकीच्या आगमनानी सुखावलेली राधाक्का पुन्हा प्रकाशमध्ये,-- देवकीच्या पांगळया मुलामध्ये नि तिच्या संसारात गुरफटत चालली होती. दुसरा इलाज तरी काय होता या गोष्टीवर! तरणीताठी शहाणीसुर्ती सूनच जर अशी वेडी – विगत झाल्यासारखी वागायला लागली; तर संसाराचा भार आपल्या खांद्यावर पेलण्याखेरीज दुसरा काय इलाज असणार सासूजवळ!

बरं ते पांगळं पोर तरी, दिसामाशी मोठं होत होतं. राधाक्कांकडे बघत खुळं हसत होतं, हात उंचावून मला घे म्हणत होतं. देवकीनी तर आपल्या बाळाला पाजायचंही नाकारलं होतं. गोठ्यात गाय होती म्हणून बरं! म्हातारीला जणु पुन्हा पान्हा फुटल्यागत झालं होतं! इवल्याश्या चमच्यानी बाळ चुटूचुटू दूध पीत होतं. राधाक्का बाळाला अगदी स्वच्छ ठेवत होती; त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करीत होती; आपल्या जुन्या नऊवारी पातळाचे चौकोनी तुकडे करून ठेवत असे ती प्रकाशची लाळ पुसायला; नि लाळ पुसून झाली की तत्परतेनी ते फेकूनही देत असे. ती जिथे जाईल तिथे सावलीसारखा प्रकाश तिच्या मागे मागे असायचा.

I

राधाक्कांचा लाडका मुलगा बाबू. त्याचं खरं नाव होतं “ केशव “. पण राधाक्का त्याला लाडानी बाबू म्हणायची. मग तो सगळ्या जगाचाच बाबू झाला. बाबू एका वर्तमानपत्रात उपसंपादक होता. अशी काय मिळकत असणार त्याची! पण राहायला घर होतं स्वत:चं छोटंसं. देवकी आणि राधाक्का घर स्वच्छ आणि नीटनेटकं ठेवत असत.

पंचक्रोशीत देवकीसारखी रेखीव रांगोळी रेखणारी दुसरी कोणीही बाई नव्हती. राधाक्काला आपल्या सुनेचा कोण अभिमान होता!

देवकी ही राधाक्कांच्या माहेरच्या गोतावळयातली मुलगी. तिला त्यांनी तिच्या बालपणापासूनच हेरून ठेवेली होती. बाबूचं लग्नं करायचं ठरवल्यावर त्यांनी देवकीसाठी विचारलं. अठराविश्व दरिद्र्य असलेल्या देवकीच्या बापाला बाबूचं एकुलतं एकपण भावलं; शिवाय राधाक्काला तो कधीपासूनच ओळखत होता. राधाक्का राहत होती दूर नागपूरला. म्हणजे देवकी दृष्टीआडच राहाणार होती; त्याच्यापर्यंत दूर कोकणात काही पोहोचणारच नव्हतं.

गरीबीनी त्याला हा सुद्धा विचार करायला लावला.

बाबू चांगला धडधाकट होता, दिसायलाही घारा – गोरा होता. नोकरी करीत होता. पोरीला निदान भाजी भाकरी तरी पोटभर खायला मिळेल, याची देवकीच्या वडिलांना खात्री पटली. नाही म्हणायला राधाक्का स्वभावानी जरा कडकच होती. पण हे काही नकाराचं कारण होऊ शकत नाही. उलट त्यामुळे शिस्त लागेल पोरीला. विचारांती सर्वच बाजू यथायोग्य होत्या; त्यामुळे देवकीच्या वडिलांनी लगेच होकार दिला. नावं ठेवण्याजोगं काही या स्थळात नव्हतंच. अगदी म्हणायचं तर बाबूला सुपारी खाण्याचं व्यसन होतं. जेवण झाल्यावर बाबुला सुपारी लागायचीच. पण यात काळजी करण्यासारखं काही नव्हतं. बाबूची नोकरी बरी होती. एक म्हातारी आई सोडली तर त्याच्यावर कुणाची जबाबदारी नव्हती. त्यांच्या दृष्टीनी हे सोन्यासारखं स्थळ होतं. आपल्या देवाकीसारख्या रत्नाला अगदी योग्यं कोंदण मिळतं आहे ह्या विचारांनी ते फार आनंदले होते. त्यांनी त्यांच्यापरीनं हौसेनी देवकीचं लग्नं बाबूशी करून दिलं. कोकणातल्या खेड्यात राहणारी मुलगी नागपूरसारख्या मोठ्या शहरात राहायला लागली.

देवकी शहाणी होती. रूपांनी तर ती देखणी होतीच. गोरी, घारी, नाकेली – बाबुला साजेशी. दुधात साखर म्हणजे तिला समजही चांगली होती. आपण कष्ट केल्याशिवाय आपला संसार सुखाचा होणार नाही हे ती जाणून होती. शिवाय तिच्या माहेरी तिला अंग मोडून काम करायची सवय तिला होतीच. उलट इथे सासरी आटोपशीरच असायचं सगळं. दोन, तीन माड्यांचं घर, घराला छोटसंच का होईना, पण बंदिस्त अंगण, मध्ये छोटंसं तुळशी वृंदावन, घराला नुकताच रंग दिलेला. देवकीनं लग्नानंतरच आपलं सासरघर पाहिलं; आणि हे सगळं पाहून ती हरखूनच गेली. हे सगळं आता आपल्या मालकीचं म्हणून सुखावली. शिवाय देवकी – देवकी करत मायेनी विचारपूस करणारी सासू; आणखी काय हवं असतं माणसाला?

बाबू थोडा अबोल होता. त्याचा बराचसा वेळ त्याच्या नोकरीतच जात असे. बोलून चालून वर्तमानपत्राची कचेरी ती! तिथे दिवसापेक्षा रात्रीच जास्ती वर्दळ असायची. एकदा दुसऱ्या दिवशीच्या वर्तमानपत्राचा मजकूर रात्री बारा वाजता मशीन वर टाकला, की बाबू मोकळा. रात्री बारा – साडेबाराला बाबू घरी यायचा. त्यानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत तरी तशी काही

बांधिलकी त्याला नसे. दिवसाकाठी त्याच्या दोन चार तरी फेऱ्या कचेरीत व्हायच्या; पण ते केवळ कचेरी अगदी शेजाराला होती म्हणूनच.

शाळेचं फारसं दर्शनही न घेतेलेल्या देवकीची मात्रं बाबू अतिशय विद्वान आहे अशी पक्की श्रद्धा होती. तो किती पुस्तकं वाचतो, त्यांनी लिहिलेलं वर्तमानपत्रात छापून येतं; हजारो लोक ते वाचतात. या सगळ्या गोष्टी करायच्या म्हणजे चेष्टा नव्हे. त्यानं असंच हुशार राहिलं पाहिजे. आपल्याकडून त्याला कणभरही त्रास होता कामा नये. ; याची ती पुरेपूर काळजी घेत असे. त्याचं सगळं वेळच्यावेळी करणं, त्याच्या सर्व वस्तू जागच्याजागी ठेवणं हे देवकीला आपलं आद्य कर्तव्यं वाटत असे. शिवाय घरातलं कामकाज. ते तर ती चुटकीसरशी करून टाकायची. कारण इन मीन तीन माणसांच्या घरात असं काय काम असणार? नि स्वयंपाकाचा घोळ तरी कितीसा असणार! शिवाय सासूची शिस्त कुठेही मोडणार नाही याचीही ती काळजी घ्यायची. यामुळे राधाक्का फार खुश होत्या आपल्या सुनेवर आणि आपल्या चांगल्या नशिबावर. कारण एका एका सुनेचं वागणं – करणं – सवरणं, त्या आजूबाजूला पाहताच होत्या नं!

घरातली झाड-पूस, भांडी घासणं, कपडे धुणं ही कामं त्या हातासरशी करून टाकत. देवकीने ही कामं करू नयेत असं त्यांना वाटत असे. सुरवातीला देवकी जरा खट्टू व्हायची; तिला वाटायचं की आपलं काम सासूबाईंना आवडत नाही. ती काही बोलायची नाही. पण मनातून नाराज असायची. पण हळूहळू तिला, त्यांची कष्टाची कामं करून टाकण्यामागची माया उमगली. मग जणू त्यांचं नातंच बदलून गेलं. त्या झाल्या मायलेकी! त्यांचं गुळपीठ बघून आजूबाजूच्या सासवा सुना जळायच्या – पण इथे कोणाला वेळ होता त्यांच्याकडे बघत बसायला, नि बघितलं जरी, तरी त्यांची पर्वा करण्याचं कारणंच काय होतं मुळी! आपण आहोतच की दोघी एकमेकींना हे त्या मनोमन जाणून होत्या.

तर ही अशी गुणांची पुतळी, राधाक्कांची लाडकी सूनच जर आता अशी विमनस्क होऊन बसली, तर मुलाचा संसार तरी कसा मार्गी लागायचा? म्हातारी मग बाबूच्या कानाशी लागली. म्हणाली, “ बघ बाबा, पुन्हा तिला जर एखादं सुरेख धडधाकट मूल झालं, तरच ती सुधारण्याची आशा. मग ती पहिल्यासारखी हसती खेळती होईल. असं मला वाटतं. बाबुलाही ते पटलं असावं.

यथावकाश देवकीला पुन्हा दिवस राहिले; हे लक्षात आल्याबरोबर देवकी सजग झाली. मोठ्या विश्वसानी ती सासूजवळ गेली नि म्हणाली, “ सासूबाई मला हे दुसरं मूल नको आहे. पुन्हा पहिल्याचीच पुनरावृत्ती व्हायची. आपण डॉक्टरांकडे जाऊया. ” राधाक्कांना याची अपेक्षा होतीच. पण त्या तयारीतच होत्या. त्या तिला म्हणाल्या, “देवकी आपण डॉक्टरांकडे जरूर जाऊया; पण ते, हे मूल जगवण्यासाठी. माझ्यावर विश्वास ठेव. सगळं काही चांगलं होईल. ” देवकी निरुत्तर झाली.

सासुबाईंसमोर फार काही बोलण्याचा तिचा स्वभावच नव्हता. पण मनातून ती अगदी धास्तावून गेली होती. राधाक्का तिची पूर्ण तैनात राखत होत्या. डोळ्यात तेल घालून त्या तिची काळजी घेत होत्या. तिचं कौतुक करीत होत्या. तिसऱ्या चौथ्या महिन्यात जेंव्हा बाळाची हालचाल जाणवू लागली, तेंव्हा गेल्या वेळेपेक्षा काही वेगळं जाणवतं आहे का, याची नोंद देवकी घेऊ लागली. पण तसा काहीच फरक तिला जाणवेना. ती पुन्हा पुन्हा निराश होई. पण राधाक्कांना मात्रं मनातून खात्रीच होती की देवकीला याही वेळी मुलगाच होणार; तो अगदी तिच्या

बाबुसारखा दिसायला चांगला आणि मुख्य म्हणजे तेज बुद्धीचा असणार. ती तसं देवकीला बोलूनही दाखवायची. पण ते ऐकून सुद्धा देवकी खुलत नसे.

राधाक्का दिवसभर कामात गुंतलेली असायची. आजूबाजूच्या बायका तिला टोमणे मारायच्या. " राधाक्का तुम्ही सुनेला अगदी डोक्यावर बसवून ठेवलं आहात. चार कामं तिलाही करू द्या की! तुम्ही चांगुलपणानी करू नको म्हणालात, तरी तिला कसं बरं वाटतं बसून राहायला?" राधाक्का सुनेचीच बाजू घ्यायच्या. त्या म्हणायच्या, "बसून नसते काही देवकी ती ही निवडण टिपण करीत असते. मीच तिला कष्टाच्या कामांना हात लावू देत नाही. एकदा ती हातीपायी सुखरूप बाळंतीण झाली की मग आहेतच तिला सगळी कामं करायची. "

होता होता नऊ महिने सरले आणि देवकी बाळंत झाली. राधाक्कांच्या भाकिताप्रमाणे तिला मुलगाच झाला.

निर्व्यंग- सुरेखपणात अगदी त्यांच्या बाबूची आठवण करून देणारा. गोरा गोरापान. राधाक्का मोहरून गेली. देवकीही आपलं

बाळ बघून सुखावली. पण सासूबाइंसारखी मोहरून गेली नाही. तिच्या मनात शंका होती की आपलं बाळ दिसतंय तर सुरेख आणि व्यवस्थित. पण बुद्धीनी असेल न धड? की असेल कमकुवत बुद्धीचा. वास्तविक प्रकाशही कमी बुद्धीचा नसेल; पण त्याच्या फिट्स येण्यामुळे त्याच्या बुद्धीवर परिणाम झाला असण्याची शक्यताच जास्ती. शिवाय त्याच्या पांगळेपणामुळे त्याला शिकवायचा प्रयत्नही कुणी केला नाही. मग तो कायमचा तसाच राहिला.

प्रकाशच्या भावाचं नाव प्रदीप ठेवण्यात आलं. प्रदीप खरंच तेज बुद्धीचा होता. त्याच्या मनात प्रकाशबद्दल माया होती. तो त्याला प्रकाशदादा म्हणून त्याचा मान ठेवत असे. आजूबाजूची लोकं तो "प्रकाशदादा" म्हणतो म्हणून त्याची टिंगल टवाळी करीत असत; पण तो कोणालाही दाद देत नसे. देवकी आणि राधाक्का त्याचं बंधूप्रेम पाहून निर्धास्त झाल्या होत्या. बाबुरावांना मात्रं या कशातही फारसा रस नव्हता. त्यांना रस होता त्यांच्या अग्रलेखांमध्ये – नि त्याहूनही जास्ती त्यांच्या खेळ, क्रिकेट – सामालोचनांमध्ये. घरात ते दिवसेंदिवस हरवल्यासारखेच

वागायाचे. त्यांची म्हातारी होतीच की त्यांच्या संसाराची काळजी घ्यायला.

प्रदीपच्या जन्मानी त्या घराला पुन्हा हंसते खेळते दिवस आले. राधाक्का प्रकाशबरोबर प्रदीपचीही काळजी घेत होत्या. प्रदीप खरंच बुद्धिमान होता. देवकीही आता पूर्वीसारखीच घरात रमली होती. पण आपल्या या दोन भिन्न मुलांच्या नशिबात काय वाढून ठेवलं आहे? याचीच तिला आता चिंता लागून राहिली होती. ती घरात रमली होती, हंसत बोलत होती खरी, पण प्रकाशच्या पांगळेपणातून आणि मतिमंदत्वातून बाहेर पडणं, तिला अजूनही जमलं नव्हतं.

राधाक्का मात्रं सर्वांवरच मायेचा शिडकावा करीत होत्या. त्या बालविधवा होत्या. त्यांच्या वयाच्या पंधराव्या वर्षी बाबूचा जन्म झाला. पुढच्याच वर्षी त्यांची यजमानांचा विषमज्वरानी मृत्यू झाला. म्हणजे वयाच्या सोळाव्या वर्षी त्या बालविधवा झाल्या. नको नको ते सारे सोपस्कार त्यांना करून घ्यावे लागले. त्या आजी झाल्या असल्या तरी त्यांचं वय ४५ – ५० च्या दरम्यान असावं. इतर बालविधवांप्रमाणे त्या प्रामुख्यानी कुटुंबातल्या इतरांच्या

सुखाचाच विचार करीत असत. स्वत:करता काही करणं त्यांना माहीतच नव्हतं.

अलीकडे मात्रं देवकी त्यांना कुठलंच कष्टाचं काम करू देत नसे. स्वयंपाक झाल्या झाल्या ती त्यांना सगळं अन्नं गरम असतांनाच जेवायला वाढत असे. वरवर त्या सर्वांच्या आधी जेवायला विरोध करायच्या, पण मनातून त्यांना ते गरम गरम जेवण आवडतही होतं. सूख अंगी लागत होतं. सुनेबाद्दलची माया अधिकच ओसंडून वाहायला लागली होती. सून आपली किती काळजी घेते या विचारांनी त्या स्वत:ला धन्य धन्य समाजत होत्या. पांगळ्या प्रकाशला जणु काही त्यांनी स्वत:चाच मुलगा मानलं होतं. अनेक देवदेवस्कीचे प्रकार आणि त्याबरोबरच अनेक डॉक्टरही धुंडाळून झाले, पण प्रकाशमध्ये तसुभर सुद्धा फरक पडला नाही. अनेक औषधांचा परिणाम म्हणून की काय प्रकाशला फिट्स पूर्वीइतक्या वारंवार येत नसत.

भोवतालची मुलं कधी कधी प्रकाशच्या मागे लागायची. राधाक्कांना त्यांचा फार राग यायचा. पण त्या त्यांना काही बोलत नसत. प्रदीप तर नुसता उकळत असायचा; पण त्या प्रदिपलाही कधी त्या मुलांच्या नादी लागू देत नसत. प्रदीपचं शिक्षण मात्रं योग्य

आकार धारण करीत होतं. त्यानं दिलेल्या सर्व परीक्षांमध्ये तो यश मिळवत होता. शिष्यवृत्त्या मिळवत होता. अधिकाधिक हुशार बनत होता. प्रकाशच्या अपंगत्वाच्या जाणीवेनं तो जरा अकालीच प्रौढ बनला होता. खूप शिकायचं खूप पैसे मिळवायचे आणि आपल्यावर माया करणारी आपली आजी, आपला प्रकाशदादा, आई-बाबा या सर्वांना खूप सुखात ठेवायचं असं त्याचं स्वप्नं होतं. आई-वडिलांची शिस्त आणि आजीची माया त्याला घडवत होती.

बघता बघता प्रदीप आर्किटेक्ट झाला. त्याला सुवर्ण-पदक मिळालं; आणि त्याचवेळी त्यानी एक “कमी खर्चात छोटेखानी, तरीही सर्व सोयींनी युक्तं घर बांधता येईल ” या नावाचं एक पुस्तक प्रकाशित केल. लगोलग पुस्तकच्या दोन – तीन आवृत्त्या काढाव्या लागल्या आणि त्या हातोहात संपल्यादेखील; कारण हा लोकांच्या फार जिव्हाळयाचा विषय होता. सगळीकडे प्रदीपचं नाव झालं. त्याच्या स्थळावर लोकांच्या उड्या पडू लागल्या. नामवंत घराण्यातल्या मुली प्रदीपला सांगून येऊ लागल्या.

पण प्रदीपने आधीच त्याचं लग्नं ठरवलं होतं. त्याला आपल्या प्रकाशदादाला आनंदानी स्वीकारणारी सहचारिणी हवी

होती. त्यांच्या घराजवळ राहणाऱ्या सोमणांच्या नंदिताशी त्यानी लग्नं ठरवलं होतं. घरातल्या लोकांना याची कल्पनाही नव्हती. त्यांच्याही फार उड्या नव्हत्याच. शिवाय प्रदीपवर त्यांचा विश्वास होता. तो भलतं-सलतं काही करणारच नाही, याची त्यांना खात्री होती. त्यांनी आनंदानी नंदिताचा स्वीकार केला. नंदिताला प्रकाशबद्दल सर्व काही माहीत होतंच. तिच्या घरच्यांनाही त्याची कल्पना होती. दोन्ही घरांनी एकत्र येऊन लग्न समारंभ हौसेनी साजरा केला.

नवी सून घरात आली आणि दुसऱ्याच दिवशी तापाचं निमित्त होऊन प्रकाश देवाघरी गेला. अघटित अगदी अक्लपितपणे घडलं होतं. काल घरात आलेली नवी सून – धास्तावून गेली होती. तिला वाटत होतं, आता सगळेजण आपल्या पायगुणावर घसरणार! तिचा अगदी कोंडमारा झाला होता. ती ही उदासपणे उगीचच इकडे तिकडे करीत होती. मनातून तिला राधाक्कांची काळजी वाटत होती. पण बोलणार तरी कोणाजवळ? माहेर जवळच होतं. पण माहेरी निघून जाणं चांगलं दिसलं नसतं. तिला प्रदीपचा आधार हवा होता.

पण प्रदीप काही बोलण्याच्या अवस्थेतच नव्हता. प्रदीपला एकाकी वाटत होतं. तो अगदी निराश झाला होता. त्याला दादाला ऐषारामात गाडीतून हिंडवायचं होतं. आपल्या जीवनाचं उद्दीष्टं हिरावलं गेलं, असं त्याला वाटत होतं. तो अगदी सुन्न बसून होता. त्यामुळे तिला त्याच्याशीही बोलत येत नव्हतं. ही कोंडी फुटणार कशी हे तिला काळत नव्हतं. अशा परीस्थित राधाक्कांनी तिला हाक मारली. आता त्या आपल्याला काय म्हणतात या विचारानी ती आकसून गेली. काय ऐकायला मिळणार याची तिला कल्पना होतीच. सगळे दु:खात आहेत, आपण ते जे बोलतील ते ऐकून घ्यायचं. त्यांचं काही मनावर घ्यायचं नाही. असं मनाशी ठरवत ती राधाक्कांच्या पुढ्यात येउन उभी राहिली.

राधाक्कांनी तिला जवळ बसवलं; आणि त्या म्हणाल्या, “ सुने अशी संकोचू नकोस. स्वत:ला दूषणं देऊ नकोस. जे घडलं, त्यात तुझा काही दोष नाही. माझ्या प्रकाशची सर्व घरावर माया होती. आपल्या सारख्या विद्रूप व्यक्तीचं सांवट तुमच्या नव्या नवलाईच्या संसारावर नको, अशा उदात्त विचारांनी माझा प्रकाश आपल्यातून निघून गेला जणु. तुझं साक्षात लक्ष्मीचं आगमन होऊन घर सुख – समृद्धीनी आनंदित झालेलं पाहून सुखासमाधानानी तो

देवाघरी गेला. त्याचं फार दु:खं करून त्याला दु:ख्खी करू नका. जणु तुम्हावरच्या मायेनीच त्यानी स्वत:चं आयुष्यं त्यागलं. माझा प्रदीप अगदी भांबावून गेला आहे, त्याला सांभाळ. आता सगळं तुझ्याच हातात आहे. ”

आजेसासूचे हे शब्दं ऐकून नंदिता दिपून गेली. सगळी कोंडी एकदम फुटली होती. आता तिला जाणीव झाली की आपण पुढे होऊन या सगळ्यांना सांभाळायचं आहे. मग ती मागे हटली नाही. सगळ्या गोष्टी तिनी नीट हाताळल्या. हळूहळू या धक्क्यातून सगळे सावरले. घर पुन्हा जागेवर आलसं वाटलं.

पण राधाक्का काही या दु:खातून फारश्या बाहेर पडू शकल्या नाहीत. प्रकाशच्या जाण्याचं दु:ख तर सर्वांनाच झालं. पण त्याचा खरा त्रास झाला तो राधाक्कांना. कारण प्रकाशच्या जन्मापासून प्रकाश हे त्यांच्या जीवनाचं प्रयोजन होतं. त्याच्याकरता तरी मी नीट राहिलं पाहिजे, असं त्यांना वाटत असे. जगायचं प्रयोजनच नाहीसं झालं, आता जगायचं कशाकरिता? त्यांचं स्वत:चं तर काहीच नव्हतं. त्यांचं मन काही उभारी धरीना. त्यांची कशी समजूत काढावी हे कोणालाच उमजत नव्हतं.

अशातच नव्या नातसुनेला दिवस राहिल्याचं कळल्यावर अवघं घरच आनंदलं. पण राधाक्कांनी तर कातच टाकली. अवघ्या घरावरची त्यांची माया दाटून आली; आणि पदर खोचीत त्या नातसुनेची काळजी घ्यायला सज्ज झाल्या.

# विश्वास प्रेमाचा

, ही गोष्ट आहे 70 / 80 वर्षापूर्वींची; की जेव्हा कोणाला रिलेशनशिप हा शब्द, आता त्याला जो अर्थ प्राप्त झाला आहे, त्या अर्थाने प्रचलित नव्हता. रिलेशनशिप म्हणजे संबंध. तेव्हा त्याला, आपल्याकडे तरी, शारीरिक संबंध असा अर्थ प्राप्त झाला नव्हता. तेव्हाची ही गोष्ट. रिलेशनशिपचा खरा अर्थ सांगणारी. रिलेशनशिप किती चांगली व विश्वसनीय असू शकते, याचा वस्तुपाठ देणारी.

वसुधा ही वऱ्हाडातल्या एका गरीब घरातली मुलगी. पाच बहिणी आणि तीन भाऊ एवढे हे विस्तारलेलं कुटुंब. चौथीपर्यंत शाळा शिकली, की पुरे. इतपत शिक्षणाची आवड वडीलांना होती. त्यानुसार वसुधा चौथी पास झाली आणि शाळा बंद झाली. शाळेत अभ्यासाबरोबर हुंदडायलाही मिळायचं, त्यामुळे शाळा सोडायचं तिला अगदी जीवावर आलं होतं. पण दुसरा काही इलाजच नव्हता. वडिलांपुढे तिचा काहीच इलाज चालला नाही. शाळा सुटली ती

कायमचीच. आता वसुधा घरातल्या कामात स्वतःला रमवत होती. बघता बघता वसुधा पंधरा वर्षांची झाली.

पंधरा वर्षांची वसुधा, उफाड्याची होती. या वयात सुद्धा ती लग्नाची वाटायची. वडिलांना तर पाच मुली उजवायच्या होत्या. त्यांनी पंधराव्या वर्षापर्यंत तिला घरात ठेवून घेतली, हेच नशीब. त्या काळात या आधीच्या

वयात देखील सर्रास लग्न होत. त्यात कोणाला काही वावगं वाटत नसे.

वडिलांनी कसंबसं लग्न लावून दिलं. वसुधेचा नवरा वयानी तिच्यापेक्षा बराच मोठा होता. दिसायला आडदांड होता. पैसा-अडका भरपूर होता त्याच्याकडे. लग्न लागलं. वसुधा सासरी गेली. आणि दुसऱ्या दिवशी सकाळी उठून परत माहेरी निघून आली. ती का व कशी परत आली, यावर घरात बरीच चिवचिव झाली. पण आल्या आल्याच तिने ती परत सासरी जाणार नसल्याचं जाहीर करून टाकलं. बाप काही अगदी कसाई नव्हता. झेपत नसलं तरी त्यांनी तिला घरात ठेवून घेतलं. पण पुढे काय? हा प्रश्न कायमच होता. तरुण मुलगी म्हणजे, “ जळता निखारा ,“ असं समजण्याचा काळ होता तो. बरं, तिला पुढे शिकवायला, स्वतःच्या पायांवर उभी राहिल, इतकं शिक्षण तिला द्यायला तो असमर्थ होता. वरच्या

दोन बहिणी लग्न होऊन आपापल्या घरी सुखाने नांदत होत्या. पण अजून दोघी उजवायच्या होत्या. वसुधा घरात राहिली, तर त्यांची लग्नं जमवताना अडचण येणार होती. तरीही तिला माहेरी राहायला मिळालं ही फार अप्रूपाची गोष्ट होती.

असंच वर्ष गेलं. या वर्षात कोणीही तिला तू घरी परत का आलीस असं विचारलं नाही ; आणि आता परत जा असा लकडाही तिच्या मागे लावला नाही. तिच्या सासरच्यांनी तर तिची विचारपूसही केली नाही. कदाचित ती गेली तशीच ती परत येईल; तिचा बाप तिला नक्कीच परत पाठवील, अशी सासरहून पळून आलेली मुलगी कोण घरात ठेवून घेतो, शिवाय आमची मुलांची बाजू, एक वसुधा गेली तर अशा छप्पन वसुधा भेटतील आम्हाला,असे विचार त्यांनी केले असावेत. होता होता वर्ष सरलं.

वसुधा ही अल्लड – खेळकर स्वभावाची मुलगी होती. पण आता परिस्थितीने तिला विचार कारण भाग पडलं. ती सुद्धा आता, पुढे आपल्या आयुष्याचं काय? या प्रश्नात अडकलीच होती. बापाने आपलं लग्न करून दिलं, त्याकरता खर्चही केला, आपण मात्र माघारी परत आलो, या कल्पनेने तिला अपराधी वाटत होतं. पण घरातून निघून जाण्याशिवाय पर्याय नाही, अशी काहीतरी विपरीत गोष्ट घडली असावी, त्यामुळे तिच्यासमोर दुसरा पर्यायच उरला

नाही. पण आपण जर काही हालचाल केली नाही तर सगळे आपल्याला गृहीत धरतील ; आणि आपण अशीच सर्वांची कामं करत आयुष्यभर सडत राहू. या विचारांनी ती बेचैन झाली होती. पण निमूटपणानी घरातली कामं करत राहण्यापलीकडे पर्याय नव्हता.

पण एके दिवशी, पुढे काय, या प्रश्नाचं उत्तर चुटकीसरशी मिळालं. वसुधा पाणी भरण्यासाठी सार्वजनिक विहिरीवर चालली होती. बरोबर इतर बायकाही होत्या. तेव्हा दोन बायका आपापसात बोलत होत्या, ते वसुधाने ऐकलं. एक होती शांता आणि दुसरी होती पुष्पा, असं आपण समजू या. शांता पुष्पाला विचारत होती, “ काय ग शांती तुझी नणंद हल्ली दिसत नाही कुठे? का गेली पळून?” यावर पुष्पा म्हणाली, “ शांते काहीतरीच काय बोलतेस? तशी नाहीये माझी नणंद.

मग माघारी का आली? शांता म्हणाली.

पुस्तका म्हणाली, “ शांते इकडे ये जरा. ” मग कुजबुजत्या स्वरात ती म्हणाली, “अगं, स्वतः सासराच जबरदस्ती करायला लागल्यावर, ती दुसरं काय करणार होती ती? कशीतरी स्वतःची सुटका करून घेऊन, पळून आली बिचारी.

तिचं बोलणं ऐकून, शांता बिथरली. तिनं पुष्पाच्या नणंदेच्या सासऱ्याला चार-दोन शिव्या हासडल्या ; आणि म्हणाली , “आता काय ग करणार ती?मग ती गेली तरी कुठे आहे? ”

पुष्पा म्हणाली, “अगं, ती पुण्याला एका आश्रमात गेली आहे. तिथे अशा घर सोडून आलेल्या, बायकांना आश्रय देतात; त्यांना शिकवतात, आणि स्वतःच्या पायांवर उभं राह्यला मदत करतात. ”

हे ऐकल्याबरोबर वसुधाला स्वतःच्या यक्ष प्रश्नाचं उत्तर मिळालं. तिला एकदम सुटल्यासारखं वाटलं. पुढचा मार्ग तिला स्वच्छ दिसायला लागला. घरी गेल्यागेल्या, ती वडिलांना म्हणाली, “ बाबा, तुम्ही पुष्पाकडे जाऊन,त्या आश्रमाची चौकशी करून या. मीही त्या आश्रमात शिकायला जाते. “ कोणतीही गोष्ट करायची म्हंटली, की खर्च हा आलात. त्यामुळे खर्चाच्या भीतीने तिचे बाबा म्हणाले, “ काही नकोय शिक्षण- बिक्षण. इथे घरातच राहा. आईला मदत कर. तिला तुझ्या मदतीची गरजच आहे. इथेच त्यांनी विषय संपवला.

पण वसुधाला स्वस्थ बसवेना. ती स्वतः पुष्पाकडे गेली; आणि तिने स्वतःच त्या आश्रमाची माहिती करून घेतली. तो आश्रम पुण्याचे श्री. धोंडो केशव कर्वे यांनी काढला होता. निराधार

महिलांसाठी त्यांनी या आश्रमाची स्थापना केली होती. तिथे या महिलांना काहीही पैसे भरावे लागत नसत नसत. पण काम मात्र करावं लागत असे. या महिलांना शिक्षण देणे, व स्वावलंबी होण्यास मदत करणे, हाच या आश्रमाचा मुख्य उद्देश होता. माहेरी परत आल्यापासून वसुधा काम तर करत होती. ती माहेरी परत झाल्यापासून, आई जरा स्वस्थच होती. त्यामुळे घरातली जास्तीत जास्त कामं वसुधालाच करावी लागत होती. पण कोणा जवळच तिच्या कष्टाचं मोलही नव्हतं आणि कौतुकही नव्हतं. आता ही रिकामीच तर असते, मग केलं काम म्हणून काय बिघडलं, काम केल्याने काही कोणी झिजत नाही; या वृत्तीनेच तिच्या कामाकडे बघितलं जायचं.

तिनी आश्रमाची गोष्टं, वडिलांच्या कानावर घातली व त्यांनी तिला फक्त पुण्याला पोहोचेपर्यंतचे पैसे द्यावेत अशी विनंती केली. एकदा आश्रमात गेल्यावर, शिक्षण झाल्याशिवाय व नोकरी लागल्याशिवाय माघारी येणार नाही, पुन्हा कधी त्यांच्याकडे पैसे मागणार नाही, अशीही कबुली दिली. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. वडील तिला पैसे द्यायला तयार झाले नाहीत. वसुधा जवळ आता काही पर्यायच उरला नाही.

श्री धोंडो केशव कर्वे यांनी हा आश्रम काढण्याचे खरं कारण असं होतं की, त्या काळच्या अशा परित्यक्त स्त्रियांना, बालविधवांना पुष्कळदा घरातल्या किंवा बाहेरच्या पुरुषांच्या वासांधतेला सामोरं जावं लागत असे. अजूनही स्त्रीत्वाला समाजात पुस्तकी प्रतिष्ठा आहे. त्या काळी तर स्त्रीत्वाला काहीच प्रतिष्ठा नव्हती. काही अधिकार नव्हते. बोभाटा करावा, तर हीच माझ्या मागे लागली, अशा बदनामीची भीती, पुरुषांनी आधीच घालून ठेवलेली असे. शिवाय कुणावर तरी अवलंबून राहिल्यामुळे येणारी अगतिकता, लाचारी यामुळे या गोष्टीपासून त्यांची सुटका नसे. श्री कर्वे यांनी लग्न होऊन, दोन्ही बाजूंनी निराधार झालेल्या स्त्रियांसाठी हा आश्रम काढला होता. आश्रमाकरता सध्यातरी छोटीशी पण स्वतंत्र जागा होती. दोन-तीन खोल्या होत्या. तिथे मुलींनी रहावयाचे असे. तिथे त्यांना व्हर्नाक्युलर फायनलपर्यंत ( मराठी सातवी पर्यंत ) शिक्षण दिले जात असे. तसे प्रशस्तीपत्रही देत असत त्याच्या आधारावर. , सरकारमान्य शाळेत त्यांना प्राथमिक शिक्षिकेची नोकरी मिळू शकत असे. या स्त्रिया कर्व्यांच्या मुशीतून, तावून सुलाखून, बाहेर पडलेल्या असत ; त्यामुळे त्यांच्याकडून योग्य वर्तनाची हमी मिळत असे.

अशा या आश्रमात आपल्याला प्रवेश मिळावा अशी वसुधाची इच्छा होती. परंतु ती पूर्ण होण्याची काहीच शक्यता

नव्हती. खरेतर तिला समाजात सन्मानांनी जगायचं होतं. पण ते जमू शकत नाही, हे लक्षात आल्यावर ती निराश झाली. तिला काही ही जीव – बिव द्यायचा नव्हता. तिला जगायचं होतं, पण ते चांगल्या रीतीने. पण आता काहीच पर्याय चालत नाही, हे लक्षात आल्यावर, निराशेपोटी आईला म्हणाली, “ जर बाबांनी मला पुण्याला आश्रमात जाण्याकरता पैसे दिले नाहीत, तर मी मी जीव देईन. मला असं घरात बिन मोलाचं काम करत जगायचं नाही आहे.

पहिल्यांदा आईनी तिच्या या बोलण्याकडे अजिबात लक्ष दिलं नाही. पण चार-दोन वेळा या गोष्टीचा उच्चार झाल्यावर, आपसूकच हा विषय तिच्या वडिलांच्या कानावर गेला. ते हबकलेच. त्यांना खरं देखील वाटेना की आपली ही साधीसुधी मुलगी असं बोलते. पण प्रत्यक्ष आईकडूनच ही गोष्ट कळल्यामुळे त्यांनी या गोष्टीवर विश्वास ठेवला. ते हादरलेच मनातून. नसती ब्याद नको, आणखी कटकटी नकोत, खरच कार्टीनी जीव दिला तर, बाकीच्या दोन मुलींची लग्न कशी होतील? शिवाय पुढे आपल्या मुलांना मुली तरी कोण देतील? अशा भीतीने घाबरून जाऊन, त्या भित्र्या माणसाने तिला पैसे द्यायचं ठरवलं.

या माणसाला मित्रा म्हणायचं अशासाठी की, मुलगी माघारी आल्यावर, तिच्या माघारी येण्याचं कारण शोधून तिच्यावर अन्याय

झाला असल्यास, त्यांनी तिच्या सासरच्या माणसांकडून तिला न्याय मिळवून देण्याचा निदान प्रयत्न तरी करायला हवा होता. पण तेवढं धाडसंच त्यांच्या स्वभावात नव्हतं. त्यांनी गुपचुपपणे मुलीला घरात ठेवून घेतलं; आणि आपण तिला आधार दिला आहे, तेव्हा आता तिनी आता घरातली कामं करत, आपलं आयुष्य घालवावं असं त्यांना वाटत असे. पण वसुधाला ते मान्य नव्हतं. शेवटी तिच्या बोलण्याला घाबरून, त्यांनी तिला पैसे द्यायचं ठरवलं. त्यांनी तिला पुण्यापर्यंत जाण्याचे, व पुढे तिला आश्रमात पोहोचता येईल इतके पैसे दिले. शेवटी बापाचं हृदय ते. पोरी करता त्यांनाही वाईट वाटत होतंच.

वसुधा लगेच पुण्याला आली आणि कर्वे यांच्या आश्रमात दाखलही झाली. श्री कर्वे स्वतः आणि आणि त्यांच्या पत्नी माननीय सौ. बाया कर्वे, दोघे मिळून आश्रमाचे काम बघत असत. बायाबाई अतिशय शिस्तीच्या होत्या. त्यांचे शिस्त व काम करण्याची पद्धत यात अजिबात फरक पडलेला त्यांना चालत नसे. ते एकदा नीट करता आलं, की पुरेसे असे. या बायकांशी , एक स्त्री म्हणून, त्यांची वागणूक अतिशय सहृदयतेची असे. पण शिस्तीच्या बाबतीत तडजोड नव्हती.

वसुधाला शिकायचं होतं. शिकून स्वतःच्या पायांवर उभं राहण्याचं तिचं ध्येय होतं. त्यामुळे तिनी सहजतेनीच त्यांची शिस्त आत्मसात केली. ती चौथी पास होतीच. त्यामुळे पुढच्या तीन वर्षांत ती व्ह. फा. चांगल्या रीतीने पास झाली. लगेच एका शाळेत तिला प्राथमिक शिक्षिकेची नोकरीसुद्धा मिळाली. आता ती स्वतंत्र होती. पगारातले थोडे पैसे ती वडिलांना पाठवत असे. तिला वडिलांच्या परिस्थितीची जाणीव होती. आस्थाही होती.

शाळेपासून साधारणपणे एक ते दीड किलोमीटरच्या अंतरावर तिने एक छोटीशी खोली भाड्याने घेतली. खोली अगदी छोटीशी होती. पण सभोवताली अंगण होतं आणि जवळच एक कट्टाही होता बसायला. तिच्या त्या छोट्याशा खोलीचा अनेकांना फायदा मिळाला. फक्त झोपायच्या वेळी थोडीशी समस्या निर्माण व्हायची. उन्हाळ्यात तर आलेला पाहुणा कट्ट्यावरच पथारी टाकायचा. हिवाळा पावसाळ्यात दोन ते तीन माणसं तिच्या खोलीत झोपू शकायची. वसुधा कुटुंबवत्सल होती. येणाऱ्या-जाणाऱ्याचा ती, तिच्या शाळेच्या वेळा व काम सांभाळून व्यवस्थित पाहुणचार करायची. स्वतःकरता सुद्धा ती सकाळी चारी ठाव स्वयंपाक करीत असे. उगाच टाळाटाळ करुन, थोडं खाऊन दिवस काढणे, तिला पटत नसे. तशी ती स्त्रीच होती ना! परिस्थितीने तिला नोकरदार बनवलं होतं. तिच्या आईचं वळण व बायाबाईंची

शिस्त यांचा तिला फार उपयोग झाला. तिनं आपली खोली फार सजवली नव्हती; पण तिची खोली नेहमी स्वच्छ व व्यवस्थित असे.

पाहुणे आले की तिचा वेळ चांगला जात असे. तिचा दिवस एरवी चांगला जाई. पण संध्याकाळ सरता सरत नसे. संध्याकाळी आता वेळ कसा घालवायचा अशा प्रश्न तिला पडत असे. मग ती संध्याकाळी शेजारच्या बागेत जाऊन बसे. तिथे बसून ती मुलांचा खेळ बघत ,येणाऱ्या जाणाऱ्यांचे निरीक्षण करत, आपला वेळ घालवत असे. वसुधा तरुण होती. काळी सावळी असली तरी नीटनेटक्या रहाणीमुळे, व नव्यानेच तिच्यात आलेल्या आत्मविश्वासामुळे ती चारचौघीत उठून दिसत असे. एक दिवस एक तरुण तिच्या समोर येऊन उभा राहिला. त्याने अदबीने, “ मी इथे बसू शकतो का? “ असं तिला विचारलं. वसुधा जरा सरकून बसली, आणि म्हणाली, “ बसा की; बाक काही माझ्या एकटीचा नाही आहे. ” मग तो तरुण तिच्या शेजारी बसला. पण तो नुसता बसला नाही; तर तो तिला म्हणाला, “ नेहमी पाहतो मी तुम्हाला. पण तुम्ही नेहमी मी एकट्याच असता. तुम्ही एकट्याच आहात का? तुम्हाला मैत्रिणी नाहीत? त्या काळात, स्त्रीला मित्र असण्याच्या संबंधच नव्हता. वसुधा म्हणाली, “ आहेत मैत्रिणी मला. पण त्या या भागात राहात नाहीत. त्यामुळे संध्याकाळी

माझ्याबरोबर कोणी येऊ शकत नाहीत. ” बोलण्याने बोलणं वाढत गेलं.

आता पुष्कळदा तो तरुण तिथे यायला लागला. वसुधालाही एकटेपणात त्याचा सहवास आवडायला लागला होता. पुन्हा त्याच्या बोलण्यात आक्षेपार्ह असं काही नसायचं. अनेक विषयांवर त्यांच्या साध्या सरळ गप्पा व्हायच्या. होता होता त्यांची मैत्री अगदी परिपक्व झाली. खरंतरं त्यांच्या स्वभावात फार फरक होते. वसुधा जरा फटकळंच होती. एकटे राहणाऱ्या स्त्रीला फार मऊ असून चालत नाही. आपल्या बोलण्याचा कोण काय अर्थ काढेल, ते माहित नाही. त्यामुळे ती जरा फटकळपणे बोलत असे.

उलट तो तरुण – त्याचं नाव उमेश, अतिशय शांत स्वभावाचा होता. त्याच्या वागण्यात ऋजुता होती, बोलण्यात आर्जव होतं. ते खोटं, तकलादू नव्हतं. अस्सल होतं. तोच त्याचा स्वभाव होता. एके दिवशी तो वसुधाला म्हणाला, “ वसुधाबाई, माझ्याशी लग्न कराल? तुमचा एकटेपणा संपेल. मलाही लग्न करायचं आहे? ” वसुधा चपापली. मनातून तिलाही वाटतंच होतं की, त्याने आपल्याला लग्नाचं विचारावं. पण आपले विचार ओळखून त्याने विचारलं की काय, या विचारानी ती बावरून गेली. तिची अस्वस्थता पाहून, तो म्हणाला, “ वसुधाबाई, अहो आत्ताच्या

आत्ता उत्तर दिले पाहिजे असं काही नाही. तुम्हाला लागेल तितका वेळ घ्या. विचार करा. संपूर्ण आयुष्याचा प्रश्न आहे हा! त्याचे उत्तर असं घाईघाईने देता यायचं नाही. देऊही नये. हवंतर तुमचा विचार पूर्ण होईपर्यंत मी तुम्हाला भेटणार सुद्धा नाही. ”

त्याचं हे बोलणं ऐकून तर वसुधाच्या त्याच्याबद्दलच्या आकर्षणात भरच पडली. तरुणच वय होतं तिचं! तिलाही त्याचा सहवास हवाहवासा होता. तो मिळणार नाही, या नाही या कल्पनेने ती व्याकूळ झाली, घाईघाईने ती म्हणाली, “ तशी काही गरज नाही. आपण नेहमीसारखं रोज भेटू शकतो. त्याने माझ्या विचारात अजिबात फरक पडणार नाही. वस्तुतः ती खरंच विचारात पडली होती.

विवाहित आहोत, नवऱ्याचं घर सोडून आलो आहोत, हे कळल्यावर, त्याची प्रतिक्रिया काय असेल? तो उठून निघून तर जाणार नाही? आपला विचार सोडून तर देणार नाही अशी तिला भीती वाटली. आपण तर नवऱ्यापासून अजून कायदेशीर घटस्फोट सुद्धा घेतलेला नाही. मग आपण पुन्हा लग्न कसं करू शकतो? सगळंच अवघड आणि अशुद्ध. आता तीन-चार वर्षांनी घटस्फोट मागितला, तर ते तो सरळपणे देतील की नाही याचीही शंकाच आहे. एक ना अनेक प्रश्नांचा गुंता तिच्या डोक्यात झाला होता.

त्यातल्या एकाही प्रश्नाचं समाधानकारक उत्तर तिला सापडत नव्हतं. ती अगदी गोंधळून गेली होती. तिची वैचारिक, भावनिक कोंडी झाली होती. यातून बाहेर कसे पडावे हे तिला समजत नव्हतं. त्यामुळे उमेशला काहीच सांगू शकत नव्हती.

शेवटी वाट पाहून पाहून, उमेशनीच या विषयाला हात घातला. तो तिला म्हणाला, वसुधा मी तुला लग्नाबद्दल विचारून इतके दिवस झाले. पण तू माझ्या प्रश्नाचं काहीच उत्तर दिलं नाहीस. तुला काही अडचण आहे का? तुझं कुटुंब तुझ्या पगारावर अवलंबून आहे का? तसं असलं तर स्पष्ट सांग. माझी त्यालाही हरकत नाही. लग्नानंतरही तुझा पगार तू तुझ्या माहेरी देऊ शकशील.

माझं स्वतःचं घर आहे. माझ्या पगारही बऱ्यापैकी जास्त आहे. शिवाय आपली झेप काही फार मोठी नाही, तेव्हा माझ्या एकट्याच्या पगारात सुद्धा, आपण आनंदानी राहू शकू. तेव्हा तेवढ्या करता, तू नाही म्हणू नकोस. आता तर वसुधाच्या डोळ्यातून अश्रूंची बरसातच सुरू झाली. तिला रडताना पाहून तोही विद्ध झाला. आता आणखी कशा रीतीने तिची समजूत काढावी, हेच त्याला कळेना. तोही रडवेला झाला. तेव्हा स्वतःला सावरत वसुधा म्हणाली, तसं काही नाही आहे, मी माझ्या वडिलांना थोडे

पैसे पाठवते ; पण ते माझ्यावर अवलंबून नाहीत. माझी समस्या वेगळीच आहे. मी विवाहित आहे. तिनी एका दमातच सांगून टाकलं. तिला वाटलं, तो आता आपल्या समोरून उठूनच जाणार. संपले आपले संबंध. पण तिचे शब्द ऐकून तो अगदी दिग्मूढ झाला होता. या गोष्टीची त्याने कल्पनाच केली नव्हती. आता त्याला तिच्या एकटेपणाचा उलगडा झाला. त्याने जरा वेळ जाऊ दिला; तोही जरा शांत झाला; मग तो तिला म्हणाला, “ मला नीट सांग, काय समस्या आहे तुझ्यात आणि तुझ्या नवऱ्यात? मी त्यासाठी काही करू का?”

वसुधा घाईघाईनं म्हणाली, “नको नको, तसं काही नाही;

उमेश – मग कसं आहे? तो दारू पितो का?

वसुधा म्हणाली मला कारण विचारू नका; पण मी नवऱ्याचं घर सोडून कायमची माहेरी राहायला आले आहे. प्रथम मी माहेरी गेले. एक वर्षभर तिथेच होते. नंतर मी शिक्षण घेण्याकरता श्री कर्वे यांच्या आश्रमात राहावयास आले. मी व्ह. फा. झाले आणि आता नोकरी करते आहे. घरी वडील आहेत, पण ते अनपढ आहेत. त्यामुळे आपल्याला कोणाचाच आधार नाही असं वाटतं. तसे आम्ही खाऊन पिऊन सुखी आहोत. मी माझ्या नवऱ्या पासून घटस्फोट सुद्धा घेतलेला नाही; आणि आता घटस्फोट मागायला

गेल्यास ते सरळपणानी ही गोष्ट मान्य करतील कशावरून? ही माझी खरी समस्या आहे. ते देखील पुण्यातच राहतात. कधीतरी त्यांना आपल्या लग्नाबद्दल कळलं, तर कशावरून ते आपला सुखाचा संसार उध्वस्त करणार नाहीत? एवढं बोलल्यावर तिला गदगदून रडायला आलं.

खरंतरं ही समस्या फारच गंभीर होती. पण जिथे खरं प्रेम आणि सद्भावना असते तिथे मार्गही ही असतात. त्याग करण्याचीही तयारी असते. उमेश तिला म्हणाला, "अगं मग रडतेस कशाला? देवा ब्राह्मणांसमोर, मंगलाष्टकं म्हणून लागतं, तेच काही लग्न नव्हे. लग्नाचे अनेक प्रकार असतात. आपण देवळात जाऊ, देवाला नमस्कार करू, एकमेकांशी प्रामाणिक राहण्याच्या शब्दात घेऊ; त्या सुद्धा बोलून नव्हे, तर मनोमन शपथा घेऊ; आणि एकत्र राहायला सुरुवात करू. फक्त आपल्या मनाशी आणि जोडीदाराशी प्रामाणिक असलं म्हणजे झालं.

हे शब्द ऐकून, वसुधा हरखूनच गेली. उमेशचं आपल्यावर खरोखरच प्रेम आहे, हे तिला नव्यानी उमगलं. पण दोघांनी शपथा

घेण्याची घाई केली नाही. दोघेही एकमेकांच्या घरी गेली. त्यांनी घरात सगळ्यांना सांगितलं, की त्यांची लग्न करून एकत्र राहण्याची इच्छा आहे; पण प्रत्यक्षात ती गोष्ट शक्य नाही, म्हणून आम्ही देवासमोर शपथ घेऊन, लग्न करणार आहोत, असं सांगितलं. वसुधेच्या वडिलांना तर वसुधेच्या जबाबदारीतून

मुक्तता हवीच होती; बिना पैशात मुलीला चांगला जोडीदार मिळतोय ही गोष्ट तर त्यांच्या पथ्यावरच पडणारी होती; त्यामुळे त्यांनी लगेच होकार देऊन टाकला.

उमेशच्या घरी मात्र या गोष्टीने थोडी खळबळ माजली. पण उमेशचा निश्चय, वसुधेची त्याच्यावरची श्रद्धा, शिवाय वसुधा मिळवती आहे, हा तिचा प्लस पॉइंट लक्षात घेऊन, बऱ्याच चर्चेनंतर त्यांनीही मान्यता दिली. दोन्ही घरच्या लोकांच्या समक्ष त्यांनी शपथा घेतल्या; आणि त्यांचं मीलन झालं. त्यांचं आधीच बोलणं झाल्याप्रमाणे, "आपण रीतसर लग्न केलेलं नाही, त्यामुळे आपल्या मुलांना कदाचित समाजमान्यता मिळणार नाही, म्हणून आपण आपण मुलांचा मोह सोडून द्यायचा, असं ठरवलं; आणि ते आयुष्यभर पाळलं.

लग्नंच न केल्यानी नाव वगैरे बदलण्याचा प्रश्नच नव्हता. तसेच त्यामुळे वसुधा कोणत्याही नातेसंबंधात अडकली नाही.

दोघांनीही एकमेकांच्या घरच्यांचा आदर केला. त्यांच्या जबाबदाऱ्या, जोडीदारावर न टाकता

आपल्या आपण पार पडल्या. एकमेकांना मदतही केली. त्यांच्यात झालेला हा बदल, त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या लोकांच्या लक्षात न येता, तरच नवल. पण या दोघांचं वागणं इतकं संयमित होतं, की कोणीही त्यांच्यावर टीका केली नाही किंवा त्यांचा उपहासही केला नाही. यावरून त्यांची कोणी थट्टा केली नाही किंवा त्यांना टोमणेही मारले नाहीत. त्यांच्या या संबंधाला समाजमान्यता मिळाली. दोघंही सन्मानाचं जीवन जगले. फक्त वसुधाला आपल्या नावामागे सौ. ही उपाधी लावता आली नाही. आणखी एक पथ्यं त्यांना पाळावं लागलं.

दोघं एकच घर घेऊन, हे आमचं घर म्हणून कधी राहिले नाहीत. कारण दोघांनाही आपल्या संबंधांच्या मर्यादा माहीत होत्या. दोघंही एकमेकांच्या घरांमध्ये व नातेवाईकांमध्ये गुंतून गेले होते. असा हा जगावेगळा संसार त्यांनी चांगला तीस-पस्तीस वर्षे केला.

चार महिन्यांच्या अंतराने दोघांनीही आपली जीवनयात्रा संपवली. वसुधा आधी गेली. उमेशनी तिची खूप सेवा केली. वसुधा समाधानाचे जीवन जगली समाधानातच तिचा मृत्यू झाला.

त्यानंतर साध्या तापाचं निमित्त होऊन उमेशही देवा घरी गेला. त्याच्या पुतण्यांनी त्याची सेवा केली. लग्न न करताही समाधानानं जीवन व्यतीत केलेलं, असं हे जगावेगळं जोडपं. परस्परांवर प्रेम आणि त्याबरोबरच त्यागही करणारं. लग्न न करताही सहजीवन जगलेलं.

आता अशा सहजीवनाला जे सवंग रूप आलेलं आहे, त्याचा लवलेशही त्यांच्या जीवनात नव्हता. दोघांनीही एकमेकांना जपलं, फुलवलं नि एकत्रच या जगाचा निरोप घेतला जणू काही स्वर्गलोकीही एकत्र राहण्याकरता.

# षोडशी

वाचक हो, ही गोष्ट आहे ८० / ९० वर्षांपूर्वीची. एका मनस्वी स्त्रीची. तिच्यावर झालेल्या अन्यायामुळे बधिर झालेली. सगळं जीवनच मुळी तिच्यावर लादलेलं; जीवनात आनंद, समाधान, मन:शांती या गोष्टींचा दुरान्वयानेही संबंध न आलेली; तिच्याबाबतीत घडलेल्या गोष्टी, न्याय्य होत्या की अन्याय होत्या, हे ज्याचं त्यांनी आपल्या विचारांनी ठरवावं. पण सुधाचं जीवन मात्र करपून गेलं होतं. मग तिनी वेगळ्याच पद्धतीने सुख मिळवण्याचा प्रयत्न केला. बघा पटतंय का!

तो काळ मुलगी देऊन टाकण्याचाच होता. मुलीनी चार दिवस माहेरी यायचं, एवढाच तिचा हक्क! या पलीकडे मुलीला माहेराकडून फारसं काही मिळायचं नाही. ( संपत्तीच्या दृष्टीने नव्हे ) तर मुलगी म्हणजे परक्याचं धन. ती लग्नं होऊन दुसऱ्या घरी जाणार. तेच घर तिने आपलं मानलं पाहिजे. तिने माहेरचा विचारही करायचा नाही. आणि माहेरही तिला आपलं म्हणणार नाही. म्हणून ती आम्हाला मेली, आम्हीही तिच्यासाठी मेलो, ही ठाम समजूत.

मुलीला काही समस्या आल्या, तर त्या तिने स्वतः सोडवाव्यात. न सोडवता आल्यास, भोग म्हणून भोगाव्यात. उगीच अडचणी सांगून, माहेरच्या लोकांना अडचणीत टाकू नये, हीच माहेरच्यांची अपेक्षा असायची. मुलीचं लग्न झालं, म्हणून काही आपलं तिच्याशी नातं बदलत नाही आणि संपतही नाही, ही कल्पनाच कोणाच्या मनात नसायची.

मुलीच्या सासरच्या समस्यांमध्ये लक्ष घालण्यात तिच्या माहेरची पत कमी होते, माहेरच्यांचा अपमान होतो, असं मानण्याचा काळ होता तो. त्यामुळे सुधामुळे उद्भवणाऱ्या समस्या, कधी हस्ते परहस्ते, तिच्या आई-वडिलांना पर्यंत पोहोचल्या तरी त्यांनी त्यात कधीच लक्षं घातलं नाही. मनोहरांचं कुटुंब, सुधाचं सासर अतिशय सज्जन आणि सुसंस्कृत. त्यामुळे सुधाच्या वागण्याची तक्रार तिच्या माहेरी करायची कल्पनासुद्धा त्यांना सहन झाली नसती. आपण सुधाला लग्न करून घरात आणली,आता ती आपली झाली. आता जे काय घडेल, ते आपणच निभावून नेले पाहिजे. ही सासरकडील लोकांची पक्की धारणा.

सोळा वर्षाची अल्लड सुधा. आतापर्यंतचं तिचं जीवन अगदी फुलपाखरी. अतिशय लाडात वाढलेली, वडील मोठे कारखानदार. सांगली सारख्या शहरात त्यांचा कारखाना. दोन भावांची लाडकी,

धाकटी बहीण. घरात स्वतः उठून पाणी घेण्याची, भावा – वडिलांना कधी चहा करून देण्याची सुद्धा सवय नसलेली; आई-वडिलांनी, तळहातावरच्या फोडासारखी जपलेली, साड्या, दागिने, सिनेमे, मैत्रिणींबरोबर हिंडणं – फिरणं, शॉपिंग, याच्या बाहेर काही जग असू शकतं याची थोडीसुद्धा कल्पना नसलेली सुधा. तिला तिच्या वडिलांनी या सनातनी जुन्या वळणाच्या घरात देऊन टाकली.

मनोहरांचं घराणं मोठं तालेवार. सुसंस्कृत. मुलगा – स्वानंद चांगला शिकलेला होता. दिसायला सुरेख होता. नोकरी करत होता. सुपारीच्या खंडाचं सुद्धा व्यसन नव्हतं त्याला; शिवाय तोलामोलाची श्रीमंती होतीच, आणखी काय पाहायचं असतं वडलांनी? हीच पद्धत होती तेव्हा. मुलींनी सासरी जाऊन पडायचं, ते कधीही माहेरी न परतण्यासाठी, ही माहेराची अपेक्षा.

तर नव्या सुनेने लग्न झाल्या क्षणापासून, घरातली सर्व जबाबदारी घ्यायला तयार आणि तत्पर असायलाच पाहिजे. ही सासर-माहेरच्यांची व समाजाचीही अपेक्षा. तिच्या काही अपेक्षा असतील, तिला या नव्या घरातल्या चालीरीती माहीत नसतील, स्वयंपाकात, घरातल्या लोकांना आवडत असलेली चव माहिती नसेल, असले ‘ कोते ’ विचार त्यावेळी घरातली वडीलधारी

मंडळी व समाजही करीत नसे. घरातील सर्व मंडळी अनोळखी, नवऱ्याशी बोलायचीच सोय नाही, तर तक्रार कशाची आणि कोणाकडे करणार? अर्थात सुधाच्या बाबतीत तर, इतकं चांगलं सासर मिळाल्यावर, तक्रारीला जागाच कुठे आहे? आणि तक्रार तरी कशी करणार? कोणाकडे करणार? नव्या नवरीनं तक्रार करायला तोंड सुद्धा उघडायचं नाही, हीच तर रीतभात होती समाजाची.

नवी नवरी आधी सासू-सासऱ्यांची सून असायची, दिरा-नणंदांची भावजय असायची, घरात इतर कोणी मंडळी असली, तर त्यांची नाती जपायची जबाबदारी असायची तिच्यावर, आणि मग शेवटी कुठेतरी नवऱ्याची बायको. सासरच्या कुत्र्याला सुद्धा, ' अहो, हाडा, उठा जरा,' म्हणायचं. इतका तिने सगळ्यांचा मान ठेवावा, अशी अपेक्षा असायची. सुनेनी खालमानेनीच राहिलं पाहिजे. तिला बोलता येतं की नाही, असा प्रश्न पडावा, इतकं अबोल तिने असलं पाहिजे. स्मितहास्यच्या पलीकडे हास्य तिला वर्ज. ही चांगल्या सुनेची व्याख्या. या वातावरणात देऊन टाकलेली अल्लड सुधा. या सगळ्या गोष्टी, औषधाला सुद्धा माहीत नसलेली सुधा, कितीही प्रयत्न केला, तरी चांगल्या सुनेच्या या व्याख्येत बसणार कशी?

सुधाने खूप प्रयत्न केले सासरच्या सर्व चालीरीती आत्मसात करण्याचा. पण तरीही फरक पडलाच. नव्या सुनेने कितीही प्रयत्न केला, तरी व्यक्ती भिन्नतेमुळे फरक हा पडणारच की हो! पण हा अन्याय सासरच्या लोकांनी का सहन करायचा. झालं! सुधाबद्दल पहिल्या दोन दिवसातच तक्रारींची ही मोठी यादी तयार झाली. त्यांनी या तक्रारी आपणहून तिच्या माहेरापर्यंत पोहोचवल्या मात्र नाहीत. पण अधून मधून माहेरच्या मंडळींचा उद्धार व्हायचाच.

आपण कुठे घेऊन पडलो आहोत? आपलं काय चुकतं आहे? या विचारांनी त्रस्त आणि ग्रस्त झालेली सुधा, आता आपल्याला माहेरीही आसरा नाही, हे पक्केपणानी ठाऊक असलेली सुधा. येऊन जाऊन काही बोलू शकणार तर ते नवऱ्याशीच. पण स्वानंद पडला, त्याच्या आई-वडिलांचा लाडका, आज्ञाधारक मुलगा. तो बरा या अनोळखी मुलीकडून आपल्या आई-वडिलांबद्दलच्या, घराबद्दलच्या तक्रारी ऐकून घेईल? त्याने निदान सहानुभूतीने या तक्रारी ऐकून घेतल्या, तर सगळे त्याला म्हणणार बाईलबुद्ध्या. बायकोसाठी त्यानी का आपलं नाव खराब करून घ्यायचं? बरोबरच आहे नं हे?

तिच्याशी लग्न केलं, तिला आपल्या घरात स्थान दिलं, हीच तर केवढी मेहरबानी? अजून काय हवंय तिला? अपेक्षा तरी किती

ठेवायच्या तिने? लग्न केल्याच्या मेहरबानीच्या बदल्यात, घरातली जबाबदारी तिने खालमानेने उचलायलाच पाहिजे. त्यात वावगं ते काय? म्हणजे थोडक्यात सती जाण्यापेक्षा सुद्धा अवघड गोष्ट. सती जाताना एकदाच चटके बसायचे, नंतर जाणिवाच संपायच्या. वाजंत्रीच्या आवाजात, सतीच्या किंकाळया कोणाला ऐकूच जायच्या नाहीत. पण सधवा सुनेनी मात्र सतत कमी-जास्त तीव्रतेचे चटके मिटल्या ओठांनी, सहन करतच जगायचं! यात असहनीय क्रौर्य आहे, असं कुणालाच वाटायचं नाही.

बोलायला कोणी नाही, नवीन गाव, बाहेर जायची सोय नाही, घरात रेडिओ वगैरे होता, पण करमणुकीसाठी रेडिओ वगैरे लावायचा अगोचरपणा नव्या सुनेने अजिबात करायचा नसतो, हे सुधाला अनुभवांनी ठाऊक झालं होतं. त्यामुळे तोही मार्ग बंद. मग सुधाच्या मनानी काय केलं, तिच्या पूर्वीच्या आठवणी सुखद होत्या, त्यातच तिचं मन रमायला लागलं, तिच्या मनाला विसावा मिळायला लागला. तिच्या पद्धतीने ती घरातलं सगळं करतच होती. पण ते लोकांना हवं तसं नव्हतं. पद्धत तिची होती, हळूहळू सगळे निर्णयही तीच घ्यायला लागली. कोणाचंही बोलणं ती मनावर घेत नसे.

सुधा स्वभावानी बऱ्यापैकी बंडखोर होती. आतापर्यंत तिला कधीही मागे वळून पहावंच लागलं नव्हतं. . कितीही केलं तरी आपल्याला एकही चांगला शब्द ऐकायला मिळत नाही, मग निदान आपल्या मनाप्रमाणे का वागू नये? असं तिच्या मनाने घेतलं. मानवी मनाची गुंतागुंत कधी कोणाला उलगडली आहे का? आता सुधा समोर कोणाचंच काही चालत नसे. अगदी नवऱ्याचं सुद्धा. हळुहळू घरातले सगळे आवाज बंद झाले. सुधा म्हणेल ती पूर्व दिशा, अशी परिस्थिती झाली. पण सुधाच्या मनानी, वस्तुस्थिती नाकारायची ठरवली ती कायमचीच. सुधा कधी, साड्या, दागिने, सिनेमे – हॉटेलिंग या गोष्टींच्या बाहेर पडू शकली नाही. त्यातच तिचं मन रमायला लागलं.

नवरा नोकरी करत होता, पण पगार कुठे असायचे पूर्वी इतके? शिवाय उद्योगपतीच्या घरात येणारी आवक वेगळी आणि नोकरदारांच्या घरात येणारा मर्यादित पगार वेगळा. यांची तुलनाच होऊ शकत नाही. स्वानंदला फारशी महत्त्वाकांक्षाही नव्हती. घरच्या श्रीमंतीमुळे आणि आई-वडिलांच्या मुलाकडे ‘ मुलगा ‘ म्हणून पाहण्याच्या विशेष दृष्टिकोनामुळे, दुधावर जाड साय जमावी, तशी एक प्रकारची सुस्ती स्वानंदच्या मनावर चढलेली होती. आपली नोकरी आणि विश्रांती याच्या बाहेर तो कधी

पडलाच नाही मग बायकोचं मन बिन सांभाळण्याची तर बातच नको.

सुधाला सतत नवे दागिने, साड्या हव्या असत. काही दिवस माहेरून पैशाचा ओघ सुधापर्यंत येत होता. पण व्यवहाराची सूत्र भावांच्या हातात गेल्यावर, तो ओघ रोडावत आता बंद झाला होता. पण माहेरच्या पैशाचा ओघ बंद झाला म्हणून काही सुधाच्या सवयींमध्ये बदल झाला नव्हता. उलट आता एक प्रकारचा बेदरकारपणा तिच्या स्वभावात आला होता. नवऱ्याच्या पगारात आपला महिन्याचा खर्च भागला पाहिजे; हे साधं अंकगणित तिला साधत नव्हतं. कारण तिच्या माहेरी, महिन्याचा पगार वगैरे, अशा काही ही भानगडीच नव्हत्या. मनात आलं की, शॉपिंग करणं हाच सुधाचा छंद होता. हीच तिची आवड होती. तिच्या आई-वडिलांनी एकुलती एक म्हणून, तिचा हा छंद, त्यांनी लाडिक तक्रारी करत, जोपासला होता. तेव्हा माहेरी असताना ती जितक्या निर्व्याजपणे खरेदी करत असे, तितक्याच निर्व्याजपणे आणि सहजतेने आताही ती खरेदी करत असे.

त्यावरून तिच्यात आणि स्वानंदमध्ये, सतत वादावादी होत असे. वादावादी झाली, म्हणून सुधाचं खरेदी करणं थांबलं, असं काही कधी घडत नसे. मग दर महिन्याला, स्वानंदच्या

आईवडिलांनी जमवलेल्या पैशांना बाहेरची वाट दिसत असे. परवाचीच गोष्ट, सुधाच्या मैत्रिणीचं लग्न होतं. आपल्याजवळ कितीही साड्या असल्या, तरी मैत्रिणीच्या लग्नासाठी नवीन साडी घेणे, अपरिहार्यच. ही सुधाची धारणा.

“ अहो, उषाचं लग्न महिन्यावर आलं. अजून माझी खरेदी झाली नाही. मी कधी साडी आणणार आणि कधी त्यावर ब्लाउज शिवणार? शिवाय माझ्या खास मैत्रिणीचे लग्न. मग एखादा छोटासा नवा दागिना, नको का घ्यायला?” सुधा स्वानंदला म्हणाली. यावर स्वानंद उखडलाच एकदम. लग्न मैत्रिणीचं! त्याला कळेना हिला कशाला हवी आहे नवीन साडी? तो म्हणाला, ” सुधा, गेल्याच महिन्यात दोन साड्या घेतlल्यास ना, त्यातलीच एखादी नेस. एवढ्या करता नवीन साडी कशाला हवी आहे?”

झालं! स्वानंदचे हे शब्द ऐकल्याबरोबर, सुधाची बडबड सुरू झाली. “ कशाची म्हणून हौस नाही, मौज नाही, सदा आपलं, रांधा, वाढा, उष्टी काढा. स्वतःला चांगलं राहायला नको, मलाही राहू देऊ नका. ” असं म्हणून तिने रडायला सुरुवात केली. आता यावर स्वानंदचं काय चालणार! शेवटी त्याला म्हणावं लागलं, “ घे बाई साडी तुला हवी तशी. हाच प्रकार नेहमी घडत असे. शिलकीतले पैसे काढ, एखादी चांदीची वस्तू वीक, असं करून, सुधाची हौस

मौज स्वानंदला पुरवावी लागत असे. स्वतःच्या पगारातून काही पैसे शिल्लक टाकणं, ही गोष्ट त्याला कधी जमूच शकली नाही.

मग सुधाला हवी तशी साडी आली, एक मोत्याचा सर, बांगड्या आल्या, कानातलं आलं, पण नवे पैंजण काही घेता आले नाहीत. म्हणून घेतलेल्या वस्तूंनी सुधाबाईंचं समाधान झालंच नाही. न घेता आलेले पैंजणच सारखे डोळ्यांसमोर दिसत होते.

नेहमी असंच काही घडत असे. समाधान हा शब्दच जणू सुधाच्या शब्दकोशात नव्हता. अमर्याद या एकाच शब्दात सुधाचं वर्णन करता येईल. मर्यादा माहिती असली, की लोक थांबायला शिकतात. पण जिला मर्यादाच माहित नाही, ती व्यक्ती थांबणार कशी? तिच्या श्रीमंत आई-वडिलांनी तिला कधी मर्यादा घातली नव्हती. थांबायला ,शिकवलंच नव्हतं. सुधा म्हणेल ते करायचं, सुधा करेल त्याचं कौतुक करायचं, सुधा जे काही मागेल ते द्यायचं, हीच त्या घराची रीत होती.

एकदा मर्यादा समजली, की थांबावं लागतं, मर्यादा ओलांडून पुढे जाता येत नाही, हे लक्षात आलं, की लोक मर्यादेत राहून समाधान मानायला शिकतात. नाहीतरी समाधान हे मानण्यावरच असतं. कारण कुठलीच गोष्ट शंभर टक्के आपल्या मनाप्रमाणे घडत नाही. हे सत्य आहे. पण ह्या गोष्टी सुधाच्या जाणीवेतच नव्हत्या.

हा तिचा दोष नव्हता, असं म्हंटलं, तरी त्याचा त्रास तिला आणि तिच्या आजूबाजूच्या लोकांना होतच होता. सुधाला नुसतं खरेदीचे वेड नव्हतं.

नवीन सिनेमा लागला, की तो पाहायलाच हवा ; तिकिटं बॉक्स ऑफिसचीच असावीत. नुसतं एवढं करून पुरायचं नाही. तर त्यानंतर खरंतर फाइव स्टार पण निदान थ्री स्टार हॉटेलमध्ये जेवण हवंच.

या गोष्टी महिन्यातून एकदा झाल्या असत्या, तर ते स्वानंदच्या चौकटीत बसलं सुद्धा असतं. पण दर आठवड्याला या गोष्टी करणं, त्याच्या आवाक्याबाहेरचं होतं. दोघांचाही नाईलाज होता. त्याला हे खर्च करणं शक्यं नव्हतं; आणि तिला आपण काही त्रासदायक मागण्या करतो आहोत, हे समजत नव्हतं. कींव कोणाची करायची हा आपल्यासारख्यांसमोर प्रश्नच होता. दोघंही आपापल्या परीनं बरोबरच होती. चूक सुधाची नव्हती आणि स्वानंदचं म्हणणंही खरंच होतं.

कोणी पाहुणे आले, तरी हीच तऱ्हा. सुधा पाहुण्यांचं स्वागत फारच छान करायची. खर्चाला तिचा हात सढळच होता. पाहुणा अगदी खुश होऊन जायचा. पण स्वानंदच्या खिशाला मात्र मोठं थोरलं छिद्रं पडलेलं असायचं. त्याला वाटायचं, इतकं कशाला

करायला हवं, बेतास बात पाहुणचार केला, की पुरे. पण सुधाला तो हेमटेपणा वाटायचा. तिला वाटायचं, पाहुण्यांच्या बाबतीत कसली आलीये काटकसर. कधीतरी येणार ते. त्यांचं नीटच करायला हवं. नाहीतर आपल्या घराचा आब राहणार नाही. पण हा तिचा खर्चिकपणा पेलण्याची ताकद स्वानंदच्या हातात नव्हती.

तिच्या मुलाच्या मुंजीत तिच्या मागण्यांपायी स्वानंद हैराण होऊन गेला. तिला कुठेच काही कमी चालणार नव्हतं. मुंजीतल्या प्रत्येक विधीसाठी तिला वेगळी साडी आणि वेगळे दागिने हवे होते. साडीचं आपण समजू शकतो ;पण प्रत्येक विधीच्या वेळी वेगळे दागिने हवेत, ही अतिशय न परवडणारी मागणी होती. सांगून, समजावून ऐकेल तर ती सुधा कसली! शेवटी स्वानंदला तिच्या म्हणण्याप्रमाणे वागावंच लागलं. यामुळे त्याच्या आई-वडिलांनी साठवून ठेवलेल्या पैशांना व दागिन्यांना सारखी बाहेरची वाट दिसायची. गंगाजळीत भर तर कधी पडतच नव्हती; उलट तिला सतत गळती लागली होती. मुंजीत सुधा अगदी खूष होती. तिच्या मैत्रिणी, बहिणी तिच्या साड्यांचं आणि दागिन्यांचं खूप कौतुक करत होत्या. त्यामुळे आपण नवऱ्याच्या मागे लागून आपल्या मनासारखं करून घेतलं, हे अगदी बरोबरच केलं, याबाबत तिची खात्री पटली होती. तिची खर्चिक राहणीबघून त्यांचं सगळं नीट

चालू आहे, अशीच आईवडिलांची समजूत झाली. अंदरकी बात त्यांना कशाला कळते आहे?

नवरा हे पैसे कुठून आणतो? म्हातारपणाकरता आपण काही पैसे शिल्लक टाकतो की नाही? या असल्या गोष्टींचा विचारही ही तिच्या मनात येत नसे. मुलाच्या लग्नात सुद्धा हीच तऱ्हा होती. नव्या सुनेला घेतलेले दागिने आणि कपडे लक्षात ठेवून सुधाने स्वतःची खरेदी केली होती. तिच्यापेक्षा सुधाची खरेदी जास्ती होती. स्वानंद आता नोकरीतून निवृत्तीच्या मार्गाला लागला होता. हे त्याचं नोकरीचं शेवटचं वर्षं होतं. आता तरी थोडी बचत करावी असं त्याला वाटत असे. पण बचत कसली? फंडातून आगाऊ पैसे मात्र उचलावे लागले होते. सगळेजण तोंडावर सुधाचं कौतुक करत होते, आणि तिच्या माघारी, तिच्यावर टीका करत होते. कारण नवऱ्या मुलीबरोबरच प्रत्येक विधीनंतर सुधाही कपडे दागिने बदलायला जात होती; आणि नटूनथटून परत यायला तिला नव्या सुनेपेक्षा जास्त वेळ लागत होता.

सुनेच्या माहेरकडचे लोकं तर आपापसात सुधाची खिल्ली उडवत होते. आणि तोंडावर तिची स्तुती करून तिला वर चढवत होते. कोण काय म्हणेल याबाबत सुधाला काही देणंघेणं नव्हतं. सगळं आपल्या मनासारखं घडवून घेतलं, की ती आनंदातच

असायची. स्वानंद तिच्या आरडा ओरड्याला व कांगावखोरपणाला घाबरून असायचा. तिची प्रत्येक मागणी त्याला पूर्ण करावीच लागायची. तक्रार तरी कोणाकडे करणार?

स्वानंदच्या साठीशांतीच्या कार्यक्रमाच्या वेळी तर सुधाने अगदी कहरच केला. तिला माहिती होतं, की आता फंड आणि ग्रॅच्युईटी ( सेवा निवृत्तीच्या वेळी मिळणारे पैसे ) मिळणार आहे. यावेळी तिची मागणी खरंच फारच अव्यवहारी होती. तिला हवी होती काळी पैठणी; आणि त्यावर घालायला हिऱ्याच्या दागिन्यांचा सेट. निवृत्तीच्या वेळी हा खर्च करणं स्वानंदच्या आवाक्याबाहेरचं होतं. त्याने तिला हे समजावून देण्याचा खूप प्रयत्न केला. आता आपल्या म्हातारपणाच्या दृष्टीने पैसे शिल्लक टाकण्याची गरज आहे; हे सुद्धा समजावून सांगितलं. पण पहिले पाढे पंचावन्न. सुधाच्या डोक्यात प्रकाश पडेल तर शपथ. तिचा आपला एकच धोशा. तुमच्याजवळ पैसे आहेत तुम्ही या दोन्ही गोष्टी मला घेऊन दिल्यास पाहिजेत. शिवाय तिने खूपच कांगावा केला. स्वानंदला कसं तिच्याबद्दल काहीच वाटत नाही. दर वेळी मागे लागल्याशिवाय, कसं तिला काहीच मिळत नाही, याचा तिने पाढाच वाचला.

भीक नको पण पण कुत्रं आवर; असं म्हणण्याची पाळी आली स्वानंदवर. पण करतो काय बिचारा! झकत त्याने वडिलांनी त्याच्यासाठी ठेवलेल्या पुंजीतले शेवटचे पाच लाख रुपये काढले आणि सुधाची हौस पुरवली. कारण निवृत्तीनंतर मिळणाऱ्या पैशांचा चेक अजून हातात आला नव्हता. कार्यक्रमाच्या दिवशी सुधा खरंच खूप सुंदर दिसत होती. काळी पैठणी आणि त्यावर हिऱ्याचे दागिने तिला अगदी शोभून दिसत होते. खरोखरच सर्व लोकांमध्ये ती अगदी उठून दिसत होती; आणि स्वानंद मात्रं निवृत्तीनंतर, या पद्धतीने आपण कुठे जाऊन पोहोचणार आहोत, याचा विचार करत म्लान चेहेऱ्याने बसला होता.

सुधाच्या प्रत्येक हट्टाच्या निमित्ताने स्वानंदच्या वडिलांनी त्याच्यासाठी ठेवलेल्या पैशातले पैसे नेहमीच खर्च होत होते. सुधाला याची जाणीव असण्याचं किंवा काळजी वाटण्याचं काही कारणच नव्हतं. कारण तिला फक्त नवीन काय काय घेता येईल, याचाच विचार करता येत होता. त्याकरता लागणारे पैसे कुठून आणि कसे उपलब्ध होतात याच्याशी तिला काही कर्तव्यच नव्हतं. किंबहुना संसारात पैशाची आखणी करून पैसे खर्च करावे लागतात, याची तिला जाणीव नव्हती. परंतु एखाद्या उद्योजकाच्या घरात येणारा पैशांचा ओघ आणि ठेव म्हणून ठेवलेला पैसा यातला फरक माहिती असण्याइतकी तिच्या बुद्धीची वाढच झाली नव्हती.

म्हणजे सुधा बुद्धीने काही कमी नव्हती, पण या गोष्टी तिला माहितीच नव्हत्या; आणि माहिती करून घेण्याची गरज असते, म्हणजेच संसार सुखावह होतो, याची तिला कल्पना असण्याची काहीही शक्यता नव्हती.

सगळं मनासारखं करून घेऊनही सुधा सुखी नव्हती. कारण प्रत्येक गोष्ट मिळवण्याकरता तिला स्वानंदशी झगडावं लागत होतं. कोणतीच गोष्ट सहजी मिळत नव्हती. स्वानंद आपल्याला विरोधाकरता विरोध करतो, असं तिला वाटायचं. त्यामुळे तिच्या आणि स्वानंदच्या मधलं अंतर वाढतच चाललं होतं. मुळातच मनं कधी जुळली नाहीत. ना जुळला कधी पैशांचा ताळमेळ. सुधाही आता साठीला आली होती. वय वाढलं तरी मनाची प्रगल्भता वाढली नव्हती. खरंतर मनाची प्रगल्भता मुळातच कधी आली नव्हती. त्याची सुधाला गरजही नव्हती.

आता सुधाला वेगळेच वेध लागले होते. तिला हवा होता आधुनिक, सर्व सुखसोयींनी युक्त असा फ्लॅट. खरंतर त्यांचं राहतं घर वडिलार्जित होतं. मोठं होतं. सुस्थितीतही होतं; पण त्यात आधुनिक सुखसोयी नव्हत्या. तश्या स्वानंदनी हव्या त्या थोड्या फार सुखसोयी करून घेतल्या होत्या. पण तेवढ्याने सुधा समाधानी नव्हती. तिला तिच्या मैत्रिणीं सारखा आधुनिक सुखसोयिनी युक्त

असा तीन बेडरूमचा फ्लॅट हवा होता. स्वानंदनी तिला समजावून देण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला. पण पण समजूत पटेल, तर ती सुधा कुठली! शेवटी फ्लॅट घेणं त्याला भाग पडलं.

त्या काळात साधारणपणे निवृत्तीनंतर घर घेण्याची पद्धत असे. कारण पगार फार नसत. त्यामुळे तरुणपणात घर घेण्याइतके पैसे नसत. निवृत्तीच्या वेळेपर्यंत संसारातल्या जबाबदाऱ्या संपत येत असत. स्वानंदची स्थिती काही याहून वेगेळी नव्हती. त्याने एक तीन खोल्यांची सदनिकां घ्यायचं ठरवलं होत. पैशाच्या दृष्टीने तेव्हढंच करणं त्याला शक्यं होतं. पण सुधाच्या दृष्टींनी, या सर्व गोष्टी गौण होत्या. महत्त्वाचं होतं ते म्हणजे तिच्या आवडीचं घर घेणं. त्यात एवढं अवघड काय होतं? तिच्या दृष्टीने तर सगळच सोपं होतं.

पैसे नाहीत, पैसे नाहीत अशी ओरड स्वानंद मुद्दामच करतो आहे, त्याला तिच्या इच्छेप्रमाणे घर घ्यायचंच नाही आहे, असं तिचं मत होतं; आणि ते ती येणाऱ्या-जाणाऱ्या जवळ बोलून दाखवत होती. कधी कधी तर, स्वानंद समोर सुद्धा या तक्रारी ती करत होती. स्वानंद स्वतःला अगदी शांत ठेवायचा प्रयत्न करत होता. तिच्या मते स्वानंद जवळ पैसे नसले, तरी त्याचं घर होतं. ते

विकून सहजच पैसे उभे करता आले असते, केवळ तिची इच्छा पूर्ण करायची नाही ह्याच हेतूनी तो घर विकायचा विचार करत नव्हता.

स्वानंदला घर विकायची इच्छा नव्हती. कारण कारण आपल्या पश्चात मुलाकरता आपण काही पैसा-अडका ठेवू शकणार नाही, हे त्याला दिसतच होतं. मग निदान आधाराला घर तरी राहू द्यावं अशी त्याची इच्छा होती. बाप लेकांमध्ये तसं बोलणंही झालं होतं. म्हणून घर विकण्याच्या पर्यायाचा स्वानंद विचार करत नव्हता. त्याच्या दृष्टीनी त्या दोघांना आता तीन खोल्यांचं घर पुरेसं होतं. आता उतरत्या वयात, स्वच्छता ठेवायला, आवरासावर करायला छोटं घर असणं सोयीचं होतं.

सुनेला सुद्धा आता सुधा जवळ राहण्याची इच्छा नव्हती. तिला स्वतंत्र घर हवं होतं. छोटं घर घेण्यानी सगळंच साध्य होणार होतं. स्वानंद आणि सुधा, नव्या फ्लॅटमध्ये राह्यला जातील आणि आणि विजय आणि सुनबाई जुन्याच घरात राहतील अशी व्यवस्था करायचं स्वानंदच्या मनात होतं. या गोष्टीला सुधाची मान्यता नव्हती. सुनेचा इतका विचार करायची काहीच गरज नाही असं तिचं मत होत. आपल्या पश्चात मुलाला तीन बेडरूमचा फ्लॅट मिळणारच आहे. तेव्हा आणखी काही विचार करण्याची गरज नाही असं तिचं मत होतं. ती तिच्या मतावर ठाम होती.

त्या दिवशी तर कहरच झाला. सुधाचे भाऊ वहिनी आले होते. त्यांच्याजवळ सुधा स्वानंद आपलं कसा ऐकत नाही याची तक्रार करत होती. स्वानंदही समोरच बसलेला होता. आपण त्याच्यासमोरच बोलत आहोत, याचं भान सुधाला नव्हतं. आयुष्यभर आपण किती दुःखात राहिलो, आपल्याला कसं काहीच मिळालं नाही, याचा पाढाच वाचायला तिने सुरुवात केली. तिच्या भावाच्या तोंडावर कुत्सित हसू होतं. सुधाचं तिकडे लक्षच नव्हतं. तिच्या तक्रारींचा पाढा न संपणारा होता. सगळं काही तिच्या मनासारखं करूनही तिथे हे बोल ऐकायला लागावेत यांनी स्वानंद अगदी उकळत होता. त्यात मेव्हण्याच्या कुत्सित हसण्याची भर पडली.

त्यामुळे स्वानंदचा स्वतः वरचा ताबा सुटला. तो ही सुधाबद्दल तक्रारी सांगायला लागला. आजवर त्याने स्वतःवर संयम ठेवून, कधीही ही सुधाबद्दलची काय तक्रार केली नव्हती. सुधाच्या सगळ्या इच्छा पूर्ण करून सुद्धा, आज जणू आपल्या नाकर्तेपणाचा पाढाच भावासमोर वाचते आहे, असं त्याला वाटलं. त्यामुळेच आज ही विपरीत गोष्ट घडली. यावर तरी सुधानी थांबायला हवं होतं. पण सुजाणपणाने वागेल, तर ती सुधा कुठली! समजूतदारपणा, संयम यांचा गंधही ही सुधाला नव्हता. सुधाचं वय साठीला आलं होतं, पण स्वभाव अजूनही षोडशीचाच होता. ती

कां आपलं बोलणं बंद करेल? शेवटी तिच्या भावालाच मध्यस्थी करण्याची वेळ आली. स्वानंद, सॉरी म्हणून तिथून निघून गेला.

नुकसान झालं तरी चालेल, पण आपण आता घर विकून टाकायचं आसा त्याने मनोमन निश्चय केला. या गोष्टीला घरातूनच शह मिळेल याची त्याला कल्पना नव्हती.

याने घर विकायचे ठरवल्यावर, वडिलार्जित इस्टेट, तेव्हा आपला व आपल्या बहिणीचाही घरावर हक्क आहे, वडील संपूर्ण घर विकू शकत नाहीत. हे त्यांनी वकिलामार्फत वडिलांच्या लक्षात आणून दिलं. शिवाय आपल्या संमती आणि सही शिवाय ते घर विकू शकणार नाहीत, याचीही जाणीव त्याने वडिलांना दिली. त्यामुळे स्वानंदला धक्काच बसला. मुलगा व बाप यांच्यात अबोला सुरू झाला. कोणाचा कोणावर विश्वास राहिला नाही. शेवटी घराचे तीन हिस्से झाले, तेव्हा हा तिढा सुटला.

पण आता कोणाच्याच वाट्याला मोठी जागा आलेली नव्हती आपापल्या वाट्याचा हिस्सा विकून फक्त तीन रूमचा फ्लॅट येणार होता.

त्याहून मोठी जागा घेणे एवढ्या पैशात शक्यच होणार नव्हतं. आता तर सुधाची जळजळ फारच वाढली. आपल्या सुनेनीच मुलाचे कां भरून मुलाला असं वागायला भाग पाडलं, असा ग्रह

सुधानी करून घेतला. आणि म्हणून तिने विनाकारणच सुनेशी व मुलाशी अबोला धरला. मुलीला वेडंवाकडं पत्र लिहिलं. तिला या घरात काही हक्क नाही, असा सुद्धा तिला कळवलं. मुलींनी या पत्रात- पत्राचा उत्तर सुद्धा दिलं नाही. तिला कायदा पूर्ण माहिती होता, आणि बाबा तिचे वडील, कायद्याविरुद्ध काहीही वागणार नाहीत, याची तिला खात्री होती. मुलीशी सुधा नीट बोलली असती, तर कदाचित तिने तिचा हिस्सा नाकारला ही असता. आणि सुधाला अगदी तीन नव्हे, पण निदान दोन बेडरूमचा फ्लॅट घेता आला असता. पण आता ते शक्य नव्हतं. सुधानी आपल्या हातांनी आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतला होता. मोठं घर तर तर मिळालंच नाही. फक्त आता उतार वयात मुलामुलींशी संबंध बिघडले. त्यामुळे सुधाला एकाकीपणा आला.

आपलं काय चुकलं, हे आमच्या षोडशीला शेवटपर्यंत कळललंच नाही.

# आवर्त

केशव गुरुजी रोजच्यासारखे ब्राह्म मुहूर्तावर जागे झाले. त्यांच्या रोजच्या शिरस्त्याप्रमाणे ते लगेच उठले सुद्धा. पण आज त्यांच्या हालचालींमध्ये नेहमीचा जोश नव्हता. शरीराला आणि मनाला मरगळ आली होती.

रोज उठल्याबरोबर शौच-मुखमार्जन करून, लगेच संध्या आणि पाठोपाठ रोजचा जप हा त्यांचा वर्षानुवर्षांचा शिरस्ता. पण हल्ली असंच व्हायचं. काही करण्यात त्यांना उत्साहच वाटत नसे. मन कुठेतरीच भरकटत असायचं. नको नको ते विचार मनात यायचे. अनेक घटनांचे वेगळेच अर्थ, वेगळेच संदर्भ त्यांच्या लक्षात येत असत. मग ते अंतर्मुख व्हायचे. हे विचार त्यांना हवेसेही वाटायचे आणि नकोसेही व्हायचे. मनाची अशी ओढाताण सुरु झाली की कित्येकदा ते अगदी सुन्न होऊन बसून राहात.

केशव गुरुजींना हे विचार हवेसे वाटायचे कारण ते सच्चे असत. साधार असत. त्यामुळे हे नवविचार त्यांच्या मनाच्या गाभाऱ्यात रुजत चालले होते. या विचारांनी त्यांना मन:शांती मिळत असे. कारण हे विचार बुद्धीला पटणारे असत. सहज असत.

नकोसे अशासाठी असत की हे विचार त्यांच्या मनावर असलेल्या संस्कारांना छेद द्यायचे. मग ते सैरभैर होत. काय खरं नि काय खोटं हेच त्यांना समजेनासं होई. पूर्वसुरींनी केलेले संस्कार, दिलेली शिकवण खरी, की निरनिराळया अनुभवातून सत्याची अनुभूती देणारे हे विचार खरे, हेच त्यांना उमजेनासं होई.

आता उतरत्या वयात हा वैचारिक विसंवाद त्यांच्या मनाचा गोंधळ उडवून देत असे. त्यामुळे त्यांच्या रोजच्या आन्हिकात जरी खंड पडला नव्हता तरी ते करण्यात पूर्वीचा जोम उरला नव्हता; हे ही खरंच! खरंतर तसं काहीच बदललं नव्हतं. पण ----- हा पणच जणू त्यांच्या मनावर मणामणाचं ओझं लादत होता.

श्रीयुत राजीव बर्वे हे केशव गुरुजींचे एक धनाढ्य यजमान. बर्व्यांचा गुरुजींवर फार विश्वास, फार श्रद्धा. श्री बर्वे फार शिस्तीचे होते – संस्कारित होते. दर पौर्णिमेला त्यांच्याकडे श्री सत्यनारायणाची पूजा घातली जाई. ही त्यांच्या घराण्याची परंपरा होती व ती राजीवरावांनी पुढे चालू ठेवली होती. अर्थात पूजा सांगायला त्यांना केशव गुरुजीच हवे असत. पौर्णिमेच्या दिवसाचा कार्यक्रम ठरवतांना बर्व्यांकडला सत्यनारायण, त्यांची ती ठरलेली

तिन्हीसांजेची वेळ या सगळ्याचं अवधान गुरुजींना ठेवावं लागे. आज वर्षानुवर्ष या कार्यक्रमात खंड पडला नव्हता.

पण त्यादिवशीची संध्याकाळ मात्रं काही वेगळीच होती. आज आपले सारे संस्कार पणाला लागणार आहेत याची सुतराम कल्पना केशव गुरुजींना नव्हती. नेहमींसारखी पूजा उत्तमरीतीने पार पडली. श्री सत्यनारायणाची कथाही सांगून झाली. बर्वेवाहिनी गुरुजींसाठी दूध आणायला आंत गेल्या. गुरुजीही आपल्या सामानाची आवराआवर करत, जो समोर येईल त्याला तीर्थ – प्रसाद देत होते.

व्हरांड्यात श्री बर्व्यांचा मुलगा आणि त्याची मित्रमंडळी बसली होती. सगळी तारुण्याच्या नव्हाळीत आणि जोशात असलेली तरुणाई होती ती. भ्रष्टाचाराबाबत त्यांच्यात जोरदार चर्चा चालू होती. काहीजण चेष्टेनी तर काहीजण उपहासानी बोलत होते, तर काहीजण सात्विक संतापानी लोकांवर कोरडे ओढत होते. भ्रष्टाचारीवृत्तीवर चौफेर हल्ले होत होते. एव्हढ्यात एक नाजूक आवाज आला त्या आवाजानी सर्वांचं लक्षं आकर्षून घेतलं. एक लहानखुरी मुलगी – तनया म्हणत होती, ---- ‘‘मला तर बाई या

पैशाच्या देवाण-घेवाणीत काही वावगं आहे, काही चुकतं आहे असं वाटतच नाही! तिचं हे बोलणं ऐकून सारा ग्रुपच उसळून उठला. सगळेजण तिच्यावर तुटून पडण्याच्या आवेशात होते. एव्हढ्यात तिनी हातांनी सर्वांना थोपवलं. ती म्हणाली, “ अरे, माझं बोलणं अजून संपलं नाहीये. मला बोलू तरी द्या सगळं. ” सगळे एकदम शांत झाले.

“तिचं वक्तव्यं ऐकून वैतागलेला एक मुलगा म्हणाला, सांग बाई एकदाची; का ते सांगायलाही पैसे हवे आहेत तुला?

त्याचं बोलणं ऐकून सगळेजण हंसले: त्यांना वाटलं कशी जिरली हिची. पण ती अगदी थंडपणानी म्हणाली, मला पैसे वगैरे काही नको आहेत रे. जर शांत बस आणि मला माझं बोलणं पूर्ण करू दे. ” मुलं अगदी घायकुतीला आली होती. – तनया म्हणाली, “आता बघा, आपला हा धर्मच जिथे देवाणघेवाणीवर आधारलेला आहे. इथं तर काही दिल्याशिवाय, त्याची स्तुतिसुमनं उधळल्याशिवाय, देवासमोर पैसे टाकल्याशिवाय, तुमचा देवही तुम्हाला काही देत नाही, तिथे साध्या माणसाची काय कथा!”

"सगळी मुलं एकदम गप्पं झाली. सगळं वातावरण एकदम सुन्न झालं. आज प्रत्यक्ष सत्यनारायणाची पूजा नुकतीच झालेली असतांना ती हे बोलत होती, या विचारांनी सगळे हवालदिल झाले होते. "

" ती पुढे म्हणाली, देवाला बळी देणं, नवस बोलणं, सांकड घालणं, देवस्थानांना मोठाल्या देणग्या देणं, हे सगळ स्वत:चा फायदा व्हावा म्हणून. देवावर श्रद्धा, ही देवाला काहीतरी मागण्यासाठी. देवाची इतकी भक्ती कशासाठी तर स्वत:ची पापं लपविण्यासाठी. काळा पैसा लपविण्यासाठी; ही वृत्ती काय आणि लाच देऊन किंवा घेऊन स्वत:ची कामं करून घेणं काय – वृत्ती तीच आहे नं?

श्रीयुत बर्व्यांची मुलगी नेहा हे ऐकून म्हणाली, " अगं देव काही या वस्तू आपल्याकडे मागत नाही. लोकं 'आपणहून या वस्तू देवाला देतात. "

"तेच तर मी म्हणते आहे. अगं मी देवाला भ्रष्टाचारी ठरवत नाहीय. मी बोलते आहे माणसाच्या स्वार्थी बुद्धीबद्दल. माझा

विरोध आहे तो माणसांच्या वृत्तीला; देवाच्या देवत्वाला नव्हे. लाच घेणाऱ्यापेक्षा लांच देणारा जास्ती दोषी आहे. देव काही मागत नाही, तरी त्याला तुम्हाला काय जमेल ते देऊन, खूष करायचा प्रयत्न करता, आणि मग त्याच्याकडे मागणी करता. तीच सवय लोकांनी माणसाला लावली आहे; बाबा जास्ती पैसे देतो पण माझं काम करून दे, या वृत्तीतूनच लाचखोरीचा जन्म झाला. लाच देणाऱ्यानीच लाचखोरीला सुरवात केली आहे

" तू म्हणतेस ते जरा जरा कळतंय मला, पण विचार करावा लागेल बाई ह्या विषयाचा " नेहा उत्तरली.

तनया पुढे म्हणाली, " माणूस सतत सर्व गोष्टींचा बाजार करत असतो. सौदे करीत असतो. माझ्या मुलाला परीक्षेत पास कर, माझ्या मुलाला नोकरी लागू दे, कोर्टाचा निकाल माझ्या बाजूनी लागू दे – मी तुझी खणा – नारळानी ओटी भरीन किंवा आणखी काही. "

हेच प्रयोग माणूस इतरांवरही, ज्यांच्या हातात काहीतरी सत्ता आहे, त्यांच्यावरही करीत असतो. त्यातूनच लाच देणं / घेणं या

गोष्टीला सुरवात झाली असावी. म्हणजे भ्रष्टाचारी वृत्ती जशी लाच घेणाऱ्यात आहे तशी ती देणाऱ्यातही आहे. मग तक्रार कशाला करायची?"

सगळी मुलं विचारात पडली. तनयाच्या बोलण्यात काहीतरी तथ्य आहे असं जाणवलं असावं त्यांना. नेहा तर तिला म्हणाली, "काय हुशार आहेस गं तनया. तू तर सगळ्यांची बोलतीच बंद करून टाकलीस. "

मुलांचा वाद चालूच होता पण या चर्चेनी केशावगुरुजींच्या श्रद्धेला जोरदार हादरा बसला होता. नि आता आपल्या श्रद्धेला तडा जातो की काय या विचारांनी ते घामाघूम झाले होते. आजवर ज्या देवावर आपण मनोमन श्रद्धा ठेवली, त्या देवाला लोकांनी खरोखरच "बाजारात आणून उभं केलं आहे"हे विधान कुठेतरी त्यांच्या मनाला भिडलं होतं. नि आपणही मध्यस्थाचं काम करून ---- अरेच्चा मी मला स्वत:लाच दोषी ठरवतो आहे की काय? या विचारांनी ते अंतर्मुख झाले. एवढ्यात बर्वे वाहिनी दूध घेऊन आल्या नि गुरुजींची विचारमालिका खंडित झाली. दूध घेऊन झाल्यावर श्रीयुत बर्व्यांनी त्यांना दक्षिणा दिली आणि ते घरी परतले. पण या विचारांनी गुरुजींची पाठ सोडली नाही.

देव आणि त्याचे अतृप्त भक्त यांच्यामधला दुवा म्हणजे आपण. देव तर समदृष्टी आहे. म्हणून तर आपण त्याला देव मानतो न? तो सगळ्या माणसांकडे समदृष्टीनीच पाहात असला पाहिजे. ऊस जसा लावणाऱ्याला नि तोडणाऱ्याला सारखाच गोड लागतो, तसाच देव आहे. कोणी भक्ती करा न करा तो आपल्या पाठीशी असतोच. मग अमुक केल्यानी देव प्रसन्न होईल, तुमचं भलं करील असं सांगत, आपण काय करतो आहोत? आपण सच्चे आहोत का? आपण तर देव कधी पहिला नाही. त्याची साधी अनुभूतीही आपल्याला कधी आलेली नाही. आपली तितकी पोहोचच नाही आहे. मग?---- यापुढे त्यांच्या विचारांची मजल जात नसे. अन् त्यामुळे त्यांना कधीही मन:शांती मिळत नसे. त्यांच्या विचारांची अगदी कोंडी झाली होती. काय करावं हे त्यांना कळत नव्हतं.

त्यांचे रोजचे व्यवहार चालूच होते,पण हे विचार काही त्यांची पाठ सोडत नव्हते. देव कसा असतो हे त्यांनी कधी पाहिलं नव्हतं. त्यांना तसा काही अनुभवही आला नव्हता. पिढ्यानुपिढ्या चालत आलेला भिक्षुकीचा व्यवसाय ते मनापासून करत आले होते. असा काही प्रश्नच कधी उद्भवला नव्हता. आपण काही चुकीचं करतो

आहोत की काय? असे विचार मनात येण्याचं आजवर काही प्रयोजनच नव्हतं. पण आता त्यांच्या विचारांवर त्यांचा ताबा राहिला नव्हता.

धार्मिक कर्मकांडं हा त्यांच्या व्यवसायाचा पाया होता. हा पायाच् त्यांच्या विचारांमुळे डळमळायला लागला होता. या कर्मकांडाच्या आहारी जाऊन देवाचं देवपणच हिरावून घेतलं जात आहे, असं त्यांना वाटत होतं. सोवळं मोडलं – रागावला देव; पूजेत काही कमी पडलं – रागावला देव; ही देवाबद्दलची भीती; नि देव प्रसन्न झाला तर आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण करेल ही कल्पना, किंवा कदाचित हा विश्वासच लोकांना कर्मकांड करायला भाग पाडत असेल; असं त्यांना वाटत होतं. ह्या देव देव करण्यामागे लोकांची देवभक्ती जेमतेमच होती; होता तो निव्वळ स्वार्थ. ही गोष्ट ते रोज अनुभवतच होते. देवाला वेठीला धरून, लोक अनेक वैध – अवैध मार्ग अनुसरून, स्वत:चा लाभ करून घेण्याच्या मागे होते.

या सगळ्या गोष्टी त्यांना आवडतही नव्हत्या नि पटतही नव्हत्या. ---- आणि भरीसभर म्हणून की काय, ल्या या भिक्षुकीच्या व्यवसायाच्या माध्यमातून आपण या चुकीच्या प्रथांना

कळत नकळत प्रोत्साहनच देत आहोत, अशी अपराधीपणाची भावना त्यांच्या मनाच्या तळाशी आता ठाण मांडून बसली होती. ती मनातून काढून टाकणं त्यांना जमत नव्हतं.

परिणामत ते आणखीनच तापट झाले होते. मनातल्या विचारांवर ताबा मिळवण्यासाठी कितीतरी जास्ती प्रमाणात ते कर्मकांडाच्या आहारी जात होते. जणु स्वतचं निसटून चाललेलं अस्तित्व टिकून राहावं म्हणून हा त्यांचा निकराचा प्रयत्न चालू होता.

एकदा ही विचारमाला चालू झाल्यावर कर्मकांडातला वैयर्थिकपणा त्यांना दिवसानुदिवस जास्तीच प्रकर्षानी जाणवायला लागला होता. त्यामुळे ते स्वत:च त्यांच्या व्यवसायावर घाला घालीत होते. आणि त्यांच्या दृष्टीनी त्यांचा व्यवसायच धोक्यात. _आला होता. जे कर्मकांडं करायला ते लोकांना उद्युक्त करत असत त्या कर्मकांडाबद्दल शंका नि अविश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला होता. नि स्वत:शी का होईना, मनाच्या खोल गाभाऱ्यात तो त्यांना पटतही होता. म्हणून ते अस्वस्थ होत होते.

एकीकडे पूर्वसंचिताशी आपल्या कल्पना व अनुभव निगडित असतांना देवाला नवस बोलून, किंवा साकडं घालून ते पूर्वसंचित

व त्यानुसार मिळणारं फलित बदलता कसं येईल हे त्यांना कळतही नव्हतं आणि वळतही नव्हतं. त्यांच्या मनाची नुसती घालमेल चालू होती; हे अवघड जागचं दुखणं कोणाजवळ बोलताही येत नव्हतं आणि बरंही होत नव्हतं.

आजवर कधी मनात न आलेले विचार आता त्यांना त्रास देत होते. मी कोण? मी जे करतो आहे ते बरोबर आहे की नाही? असल्या शंका आजवर त्यांच्या मनात कधी आल्या नव्हत्या. मी प्रामाणिकपणानी भिक्षुकी करतो आहे; आणि तेच माझं देवानी नेमून दिलेलं कर्तव्यं आहे; या विचारांवर ते ठाम होते. आता या मनाला त्रासदायक ठरणाऱ्या विचारांनी ते अगदी चक्रावून गेले होते.

मी कोण? मी देवाचा दूत? कोणी दिला मला हा अधिकार? देव तर सर्वांचा. सर्व चराचरात भरलेला. त्याला असले दूत नि दुवे कशाला लागतील? इतकी वर्ष देवदेवस्की करूनही मला साधी देवाची अनुभूतीही कधी जाणवली नाहीय्. मी काय लोकांची गाऱ्हाणी त्याच्यासमोर मांडणार? मग मी फसवतो आहे का लोकांना? असल्या विचारांनी त्यांचं मन पोखरून निघत होतं.

त्यामुळे आजवर ज्या गोष्टी त्यांनी मनापासून केल्या होत्या, त्या करण्यात आता त्यांचं मन लागत नव्हतं.

जीवनाच्या अनिश्चिततेतून, उद्या काय घडेल? या भीतीतून माणसानी आपल्या मनाला आधार देणाऱ्या ‘ देव ‘ या कल्पनेला मूर्तरूप दिलं, ---- आणि देवाचा जन्म झाला असावा, याबाबत आता त्यांच्या मनात शंका राहिली नव्हती. हे सगळे विचारच विचित्र होते. स्वीकारता येत नव्हते पण नाकारताही येत नव्हते. खरंतर या सगळया विश्वाच्या जगडव्याळ पसाऱ्यामागच्या सर्वशक्तिमान – अस्तित्वाचं ‘ देव ‘ हे नामकरण माणसानी केलं असेल; इथपर्यंत सगळं आलबेलच होतं.

पण हळूहळू या बुध्दीमान माणसानी ‘ देव ‘ या पवित्र संकल्पनेचा स्वत:च्या स्वार्थासाठी उपयोग करून घ्यायला सुरवात केली; आपण नि आपल्यासारखे अनेकजण या स्वार्थी संकल्पनेचा महत्वाचा हिस्सा आहोत, हे त्यांना मान्यं करावं लागत होतं, आणि हेच त्यांचं खरं दुखणं होतं. मी तुमचं गाऱ्हाणं, - मागणं देवासमोर मांडतो, तुम्ही त्याबद्दल देवाला काहीतरी द्या; आणि मला दक्षिणा

द्या. सत्यनारायण करा, रूद्र करा, पण हे सगळं खरंच देवापर्यंत पोहोचतं की नाही, देवच जाणे

खरंतर सगळं जिथल्या तिथेच होतं. थाऱ्यावर नव्हतं ते केशवगुरूजींचं मन. त्यांनी इतकं सैरभैर व्हावं इतकं काही घडलंही नव्हतं. पण ते घाबरले होते – ते स्वत:च्या विचारांना. आपण लोकांना जे उपचार करायला सांगतो, त्यानी लोकांचा फायदा होतो की नाही, याबाबत आता त्यांनाही खात्री वाटत नव्हती. त्यामुळे त्यांना अपराधी वाटत होतं. स्वत:च्या व्यवसायाबद्दल त्यांच्या मनात शंका निर्माण झाली होती आणि ते स्वत:च्या मनाशी कबूल करतांना सुद्धा त्यांना घाम फुटत होता.

देव तर असा नाहीय. तो तर समदृष्टी आणि सर्व समावेशक आहे. जसा वृक्षं तो तर पाणी घालणारा व वृक्ष तोडणारा दोघांनाही स्वत:ची शीतल सावली देतो देव तर त्याहूनही महान आहे जगात चालणाऱ्या सर्व गोष्टींवर त्याचं नियंत्रण असतं सर्व गोष्टी त्याला ज्ञात असतात त्याच्या आज्ञेशिवाय झाडाचं पानही हलत नाही तो सर्वांकडे समान दृष्टीनी पाहतो माझ्या देवस्थानाला जो देणगी देईल, त्याचं मी भलं करीन; आणि जो काही देणार नाही त्याला मी वंचित

ठेवीन असं तर देव कधी वागणार नाही; जर तू माझी भक्ती करशील, तर मी तुझ्यावर प्रसन्न; आणि जो माझी भक्ती करणार नाही त्याला मीही काही देणार नाही. असं जर देव वागला तर त्याचं देवत्व काय राहिलं?

त्यांच्या मनात सतत असली वैचारिक आंदोलनं सुरू असायची, मग त्यांना आता पुढे काय घडेल? याची भीती वाटायची. आपला भिक्षुकीचा व्यवसाय संपुष्टात आला आहे, आपण अगदी भुकेकंगाल अवस्थेप्रत पोहोचलो आहोत असली विचित्र स्वप्न त्यांना पडायची. त्यामुळे ते अगदी खचून गेले होते. त्यांचं स्वत:च्या कामात लक्ष लागत नव्हतं. आपण लोकांना फसवतो आहोत या विचारानी ते कोलमडून गेले होते. आणि व्यवसाय बंद पडल्यास, आपल्या मुलांचं काय होईल या विचारानी ते गळून गेले होते. मनाची ही अस्वस्थता लपविण्यासाठी ते अधिकाधिक प्रमाणात कर्मकांडाच्या आहारी जात होते. बायका – मुलांना मात्र वाटत होतं की वयाची चाळीशी ओलांडली त्यामुळेच त्यांचा तोल जातो आहे, म्हणून बायको त्यांना सांभाळून घेण्याचा

आटोकाट प्रयत्न करत होती. पण कशाचाच काही उपयोग होत नव्हता. केशव गुरूजींचा अस्वस्थपणा वाढतच होता.

काय करावं म्हणजे ही कोंडी फुटेल, हे कितीही विचार केला तरी लक्षात येत नव्हतं. एका रात्री सगळयांची निजानीज झाली तरी गुरूजी जागेच होते. दिवसानुदिवस त्यांच्या मनाचा गोंधळ वाढतच होता; मनाची. अस्वस्थता वाढतच होती. जणुकाय आता ही त्यांच्या जीवन मरणाची समस्या झाली होती. वीट आला होता त्यांना मनाच्या या घालमेलीचा. हल्ली त्यांना वाटायचं की आपलं जीवनच संपवून टाकावं; पण त्याबरोबरच आपल्या मुलांचा विचार मनात यायचा. मग ते अगदी हतबल होऊन जायचे.

मात्र आपण आज काहीतरी निर्णय घ्यायचा आणि ही कोंडी फोडायचीच असं त्यांनी मनाशी ठरवलं होतं. आपल्या माघारी मुलांची वाताहात होणार नाही अशी व्यवस्था करून ठेवायला हवी. रमाला आणि मुलांना कोणाच्याही तोंडाकडे पाहावं लागू नये अशी व्यवस्था करायला हवी; त्याकरता गरज लागल्यास कोकणातली शेती विकून टाकावी लागली तरी तेही करायचं; असं त्यांनी मनाशी ठरवून टाकलं. मग त्यांना जरा हलकं वाटलं; ‘ आता आज मला शांत झोप लागेल,’ असं ते मनाशीच पुटपुटले आणि

आडवे झाले. खरंच आज त्यांना लगेच झोप लागली. सकाळी मात्र ते रोजच्या वेळी जाग आली, पण आज रोजच्यासारखा ताण नव्हता मनावर. मनाच्या अशा विमुक्त अवस्थेत सहजच त्यांनी आपल्या छोट्याश्या घरावर नजर टाकली. समोरच मुलं झोपली होती. त्यांना वाटलं की किती निर्धास्तपणे झोपली आहेत ती आपल्या भरवशावर. पुढे कदाचित आपण असू – नसू. या विचारानी त्यांना जरा भरून आलं; नकळतच ते पुढे झाले, त्यांनी दोन्ही मुलांच्या पाठीवर हात फिरवला मात्र आणि विजेसारखा तो विचार त्यांच्या मनात आला आणि ते एकदम हंसायला लागले. त्यांची बायको जरा घाबरलीच. गुरूजी का हसत आहेत त्यांना कळेना. त्या हातातलं काम टाकून गुरूजींजवळ गेल्या.

त्यांना म्हणाल्या, अहो, तुम्हाला झालाय तरी काय? हल्ली तुम्ही सतत काळजीत असता? आणि आज असे अचानक हसता आहात, मला खूप काळजी वाटते आहे हो. तुमच्या मोठ्या बहिणीला बोलावूया का थोडे दिवस; तुम्हाला बरं वाटेल. तुमचं मनही मोकळं होईल त्यांच्याशी बोलून.

गुरूजी आता प्रसन्न दिसत होते. काळजीचा मागमूसही त्यांच्या चेहेऱ्यावर दिसत नव्हता. ते हसून म्हणाले की, अगं तू

म्हणतेस ते एकदम बरोबर आहे. मी खरंच खूप काळजीतच होतो गेले काही दिवस. पण आता मला स्वच्छ दिसतंय आपण काय करायला पाहिजे ते. आता माझी काळजीच संपली. आपण न आपल्या मुलांना भिक्षुकी नाही शिकवायची.

रमाला गुरूजी काय म्हणताहेत ते उमजलं नाही, ती प्रश्नार्थक नजरेनी त्यांच्याकडे पाहात होती.

गुरूजींना कशाचंच भान नव्हतं. इतके दिवस त्यांच्या मनाला कुरतडणाऱ्या प्रश्नाचं त्यांना अगदी चपखल उत्तरच त्यांना साप़डलं होतं, मनाच्या त्या धुंदीतच जणु ते बोलत होते.

अगं गेले कित्येक दिवस माझ्या मनाची एकदम संभ्रमित अवस्था झाली होती. मी अगदी अस्वस्थ होऊन गेलो होतो. मला काही सुचतच नव्हतं. मी मला अपराधी समजत होतो. मी घोर अपराध करतो आहे, असं वाटून मी मला दोषी ठरवून टाकलं होतं. अहो तुम्ही काय अपराध करणार? किती सच्छील आहात तुम्ही. किती चांगले संस्कार आहेत आपल्या घराण्याचे. तुम्ही काय वाईट वागणार?

" अगं तसं नव्हे गं. मी काही वाईट वागणं शक्यं नाही हे खरंच आहे. पण अगं खरी गोष्टं वेगळीच आहे.

मला नं असं वाटायला लागलं होतं, की देव तर मी काही, पाहिला नाही, इतकं जपजाप्य करूनही देवाची साधी अनुभूतीही मला कधी आली नाही; मग मी देवाचे भक्त आणि देव यांच्यातला दुवा म्हणून काम करतांना लोकांची फसवणुक तर करत नाही नां? या विचारानी मी हैराण झालो होतो. मला काही सुचत नव्हतं. पण आता मला माझ्या प्रश्नाचं उत्तर सापडलं आहे. मला स्वत:ला तर ह्या कर्मकांडातून सुटका नाही. पण माझ्या मुलांना मात्र मी या व्यवसायात घालणार नाही. त्यांना जे हवं ते त्यांना शिकू दे. मी त्यांना भट – भिक्षुकी अजिबात करू देणार नाही. " असं म्हणुन ते मनापासून हसायला लागले.

रमाबाईना यातून काही फारसा उलग़डा झाला नाही. खूप दिवसांनी पतीच्या चेहेऱ्यावर मोकळं हास्य बघुन त्या स्वतःही हंसू लागल्या.

# कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?

कथा कथा म्हणजे असं असतं तरी काय?
खरं थोडं खाली, वर खऱ्यावरची साय!
थोडं मीठ, थोडी मिर्ची, खरं लपवत नाही.
ज्याचं जळतं त्याला कळतं, पाणी थांबत नाही.
एकीकडे कथा म्हणजे पडद्याआडची आग
दुसरीकडे कथा म्हणजे लपवलेला राग
थोडं प्रेम, थोडा द्वेष, थोडी धाय धाय
कथा म्हणजे तुम्ही-आम्ही दुसरं-तिसरं काय?

ई साहित्यवर हजारहून अधिक दर्जेदार कथा.
आनंद घ्या. आनंद द्या.

www.esahity.com
www.esahity.in
esahity@gmail.com